[redacted]

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक ह. वा. जोगळेकर | सन |
|---|---|---|
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव मुठवळं | |

[redacted]



ग्रं.क्र. १०८०

क्रं. क्रा.

[illegible]

[illegible]

लेखक
दत्तात्रय वासुदेव जोगळेकर
सन १८८६

# गुलबकावली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... १०८०

## भाग १ ला.

असें सांगतात कीं, पूर्वकडील एके शहरांत एक जैनुल्मुल्क नांवाचा बादशहा होता; त्यानें आपल्या बाहुबलानें पूर्वकडील सर्व प्रदेश आपल्या अमलाखालीं अणलेला होता. तो प्रतापसूर्य रणांत गेला ह्मणजे शत्रुरूपी अंधःकाराचा आपेआप नाश होत असे. न्याय तर त्याच्या राज्यांत जागृत वास करीत असे. स्वतः बादशहा न्यायी व धर्मशील असल्यामुळें अठरा वर्णांची प्रजा आनंदानें आपआपले व्यवसाय करून बादशहाचें कल्याण चिंतीत असे. त्या बादशहास चार पुत्र होते; तेही बापाच्या शिक्षणानें सदाचारसंपन्न असत. ते परस्परांत मित्रत्वानें वागून आनंदानें राजगुरूच्या हाताखालीं शिकत असल्यामुळें पराक्रमी झालेले होते. तरी ईश्वराच्या अगाधलीलेमुळें त्या बादशहास पांचवा पुत्र झाला. जो तेजस्वी व चंद्राप्रमाणें रूपसंपन्न असल्यामुळें जन्म पावतांच त्या सूतिकागृहांत [illegible] प्रकाश पडला.

बादशहास ती बातमी कळतांच त्यानें प्रसन्नांतःकरणानें आपल्या ताब्यांतील प्रसिद्ध दैवज्ञांस सत्कारपूर्वक बोलावून आणलें आणि पुत्राचें जातक वर्तवून जन्मपत्रिका करण्याची त्यांस विनंति केली. तेव्हां प्रत्येक ज्योतिषशास्त्रवेत्त्या पंडितानें कुंडली तयार करून त्या पुत्राचें " ताजुल्मुल्क " हें नांव ठेवावें ह्मणून [illegible] आपआपल्यापरी [illegible]चारसंपन्न, सुविचारी, विद्वान्, पराक्रमी, ऐश्वर्यवान्, कुबेराप्रमाणें धनाढ्य व अलौकिक कर्मे करणारा होईल असें सांगूं लागला. एक सांगूं लागला कीं, हा पुत्र समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करील. दुसरा ह्मणाला कीं, हा पंचमपुत्र आपल्या कर्तृत्वानें जगद्विख्यात होईल. इतक्यांत तिसरा ह्मणाला कीं, विमानचारी देव, यक्ष, राक्षस व पऱ्याही याच्या गुणांवर लुब्ध होतील व याची अनन्यभावानें सेवा करूं लागतील.

[illegible] प्रत्येक ज्योतिषी त्या पुत्राचें अनेक प्रकारें वर्णन करूंलागतांच बादशहास अत्यानंद झाला व तो मोठ्या औदार्यानें खैरात करण्याचे हुकूम देत सुटला. इतक्यांत एक ज्योतिषी—जो फारवेळपर्यंत गणित करण्यांत निमग्न झालेला होता; तो वर पाहून बादशहास ह्मणाला—" खुदावंत, आपला पांचवा [illegible] जरी सर्वगुणसंपन्न व पराक्रमी होईल असें भविष्य आहे; तरी मी हें खात्रीनें [illegible]तें अर्थी, हा पुत्र पित्याच्या नेत्रांवर पडला आहे; मेहेरबान जर त्याजकडे [illegible]वाय को[illegible]र अंध होतील. हें भविष्य कधींही खोटें होणार नाहीं. " असें ऐकता[illegible] नसल्यात विषबिंदु पडल्याप्रमाणें सर्वांस वाटलें. बादशहाचा उल्हास अगदीं [illegible] स्वतः [illegible] त्यानें सर्व दैवज्ञांस निरोप देऊन आपल्या एका वृद्ध वजीरास [illegible] हे तिन्हीं [illegible] त्या पुत्रास त्याच्या मातेसह माझ्या नगरापासून दूर ए[illegible] बादशहा ह्मणाले. त्या ठिकाणींच त्या बालकाचा पित्याप्रमाणें तुह्मीं

पाळ करावा. तुह्मांला कोणत्याही प्रकारची अडचण पडणार नाहीं. बादशाही खजिन्यांतून वाटेल तसा खर्च करा आणि माझा पुत्र जरी अरण्यांत वाढला, तरी विद्या, कला, कुशलता, इत्यादिकांत प्रवीण होईल अशी तजवीज ठेवा.

बादशहाच्या हुकुमाप्रमाणें त्या वृद्धवजीरानें एका रमणीय पण एकांत अरण्यांत एक उत्कृष्ट बाग व मंदीर तयार करून ताजुल्मुल्कास त्याच्या मातेच्या लवाजम्यासह त्या मंदिरांत नेऊन ठेविलें. तिच्या संरक्षणासाठीं आपण स्वतः त्या अरण्यांतच एक वाडा बांधून राहिला आणि तो पुत्र जसजसा मोठा होऊं लागला; तसतसें त्याला शिक्षण देऊं लागला. तो बुद्धिवान् ताजुल्मुल्कराजपुत्र जसजसा वाढूं लागला; तसतसा विद्येची एकेक पायरी चढूं लागला. चौदा वर्षांच्या वयांत चौदाही विद्या त्याला करतलामलकवत् झाल्या. वृद्ध प्रधान त्याची हुशारी व चपलता पाहून अत्यानंद मानीत असे. ताजुल्मुल्क सोळा वर्षांचाहोई पर्यंत निरनिराळ्या गुरूंच्या उपदेशाप्रमाणें निरनिराळी विद्या संपादन करीत होता. नंतर कांहीं शिकणें राहिलें नाहीं असें झाल्यावर त्याला शिकारीचा नाद लागला. वृद्ध प्रधानाची आज्ञा घेऊन तो एकटाच घोड्यावर बसून शिकार करण्यासाठीं जात असे. थोडक्याच दिवसांत त्यानें आसमंतात् अरण्यांतील क्रूर श्वापदें नाहींशीं केलीं.

एक ह्मण आहे कीं, ब्रह्मदेवानें जें भालपटलीं लिहिलें तें कधींही पुसलें जात नाहीं. बादशहा जैनुल्मुल्क एके दिवशीं शिकारीकरितां निघाला होता; तो सैन्यासह ताजुल्मुल्काला ज्या अरण्यांत ठेविलें होतें त्याच अरण्यांत आला; तों घोड्यावर बसून एका हरणाच्या पाठीस लागलेला ताजुल्मुल्क त्याच्या समोर येऊन उभा राहिला !!! तो मदनाप्रमाणें रूपवान् ताजुल्मुल्क बादशहाच्या दृष्टीस पडतांच त्याच्या नेत्रांचा व्यवहार अडला ! इतक्यांत एका बाजूनें राजपुत्राचा पालक वृद्धप्रधान व दुसऱ्या बाजूनें बादशहाचे सैनिक त्याठिकाणीं हजर झाले. तोंपर्यंत घोड्याची लगाम धरून "नेत्रांसमोर एकाएकीं अंधःकार कां झाला ?" असें मनांत आणून बादशहा स्तब्ध झालेला होता. सैनिकांनीं वृद्धप्रधानानें जवळ येऊन त्याला मुजरा केला; पण तो कांहीं त्याला दिसेना ! फक्त घोड्यांच्या टापा वाजल्या त्यावरून "आपल्याजवळ कोणी आले आहेत" असें बादशहास वाटलें. त्यानें "कोण आहे ?" असा प्रश्न केल्याव वृद्ध प्रधान पुढें झाला व "आपण चुकून या अरण्यांत कसे आलां ?" ह्मणू विचारूं लागला. तेव्हां बादशहास ताजुल्मुल्काचें स्मरण झालें व नेत्रांस अंधारी येण्याचें कारण ध्यानांत आल्यामुळें तो अपार शोक करूं लागला. ह्मणाला "देवा ! काय हें ? पुत्राला पाहिल्यामुळें पित्याच्या नेत्राला अधिक तेज यावें; तें न येतां माझे नेत्र तेजरहित झाले ! हाय हाय ! अंधःकारांत पडलों मी ! अरे कोणी तरी येऊन माझ्या नेत्राला उपाय करा !" असा अपार शोक ऐकून सर्व सैनिक व प्रधान त्याचें शांतवन करूं लागले. ज्याप्रमाणें अपायाला उपाय आहे असें सांगून शोकाचा त्याग करण्याविषयीं विनंति

लागला. तेव्हां शेवटीं बादशहानें नशीबावर हवाला देऊन शोक तर सोडला-च; पण क्रोधाचा अंगिकार करून त्या वृद्ध प्रधानास हुकूम केला कीं, जो माझ्या दिव्यनेत्रांचा शत्रु ताजुल्मुल्क, ज्यानें दूर ठेविलें असतांही समोर येऊन माझ्या नेत्रांस अंधत्व आणिलें; त्या कुलांगारकार्ट्याला माझ्या राज्यांतून हद्दपार करा; आणि त्याच्या मातेला बादशाहीजनानखान्यांत नेऊन ठेवा आणि दासीचें काम करावयाला लावा! असें सांगून त्याच वेळीं तो आपल्या राज्यांत आला आणि हकीमांस बोलावून आणून नेत्रांस उपाय शोधूं लागला; पण कोणत्याही उपायानें त्याला गुण येईना. तेव्हां एके दिवशीं दरबार भरून शोकातुर होत्साता प्रधानादिकांस ह्मणूं लागला कीं, जर कोणत्याही उपायानें माझ्या नेत्रांला तेज येत नाहीं; तर मला कालकूट विष आणून द्या. हें राज्य-सुख माझ्या अगदीं उपयोगास येत नाहीं! हें सिंहासन नव्हे, अंधतामिस्रांत पचत राहणें आहे. जगांतील सर्व वैद्यांनीं हात टेंकले, आतां मला जगण्या पासून आनंद होत नाहीं. " ह्याप्रमाणें बादशहाचीं भाषणें ऐकून सर्व दरबारी लोक सरोमांच होत्साते स्तब्ध झाले आहेत; तों एक फकीर त्या ठिकाणीं आला आणि सांगूं लागला कीं, " खुदावंत बादशहा, जर तूं गुलबकावली नामक पुष्प आणून आपल्या नेत्रांत लावशील तर खरोखर तुझे नेत्र पुनः तेजस्वी होतील."

फकीराचीं भाषणें ऐकतांच सर्व हकीमांनीं माना डोलविल्या आणि " बकावलीच्या फुलाच्या स्पर्शानें नेत्र येतील. " अशी त्यांनीं बादशहाची खात्री करून दिली. तेव्हां अपायाला उपाय आढळला ह्मणून दुःखांत सुख मानून त्यानें देशोदेशीं दवंडी दिली कीं, जो कोणी गुलबकावली नामक पुष्प मिळवून आणील त्याला वंशपरंपरेची जहागीर दिली जाईल. याप्रमाणें त्यानें जरी नवखंडांत जाहीर केलें होतें, तरी कित्येक वर्षेंपर्यंत त्याला अंधत्वजन्य शोकांतच घालवावीं लागलीं. वारंवार पुष्पप्राप्तीस्तव निराश होऊन तो आपल्या जीविताला कंटाळूं लागला. तेव्हां एके दिवशीं बादशहाचे चौघेही पुत्र बापाजवळ आले आणि ह्मणूं लागले " हे दयावंत बादशहा, ज्यानें आपल्या पित्याच्या अंतःकरणाचा शोक दूर केला. तोच खरा पुत्र! जो आपल्या प्राणापलीकडेही श्रम करून आपल्या बापाच्या सेवेला झटला तोच पुत्र धन्य! असें आहे ह्मणून आमची चौघांचीही अशी इच्छा आहे कीं, चौघांनीं चार दिशा शोधाव्या आणि गुलबकावली नामक पुष्प शोधून आणावें; तर प्रियपित्या, आह्मांला आज्ञा दे. आमच्या जाण्यामुळें कदाचित् तुझ्या मनाला दुःख होण्याचा जरी संभव आहे तरी तें अंधत्वखिन्नतेहून पुष्कळअंशीं कमी होईल असें आमचें मत आहे. शिवाय कोणाला कितीही बक्षीस देऊं केलें, तरी त्याचा आपणांजवळ आत्मीयपक्ष नसल्याकारणानें त्याजकडून अनेक प्रकारें हयगय होण्याचा संभव आहे-आह्मी स्वतः जाऊं तर कोणत्याही प्रकारें आळस न करितां स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तिन्हीं लोक शोधून तें पुष्प घेऊन येऊं. "

बादशहा ह्मणाला. " मी आपल्या दुर्दैवानें आधींच आपल्या नेत्रांचा प्रका-

श नाहींसा केला आहे. त्यांत तुह्मी चौघेही जाऊन काय माझ्या या अफाट राज्यावर व प्रख्यात कुलावरही अंधार आणतां? तुह्मांला श्रम आणि मला अधिक खिन्नता ह्यावांचून तुमच्या जाण्यांत कांहीं निष्पन्न होणार नाहीं, अशी माझ्या जिवाची पूर्ण खात्री आहे." अशीं भाषणें ऐकून चौघेही नानाप्रकारांनीं आर्जवयुक्त भाषणें करून आज्ञा मागूं लागले; तेव्हां निरुपाय होऊन बादशहानें वजीराला हुकूम केला कीं, "औषधीच्या शोधासाठीं पुत्र प्रवासी होत आहेत, तर त्यांच्या प्रवासाची व्यवस्था करा." असें ऐकतांच प्रधानानें सैन्यासह सर्व सामानसुमानांची व्यवस्था केली. तेव्हां बादशहाचे चौघेही पुत्र गुलबकावलीचा शोध करण्यासाठीं निघून गेले.

नंतर बादशहानें हद्दपार केलेला ताजुल्मुल्क आपल्या दुर्दैवाविषयीं खेदकरीत दीन दशेनें फिरत असतां एके दिवशीं त्याला मोठें सैन्य दिसलें. तें लगवगीनें लांबच्या प्रवासावर लक्ष्य देऊन चाललें आहे; असें पाहून तो त्या सैनिकांजवळ आला व चौकशी करूं लागला. तेव्हां त्याला बादशहाचे नेत्र गेल्याचा प्रकार व त्याच्या पुत्रांचा गुलबकावलीचा शोध करण्यासाठीं प्रवास, ह्या दोन गोष्टी त्याला कळल्या- त्या समजतांच तो आपल्या मनाला ह्मणाला. " शुभस्यशीघ्रं " ह्या सुभाषितोक्ति प्रमाणें बापाच्या नेत्रांबद्दल उपाय शोधण्यास अशी संधि पुन: येणार नाहीं. मी जन्मापासूनअरण्यवासी असल्यामुळें; नगरवासीयांपैकीं मला कोणीही ओळखीत नाहींत; ह्मणून मी कांहीं केलें तरी हा दुर्दैवी राजपुत्र असें कोणी ह्मणणार नाहीं. अशा प्रवासांत बापाच्या नेत्रांचा इलाज हातीं लागला तर ठीकच आहे; नाहीं तर ईश्वरेच्छेनें जो परिणाम होईल तो पाहण्यास आपण सिद्धच आहों. असा विचार करून तो एका सय्यद नामक सरदाराजवळ गेला व मोठ्या आदबीनें जमिनीपर्यंत लवून मुजरा करून त्याच्या समोर उभा राहिला. तो सरदार ताजुल्मुल्काला पाहतांच प्रसन्नचित्त होत्साता त्याला जवळ बोलावून " तूं कोण आहेस,तुला कोणत्या गोष्टीची इच्छा आहे?" इत्यादि अनेक प्रश्न करूं लागला. तेव्हां ताजुल्मुल्कानें सांगितलें कीं, " मी एक गरीब व दुर्दैवी प्रवासी आहें. माझ्या प्रवासाला अंत नाहीं, ह्मणजे मला घरदार नाहीं, किंवा एका ईश्वराशिवाय माझा कोणी प्रतिपाळ करणाराही नाहीं ह्मणून तोच ज्याच्या पोटांत मजविषयीं दया उत्पन्न करील, त्याच्या आश्रयानें राहून उपजीविका करीत असतों. "ह्या प्रमाणें नम्र, पोक्त व सयुक्तिक भाषण ऐकतांच त्या सरदाराला शहाज्याद्याची दया आली व त्यानें त्याला आपल्या जवळ ठेवून घेतलें. उत्तरोत्तर त्यांचा स्नेहही वाढूं लागला.

बादशहाचे पुत्र पुष्पाचा शोध करीत फिरत असतां कित्येक दिवसांनीं फिरदोस येथें गेले. तेथें रिदवनशाह नामक बादशहा राज्य करीत होता. सायंकाळच्या सुमारास समुद्राच्या कांठानेंच ते सैन्यासह नगराजवळ येऊन शहरा बाहेरच आपला तळ देऊन राहिले.

नंतर सूर्यास्त होऊन जेव्हां चंद्र उदयाचलावर आला व स्वच्छ चांदणें पडलें,

तेव्हां चौघेही शहाज्यादे घोड्यांवर स्वार होऊन शहरांत सहल करण्याकरितां निघाले व इकडे तिकडे फिरून नगराच्या रचनेविषयीं आश्चर्य करीत आहेत तों इंद्रभुवनाप्रमाणें रमणीय व सुशोभित विल्लोरी महाल त्यांच्या दृष्टीस पडला. रात्र असल्याकारणानें त्या महालांत जी रोषनाई केली होती; तिचें परावर्तन सर्व विल्लोरांवर पडून हें मंदीर काय हिऱ्यांचेंच केलें आहे! असा पाहणारास अचंबा वाटत असे. शहाज्यादे जरी होते, तरी तो महाल पहातांच गुंग झाले आणि हा महाल कोणाचा आहे ह्मणून चौकशी करूं लागले. तेव्हां तेथील एका सेवकानें सांगितलें कीं, हें मंदीर दिलबरलख्खा नामक वेश्येचें आहे. वेश्येचें नांव ऐकतांच तिला इतकी संपत्ती कोठून मिळाली? इत्यादि अनेक प्रश्न ते करूं लागले; तेव्हां सेवकानें सांगितलें कीं "ती लोकप्रसिद्ध गणिका केवळ इंद्रलोकांतील अप्सरा आहे. ह्या जगांत तिच्या सारखी लावण्यवती तीच, असें कित्येक बोलून गेले आहेत. तिच्या सारखी सर्वगुणसंपन्नस्त्री शोधूं गेल्यासही सांपडणार नाहीं. तिचा प्रत्येक अवयव मोहक असून प्रत्येक कृति पुरुषाला मोहपटलांत आच्छादित करणारी आहे. इंद्रियदमन करणारे ऋषिही तिला पहातील तर आपल्या यमनियमापासून च्युत होतील. तिची भेट घेणारानें सव्वालक्ष रुपयांची रास करून तिच्या द्वारावरील नगारा वाजवावा. सव्वालक्ष रुपये तिला पोंचून नगारा वाजविला गेला ह्मणजे ती त्या नगाऱ्यावर चोप मारणाऱ्याला आपल्या महालांत आदर सत्कारानें बोलाविते." असें ऐकतांच आपल्या दौलतहुकमतीवर मगरूर असणारे शहाज्यादे तिच्या दरवाजावर गेले व सवा सवा लाखाची मत्ता ठेवून चौघांनींही नगारा वाजविला.

नगाऱ्याचा आवाज कानांवर येतांच त्या कपटी गणिकेनें ईश्वराचे आभार मानून मनांत आणिलें कीं, "आज फार दिवसांनीं मोठी शिकार हातांत येणार आहे. मीही ईश्वराजवळ मागतेंच आहें कीं, कोणी पूर्ण अकलेचा माझ्या जाळ्यांत सांपडो! तें मागणें ईश्वराकडे आज कबूल झालें आणि त्यानेंच ही अजब शिकार पाठविली"

असो. तिनें चपलतेनें आपला सर्व शृंगार केला व सर्व जडावाचे अलंकार अंगावर घालून विजेप्रमाणें चमकत त्यांना घेण्यासाठीं समोर आली. इतक्यांत त्या चौघांचीही नजर तिच्यावर जाऊन जी खिलली ती बाजूलाच होईना! तिनें चौघांचाही सत्कार करून त्यांस मंदिरांत नेलें व जडावाच्या खुर्च्यांवर बसविलें; इतक्यांत तिच्या पाकशाळेच्या सेवकानें येऊन "रात्रीच्या उपहाराची तयारी आहे" ह्मणून सांगितलें व चौघांसह तिला भोजनगृहांत नेलें. त्याठिकाणीं जातांच जडावाच्या पेल्यांतून सुवासिक मद्य पहिल्यानें प्राशनास देऊन त्या गणिकेनें त्यांजकडून भोजनास आरंभ करविला; त्याचप्रमाणें त्यांच्या आग्रहावरून स्वतःही त्यांजबरोबर भोजन करूं लागली. असें करितांना मध्यानरात्र उलटून गेली व बाकीची रात्र त्यांनीं हास्यविनोदादि क्रीडा करण्यांत घालविली.

पहांटेच्या सुमारास त्या लाघवी स्त्रीनें सोंगट्यांचा पट आणला, मांजरीच्या डोक्यावर दिवा ठेवला आणि लाख रुपयांची पैज लावून द्यूताला आरंभ केला. ही गोष्ट लिहिणारानें असें लिहिलें आहे कीं, त्या रात्रींत शहाज्यादे पन्नास लक्ष रुपये हरले ! ! ! इतक्यांत सूर्योदय झाला, तेव्हां त्या गणिकेनें द्यूत बंद केलें व शहाज्यादे आपल्या ठिकाणीं निघून गेले. दुसऱ्या दिवशींही रात्र होतांच चौघे गणिकेकडे आले आणि पूर्व दिवसाप्रमाणें सर्व राजोपचार भोगून दहा दहा लाखांच्या पैजा मारून द्यूत करूं लागले. शेवटीं त्या रात्रींत सर्व मालमत्ता, हत्ती, घोडे, उंट सर्व हरलें. तेव्हां त्या वेश्येनें हात आटपला व ह्मणाली "हे तरुण राजपुत्रहो ! तुह्मी आपली सर्व संपत्ति हरवून बसलां. आतां जर तुह्मी खेळावें असें मनांत आणलें, तर तमच्या जवळ कांहीं बाकी राहिलीं नाहीं. तर आतां येथून निघून जाल तर चांगलें." असें ऐकतांच राजपुत्र ह्मणाले "आह्मी आणखीं एकवेळ आपल्या दैवाची परीक्षा पाहणार आहों. आमच्या नशिबानें जर यारी दिली, तर तूं आमचा माल हरवून घेतला आहेस तो परत घेऊं. नाहींतर चौघेही तुझे आज्ञाधारक गुलाम होऊन राहूं." ह्याप्रकारें ठराव होतांच त्या कपटी स्त्रीनें एका क्षणांत तोही डाव जिंकिला आणि त्यांची सर्व मालमत्ता लुटून तिनें आपल्या बादशहाकडे पाठवून दिली. त्याप्रमाणें त्या चौघांही शहाज्याद्यांस कैद करून तुरुंगांत पाठवून दिले. ज्या ठिकाणीं त्यांच्यासारखेच हरून गुलाम होऊन कैदेंत पडलेले सहस्त्रावधि होते. असा प्रकार होतांच राजपुत्रांचें लश्कर, शिपाई, सरदार इत्यादि सर्व ज्याला जो मार्ग योग्य वाटला त्या मार्गानें निघून गेले.

ताजुल्मुल्कानें हा प्रकार पाहून मनांत आणलें कीं, "आतां अशी युक्ति केली पाहिजे कीं, जी फलद्रूप होईल." तो शरांत आला व एका अमीराच्या वाड्याजवळ येऊन सेवकांस फारच मृदुवाणीनें ह्मणाला:—"मित्रहो, मी एक गरीब प्रवासी असून नोकरी करण्याबद्दल उमेद बाळगणारा आहें. ह्या शहरांत येतांच तुमच्या अमीर साहेबांची तारीफ ऐकली व पहिल्यानेंच या ठिकाणीं आलों. मेहेरबानीकरून आपल्या धन्यापर्यंत जर माझी वर्दी पोंचवाल, तर मी तुमचे फार आभार मानीन." असें ऐकतांच एका चाकरानें जाऊन अमीराजवळ ताजुल्मुल्काची वर्दी सांगितली व त्याला नेऊन त्या अमीरापुढें उभें केलें. अमीर त्याची मुखचर्या पाहतांच चकित झाला आणि मनांत ह्मणूं लागला—"हा आकाशावरील चंद्र पृथ्वीवर आला किंवा मदनच हा? ह्याला जरी देवांगना पाहतील तरी मोहित होतील." असो. कांहीं वेळ त्याच्या सौंदर्याकडे पाहून स्तब्धपणा स्वीकारिल्यावर तो सोडून अमीर मोठ्या ममतेनें त्याची चौकशी करूं लागला. तेव्हां ताजुल्मुल्क ह्मणाला—"खुदावंत, मी पूर्वेकडील राहणारा असून हल्लीं निराश्रित आहें. आपण कृपाकरून आश्रय द्याल तर मनापासून आपली सेवा करीन." असें ऐकतांच अमीरानें त्याला आपल्या पदरीं ठेविलें व नित्य अधिकाधिक मेहेरबानी करूं लागला.

## भाग २ रा.

ताजुल्मुल्कानें अमीराच्या पदरीं राहिल्या दिवसापासून उत्तरोत्तर त्याची प्रीति व अपार द्रव्य संपादन केलें. ताजुल्मुल्क अमीराचा एक विश्वासू व प्रीतीचा सहचर होऊन राहिला. नंतर एके दिवशीं त्यानें अमीरा जवळ विनंति केली कीं, माझ्या मित्रांपैकीं एक मित्र माझ्या गांवाहून ह्या शहरांत कांहीं माल खरेदी करण्यासाठीं आला आहे. आपण कृपाकरून आज्ञा द्याल तर तो आहे तोंपर्यंत नित्य चार चार घटिका त्याजकडे जाऊन तिकडला समाचार विचारीन असें ह्मणतों. अमीरानें "ठीक आहे." ह्मणून सांगतांच शहाज्यादा नित्य द्यूतकारांत जाऊन बसूं लागला आणि थोडक्याच दिवसांत उत्तम द्यूतकार बनला. नंतर त्यानें मनांत आणलें कीं, "आतां जाऊन दिलवरवेश्येची भेट घ्यावी आणि आपल्या नशिबाची परीक्षा पहावी." असें मनांत आणून तो तिच्या महालाजवळ गेला. इतक्यांत एक वृद्धा त्या महालांतून बाहेर पडतांना पाहून त्यानें तिजविषयीं चौकशी केली; तेव्हां त्याला असें समजलें कीं, ही वृद्धाच त्या गणिकेची सर्व प्रकारें साह्यकर्ती आहे. तिच्या हुकुमाशिवाय एक काडीही दिलवरच्या घरांत हालत नाहीं. असें ऐकतांच ताजुल्मुल्कानें मनांत आणलें कीं, "आतां मात्र या ठिकाणीं थोडेंसें कपट केलें पाहिजे. माझा प्रीतिपाश जर ह्या वृद्धेवर पडेल तर मी सर्वतोपरी विजयी आहें."

दुसरे दिवशीं ताजुल्मुल्क पुनः त्या महालाजवळ येऊन पाहतो तों ती वृद्धा बाहेर पडली. ती बाहेर येतांच ताजुल्मुल्कानें जाऊन तिचे पाय धरले व मुलासारखा रडूं लागला. तेव्हां त्या वृद्धेलाही त्याची दया आली आणि "तूं कोण आहेस? कोठून आलास आणि तुझ्यावर असें काय संकट पडलें आहे ह्मणून रडतोस?" असें विचारूं लागली. तेव्हां शहाज्यादा ह्मणाला.—" माते, मी एक गरीब मुसाफर निराश्रित आहें. माझी माता फारवर्षांपूर्वी मला निराश्रित टाकून परलोकवासी झाली. तरी तिची मुद्रा माझ्या हृदयांत कोरलेली आहे. आज रंगानें रूपानें आणि वार्धक्यानें तिच्या प्रमाणेंच तूं माझ्या दृष्टीस पडलीस आणि मला एकाएकीं तिची आठवण झाली व हृदय भरून आलें ह्मणून आधीं धांवत आलों, तुझ्या पायांवर डोकीं ठेवली आणि प्रेमामुळें रडूं लागलों. आतां मजवर ममता करून जर माझ्या मातेचें स्थान तूं पत्करशील तर मीही तुझाच होऊन राहीन."

असो. शाहाज्यायानें इतकीं हृदयद्रावक भाषणें केलीं कीं, तीं ऐकतांच त्या वृद्धेचें मन अगदीं द्रवून गेलें. ती ह्मणूं लागली—" मुला, माझें ही ह्या जगांत कोणी नाहीं कीं, ज्याच्याकडे पाहून मी आपल्याला विश्रांति मानावी. आज तूं असें ह्मणतोस, तर आनंदानें मी तुझी माता होतें व तूं माझा पुत्र हो." असें ऐकतांच शाहाज्यादा आनंदानें तिला ह्मणाला " माते, मी आज कित्येक दिवस एके ठिकाणीं चाकरी धरून राहिलों आहें आणि त्या धन्याचीही मजवर पूर्ण ममता आहे; ह्मणून त्याची सेवा मला आवडते. आतां तूं आज्ञा करशील तर त्या-

जकडे जाईन आणि नित्य तुझ्या पादवंदनासाठीं येऊन मातृस्नेहाचें सुख अनुभवीन." असें ऐकतांच त्या वृद्धेनें पुत्रस्नेहेंकरून त्याचें चुंबन घेतलें व त्यास जाण्यास निरोप दिला. त्या दिवसापासून कांहीं दिवसपर्यंत ताजुल्मुल्कानें नित्य तिजकडे खेपा घालून व गोडगोड गोष्टी सांगून तिचें मन आकर्षण करून घेतलें. एके दिवशीं तो एक मोहरांनीं भरलेली थैली घेऊन तिच्याजवळ आला व ह्मणाला–" माते, ह्या मोहरा तूं आपल्या जवळ ठेव. तुझ्या कांहीं कामीं येतील." असें ऐकतांच ती ह्मणाली. " तुझ्या मोहरा घेऊन मी काय करूं ? ईश्वरानें मलाही विपुल संपत्ति दिली आहे. कोणी खर्च करणारेंच नाहीं; ह्मणून तुला सांगतें कीं, कांहीं श्रीमंताप्रमाणें व्यापार कर, लग्नकर आणि माझी ही अपार संपत्ति खर्चकरून एका शाहाज्याद्याप्रमाणें सौख्यानुभव घे. तुला सुख भोगतांना पाहिलें ह्मणजे मला समाधान वाटेल."

नानाप्रकारांनीं ताडून पाहतां ही ह्मातारी अगदीं आपल्या आटोक्यांत आली, असें जेव्हां ताजुल्मुल्काला वाटलें; तेव्हां संधि राखून एके दिवशीं गोष्टींच्या रंगांत असतां त्यानें तिला विचारिलें—" आई, तुला हें ठाऊक आहे काय ? दिलबरलख्खा जी प्रत्येकाला जिंकते, याचें कारण काय ? तिला कोणीच जिंकीत नाहीं, इतकी ती अजिंक्य आहे, " असें ऐकतांच ताजुल्मुल्काच्या भुलथापांनीं सर्वज्ञत्वाच्या शिखरावर बसलेली ती ह्मातारी त्याला ह्मणाली–" बाळा, सगळ्या गोष्टी मला ठाऊक आहेत; पण त्या कोणाजवळ सांगण्यासारख्या नाहींत. ती वेश्या जर ऐकेल तर मजवर संकट आणल्या शिवाय राहणार नाहीं. " असें ऐकतांच शहाज्याद्यानें " मी कोणाजवळही सांगणार नाहीं. " ह्मणून अनेक शपथा वाहिल्या. तेव्हां ती ह्मणाली—" बाळा, त्या कपटी स्त्रीनें एक मांजरी व एक उंदीर पाळून तीं दोन्हीं जनावरें शिकवून ठेवलीं आहेत. मांजरी त्या उंदराला मारीत नाहीं व तो उंदीर तिला भीत नाहीं. कोणीही खेळणारा आला ह्मणजे मांजरीच्या डोक्यावर दिवा ठेवून ती डावाला आरंभ करिते. अनुकूल डाव असला तर ठीकच आहे; पण जर प्रतिकूल पडतो असें तिला वाटलें, तर ती मांजरीला नेत्रांचा इशारा करिते; तो जाणून तें मांजर मान फिरवितें व डावावर काळोख पाडतें. इतक्यांत उंदीर येऊन फांसा फिरवितो आणि निघून जातो. अशा कपटानें ती प्रत्येक द्यूतकाराला जिंकीत असते. " असें ऐकतांच शहाज्याद्यानें बाजारांत जाऊन एक मुंगूस विकत घेतला आणि त्याला असें शिकविलें कीं, त्यानें अस्तणींत रहावें आणि चुटकी वाजवितांच बाहेर येऊन समोर असलेला खडा, लांकूड किंवा उंदीर, झुरळ, जें दिसेल तें फोडून टाकावें आणि परत जाग्यावर येऊन बसावें अथवा दूर निघून जावें. त्याप्रमाणें कांहीं दिवसांनीं तें मुंगूस शिकून तयार झाल्यावर शहाजाद्यानें त्या वृद्धेकडे जाऊन एके दिवशीं असें सांगितलें कीं, " आई, मी चाकरी सोडून आज रिकामा झालों. आतां व्यापार करावा असें मनांत आहे; पण भांडवलांत थोडीशी तूट येते. असें ऐकतांच त्या वृद्धेनें त्याला आपल्या बरोबर नेऊन

आपला भांडारखाना उघडून दाखविला आणि सांगितलें—"पुत्रा, ही सर्व संपत्ति तुझी आहे. पाहिजे तसें पोक्त भांडवल घे आणि सचोटीनें व्यापार करून उदयास ये." असें बोलून तिनें किल्ली त्याच्या हवालीं केली. तेव्हां आनंद मानून तो अमीराजवळ गेला आणि त्याला ह्मणाला– "साहेब, माझ्या एका मित्राच्या घरीं आज लग्न आहे. पण मजपाशीं लग्नांत जाण्यायोग्य पोषाख नाहीं." असें ऐकतांच अमीरानें आपला स्वतःचा एक उत्तम पोषाख काढून त्याच्या हवालीं केला आणि "पागेंतून तुला आवडेल तो घोडा व मोतद्दार बरोबर घेऊन जा." असें त्याला सांगितलें; तेव्हां ताजुल्मुल्कानें एक उत्तम पाणीदार, देखणा व चलाख घोडा पसंत केला व तिसराप्रहर उलटून गेल्यानंतर त्या घोड्यावर स्वार होऊन मोठ्या थाटानें निघाला तो गणिकेच्या महालांत आला. शहाजाद्याचें सौंदर्य पाहतांच त्या अवलेचा धीर सुटूं लागला. तरी तिनें पुढें होऊन आदरसत्कारानें त्याला आणून एका सोनेरी खुर्चीवर बसविलें. नंतर शहाज्यादा तिला ह्मणाला,—"सुंदरी, तुझ्याप्रमाणें रूपवती आणि द्यूत करणारी स्त्री ह्या जगांत दुसरी नाहीं; अशी तुझी कीर्ति ऐकून मुद्दाम या ठिकाणीं आलों. त्याप्रमाणें तूं एक स्वर्गलोकांतील रंभाच आहेस; अशी तुला पाहतांच माझ्या जिवाची खात्री झाली. आतां द्यूताविषयीं पाहणें आहे. तो योग केव्हां घडून येईल हें सांगवें?" दिलबरलख्खा जी त्याच्या सौंदर्यमधूवर मोहित होऊन एकाग्रवृत्तीनें त्याच्यावर गुंजारव करीत होती; ती शहाज्याद्यानें प्रश्न करितांच देहभानावर आली आणि पहिल्यानें द्यूताविषयीं नकारच करीत होती, तरी ताजुल्मुल्काच्या विशेष आग्रहास्तव दिवे लागल्या नंतर तिनें आपल्या नियमाप्रमाणें मांजराच्या डोक्यावर दिवा ठेवून लाख रुपयांची पैज मारून डावाला आरंभ केला. पहिला डाव तर शहाज्यादा जाणून बुजून हरला आणि तिनें तो उंदराच्या व मांजरीच्या मदतीनें जिंकला.

दुसरा डाव सुरू झाला आणि खेळतां खेळतां पहिल्यानेंच जेव्हां तिला प्रतिकूळ डाव पडला; तेव्हां तिनें मांजराला इशारा केला व उंदीर सोडून दिला. शहाज्यादा तिचें कपट जाणूनच होता. मांजरानें तोंड फिरवितांच त्यानें आपल्या मुंगसाला इशारा केला. त्यानें उंदीर तर धरून फोडलाच; पण त्याला पाहतांच मांजर ही घाबरलें आणि दिवा टाकून पळून गेलें. तेव्हां शहाज्यादा क्रोधाविष्ट होत्साता तिला ह्मणाला–"जारिणी, तूं हें काय कपट मांडलें आहेस? मांजराच्या डोक्यावर दिवा काय ठेवतेस, खेळतेस काय? तुला इतकीही अक्कल कशी नाहीं? तुझ्या घरांत ईश्वरकृपेनें तेजाच्या राशीप्रमाणें हिरे असतील, लाल असतील, त्यांच्या प्रकाशानें खेळण्याचा परिपाठ ठेवला असतास तर? बरें, तेंही नसो. एक शामदानही तुला मिळेना? इतकी तूं भिकारी झालीस? धिःकार असो अशा तझ्या बुद्धीला व करणीला!!!"

असें ऐकतांच जरी ती हुशार, कपटी, चलाख, समयोचित बोलणारी अशी होती, तरी स्तब्ध झाली. तिचें सर्वांग घामानें भिजून गेलें. नंतर कांहीं वे-

लानें दुसरा दिवा आणवून चकारशब्द न काढतां डाव खेळूं लागली. गोष्ट लिहिणारा असें लिहितो कीं, त्या रात्रींत शहाज्याद्यानें सातकोट रुपये जिंकले आणि सूर्योदय होतांच ती अवाढव्य रकम सायंकालपर्यंत तिच्यावर ठेवून अमीराच्या घराचा मार्ग धरिला. सगळा दिवस अमीराच्या खुषमस्करींत घालवून दिवे लावण्याच्या सुमारास शहाज्यादा पुनः गणिकेच्या महालांत आला. तिनें ही अभिमान रहित प्रेमानें त्याचा सत्कार करून बसविलें आणि भोजनोत्तर एक कोट रुपये लावून डावाला आरंभ केला. असें सांगतात कीं, मध्यानरात्र होई-पर्यंत शहाज्याद्यानें शंभर कोट रुपये जिंकले !!! तेव्हां ती वेश्या फार हैराण झाल्याप्रमाणें त्याला दिसली. तेव्हां तो ह्मणाला—"सुंदरी, तुझ्या चर्येवरून मला असें वाटतें कीं, डावांत मांडण्यासारखें तुजपाशीं आतां कांहीं राहिलें नाहीं. तूं आपलें सर्व वित्त हरून बसलीस!" असें ऐकतांच हरल्यामुळें दुप्पट अभिमानाला पडलेल्या त्या वेश्येनें आपलें घरदार, दासदासी इत्यादि सर्व संपत्ति डावांत लावली आणि शहाज्याद्यानें ती जिंकली. नंतर तो पुनः तिला ह्मणाला—"आतां तरी तुजपाशीं कांहीं राहिलें नाहीं, असें मला वाटतें; पण बाकी राहिलेली रात्र कोणत्या कर्मणुकीनें क्रमण करावी? हीच मोठी काळजी पडली आहे; तर आतां असें कर. पूर्वेकडील चौघे शहाज्यादे तूं द्यूतांत जिंकून कैदेंत टाकले आहेस त्यांच्या नांवावर एक डाव खेळ. तूं जिंकलेंस तर मी एकलाख रुपये तुला देईन आणि मी जिंकलों तर त्या चौघानां घेऊन पाहिजे त्या कामाला लावीन." असें ऐकतांच गणिका राजी झाली आणि डाव खेळूं लागली; पण शहाज्याद्यानें एका क्षणांत तोही डाव जिंकला! तेव्हां ती गणिका त्याला ह्मणाली—"हे सुंदर तरुणा, आतां एकवेळ मला माझ्या स्वतःच्या नशीबाची परीक्षा करण्याची इच्छा झाली आहे. आतांचा हा डाव जर माझ्या हातीं आला; तर तूं माझी सर्व संपत्ति हरण केली आहेस ती मी परत घेईन आणि तूं जिंकलास तर मी तुझी दासी होऊन राहीन." शहाज्याद्याच्या नशीबाचा तारा आकाशांत चमकत होता तोही डाव त्यानें एका क्षणांत जिंकला! तेव्हां ती उठून मर्यादेनें हात जोडून उभी राहिली; आणि नम्रपणानें त्याला ह्मणाली—"सुंदर तरुणा, ज्या शिकारीसाठीं आज कित्येक वर्षेपर्यंत अनेक शहाज्यादे, शहा आणि कित्येक द्यूतकार झटपट्या खाऊन थकून आपापल्या हयातीला मुकले; ती शिकार आज दैवानें व ईश्वराच्या अगाध करणीनें तूं मारलीस! आणि मला आपल्या दासीजनांच्या वर्गांत नेऊन बसविलेंस! तर आतां मजवर कृपा करून माझ्या पदराला लग्नाची गांठ मार आणि ही सर्व संपत्ति घेऊन आनंदानें ऐश्वर्य भोगींत कालक्रमण कर." शहाज्यादा ह्मणाला—"माझ्या हातून हें कधींही होणार नाहीं. कारण—मी एका मुष्किलीनें होणाऱ्या महत्वाच्या कामासाठीं घर सोडून बाहेर पडलों आहें. ईश्वरकृपेनें माझी ती उमेद जर पार पडली तर परत येऊन मी तुझ्या इच्छेप्रमाणें वागेन. आतां तुला हें योग्य आहे कीं, आजपासून बारा वर्षेपर्यंत तूं मजवर इच्छा ठेवून रहावेंस आणि आपल्या दुष्ट कृत्यांचा

त्याग फकिरास ईश्वर चांगल्या कर्तव्याचा परिणामही चांगलाच करील. "

वेश्या चकित व अधीर होऊन ह्मणाली—" हे सुकुमार प्रियकरा—अजून तुझ्या तारुण्यकलिकेचा पूर्ण विकास झाला नाहीं; तों तुजवर प्रवासी होण्यासारखें काय संकट येऊन पडलें आहे ? प्रवासदुःखानें कष्टी होण्यास अजून तूं पात्र नाहींस; तरी तुझा निश्चयच आहे, तर आपलें दुःख मला सांग. मीही तुजबरोबर राहून मनापासून तुझ्या कार्याला साह्य होईन. कारण—आतां तुझ्या शिवाय हें मंदिर मला कारागाराप्रमाणें आहे. " याप्रमाणें अनेक प्रकारें बोलून जेव्हां ती त्याला अत्याग्रहानें त्याची हकीकत विचारूं लागली. तेव्हां निरुपायास्तव तो सांगूं लागला.

" सुंदरी—मी पूर्वदिशेकडील जैनुल्मुल्क बादशाहाचा पुत्र. माझें नांव ताजुल्मुल्क. दुर्दैवामुळें माझ्या बापाचे नेत्र गेले, तेव्हां हकीमांनीं जमून असें सांगितलें कीं, जर बकावलीच्या बागेंतील फूल मिळेल तर बादशाहाचे नेत्र बरे होतील. असें ऐकतांच माझे चौघे सावत्र बंधु जे तुझ्या कैदेंत आहेत, ते त्या फुलाच्या शोधासाठीं निघाले; तेव्हां मीही वेषांतर करून त्यांच्या नकळत त्यांच्याच बरोबर फुलाच्या शोधासाठीं निघालों. शेवटीं ते तुझ्या फंदांत पडून तुझे गुलाम होऊन कैदेंत पडले आणि मी अनेक प्रयत्नकरून तुझ्यापर्यंत येऊन यशस्वी झालों. तरी आतां मला त्या फुलाच्या शोधासाठीं गेलें पाहिजे. प्राण गेले तरी बहेत्तर, मी तें फूल मिळवून आणीन अशी माझी उमेद आहे. " असें ऐकून वेश्या फारच दुःखित झाली आणि त्याला ह्मणाली—" प्रियकरा, तुझ्या मनांत हें वेड कोणीकडून भरलें ! व्यर्थ आपल्या जिवावर संकट ओढून घेण्याची इच्छा करीत आहेस ! आतां त्या फुलाविषयीं मला जी माहिती आहे ती तुला सांगतें. लक्ष्यपूर्वक ऐक आणि योग्य विचार कर. "

" जिला बकावली ह्मणतात; ती परीजातीच्या बादशहाची कन्या आहे. तिच्या बागेंत तें फूल आहे. त्या बागेसभोंवतीं किल्ल्याप्रमाणें चार तट मजबूत आकाशापर्यंत उंच असे बांधलेले आहेत. कोणत्याही पक्ष्याची शक्ति नाहीं कीं, जो त्या बागेंत प्रवेश करील. कित्येक भयंकर व क्रूर यक्षराक्षस त्या बागेचें संरक्षण करीत असतात. शिवाय सर्प आणि विंचू अष्टौप्रहर जमिनीवर राहून त्या फुलाचा पाहरा करीत असतात. त्या फुलाच्या इच्छेनें जाणारा कोणताही प्राणी जिवंत राहणार नाहीं. बरें, जमिनींत चुव्यांचा ( उंदरांचा ) बादशहा कोट्यावधि चुव्हे बरोबर घेऊन पाहरा करीत असतो. कोणी जमीनींतून भुयार खणूनही तेथपर्यंत पोंचणार नाहीं. ह्मणून ह्मणतें कीं, प्रियकरा, ईश्वरासाठीं तरी तूं त्या संकटांत पडूं नको. शेखसादी ह्मणतो—" कोणीही प्राणसंकट आल्याशिवाय मरण पावत नाहीं. तर तूं मुद्दाम जाऊन प्राणसंकटांत पडूं नयेस असें मी इच्छितें. "

शहाज्यादा ह्मणाला—" हे सुहास्यवक्त्रे मधुरभाषिणी, तूं बोललीस हें जरी खरें असलें. तरी ईश्वरावर भरंवसा ठेवून राहणाऱ्यास अग्निही सीतगुण देत असतो. शिवाय—" जर दोस्त मेहेबान आहे, तर दुष्मन काय करील? " तूं माझ्या

अल्पवयाकडे पाहून काळजी करूं नको. मनुष्यास जरी यक्षराक्षसांहून शक्ति कमी आहे; तरी ज्ञानानें मनुष्य त्यांच्याहून श्रेष्ठ आहे आणि ईश्वरानेंही ह्मटलें आहे कीं, मी सर्वांहून अधिक ज्ञान मनुष्य प्राण्यांत ठेवलें आहे. आणखीं दैव बलवत्तर असलें, ह्मणजे कोणीही संकट निवारण करणारा भेटतो. याविषयीं मी तुला एक गोष्ट सांगतों ती ऐक.

## ब्राह्मण आणि वाघ यांची गोष्ट.

एकेदिवशीं एक ब्राह्मण एका अरण्यांतून चालला होता. तो चालत असतां काय पाहतो—एक वाघ लोखंडाच्या जाड्या सांकळदंडानें बांधून पिंजऱ्यांत अड- कवून ठेविलेला आहे. तो वाघ ब्राह्मणाला पाहतांच दीनवाणीनें बोलूं लागला— "हे भूदेवा, जर तूं मला ह्या संकटांतून मुक्त करशील तर मी कधींतरी तुझे उपकार फेडीन. ब्राह्मणाचें हृदय फार दयाळू असतें असें ऐकतों, ते जर खरें असेल तर तुला माझी दया आली पाहिजे. असें ऐकतांच त्या भोळ्या ब्राह्मणाला त्या क्रूर व्याघ्राची दया आली; पण त्या अकलेच्या वैऱ्याला असें वाटलें नाहीं कीं, हा वैरी आहे. त्याचें दीन भाषण ऐकतांच त्या ब्राह्मणानें पिंजरा उघडून त्या वाघाचे हात पाय सांखळदंडांतून मुक्त केले. वाघानें सुटतांच ब्राह्मणाची गर्दन धरून त्याला आपल्या पाठीवर टाकलें आणि तो त्याला मारून खाण्यासाठीं घेऊन चालला.

ब्राह्मण प्राणसंकट जाणून त्या वाघाला ह्मणाला—"अरे मी तुजवर उपकार केले त्या वेळेस तूं असा मोबदला देशील असें मला वाटलें नवतें." वाघ ह्मणाला— "आमच्या शास्त्रांत उपकार करणारावर अवश्य अनुपकार करावे, असें सांगि- तलें आहे. माझ्या बोलण्याचा तुला भरंवसा येत नसेल तर चल आपण याचा न्याय दुसऱ्या कोणाला विचारूं." याही गोष्टीला तो ब्राह्मण राजी झाला. त्या रानांत एक फार जुनें वडाचें झाड होतें. वाघ आणि ब्राह्मण त्या झाडा- जवळ गेले आणि त्यांनीं त्याला सगळी हकीकत सांगितली; तेव्हां त्यानें जबाब दिला कीं, ह्या काळांत उपकाराबद्दल अनुपकार करणें हेंच योग्य आहे. ब्राह्मणा ऐक:—" मी वड ह्या मार्गांत एकापायावर उभा आहें. प्रत्येक लहान मोठा प्र- वासी माझ्या छायेंत बसून विश्रांति घेतो, हवा खातो आणि निघाला ह्मणजे माझ्या खांद्या मोडून आपल्या तोंडावरील किरणें वारीत चालता होतो. कोणी तर विनाकारण मला तोडतो व हातांत घेण्यासाठीं काठीच तयार करून नेतो. तर सांग बरें! माझ्या भलेपणाचा मोबदला मला कसा मिळत असतो? ह्मणून सांगतों कीं उपकाराचा मोबदला अनुपकारच योग्य."

वडाचें भाषण ऐकून वाघ विचारतो—" कां ब्रह्मदेव, आतां आपली काय इच्छा आहे?" ब्राह्मण ह्मणाला—" आणखीं कोणाला तरी विचारण्यासाठीं चल. ह्या झाडाला कांहीं समजत नाहीं." वाघानें चार पावलें चालून मार्गाला तो न्याय विचारला; तेव्हां तोही ह्मणूं लागला कीं, " वाघाचें करणें न्यायाचें आहे. ब्रा-

ह्मणा ऐक. प्रवास [illegible]णारा चुकतो व मला शोधीत रानोमाळ हिंडतो; पण जेव्हां मी त्याला [illegible]तों, तेव्हां आनंदानें तो आपल्या मुक्कामावर जातो. हे माझे उपकार आ[illegible]कीं नाहींत? ह्या उपकारांबद्दल तो माझ्या छातीवर बसून लघुशंका करतो[illegible]कादे वेळीं शौच करण्यालाही मागें पुढें पहात नाहीं." असें ऐकतांच [illegible]ण निरुत्तर झाला. तरी वाघाला ह्मणाला—"आणखीं एकवेळ तिसऱ्या कोण[illegible] तरी विचारूं चल. तोही तुझ्यासारखेंच बोलला, तर तुझ्या मनास वाटे[illegible] कर." असें ऐकतांच वाघ चार पावलें पुढें झाला. इतक्यांत एक कोल्हा[illegible]च्या दृष्टीस पडला. त्या कोल्होबानेंही पाहिलें कीं, वाघ जिवंत मनुष्याला [illegible] घेऊन येत आहे. तो आपल्या मनांत समजला कीं, डाळ बिघडली आहे खरी. तरी तो पळून जाण्याचाच विचार करूं लागला. तेव्हां दुरूनच हांक मारून वाघ त्याला ह्मणाला—"कोल्होबा, मनांत कांहीं एक भय न धरितां उभा रहा. आह्मीं दोघे तुला एक न्याय विचारण्यासाठीं येत आहों." असें ऐकतांच तो उभा राहिला आणि ह्मणाला—"वाघोबा, मेहेरबानी करून आपण दूरच उभे राहून काय विचारायाचें असेल तें विचारा. कारण—तुमच्या दर्शनानेंच आमचें काळीज करपून जात आहे." वाघ ह्मणाला—"ह्या ब्राह्मणानें मजवर उपकार केला आहे, ह्मणून मी त्याचा घात करणार. तर यांत तुझी काय मसलत आहे ती सांग. मी करतों हा न्याय असाच आहे कीं नाहीं तें सांग." कोल्हा ह्मणाला—"तुह्मीं सांगतां, पण ही गोष्ट कशी घडली असेल हें माझ्या ध्यानांत येत नाहीं. मनुष्याची काय शक्ति आहे? कीं, जो सर्व पशूंच्या बादशहावर उपकार करील. मी अशा गोष्टी डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय खऱ्या मानीत नाहीं." वाघ ह्मणाला—"तूं आमच्या बरोबर चल, ह्मणजे तें ठिकाण तुला दिसेल." असें बोलून ब्राह्मणाला पुनः पाठीवर टाकून वाघ चालूं लागला. तेव्हां कोल्हाही त्याच्या मागून निघाला. थोडक्याच वेळांत ते तिघेही सांपळ्याजवळ आले. तेव्हां ब्राह्मण ह्मणाला—"कोल्होबा, ह्याच सांपळ्यांत वाघाला साखळदंडानें बांधून कैद केलेलें होतें, या बंधांतून याला मी सोडलें. आतां तुझ्या बुद्धीला वाटेल तसा न्याय कर." ह्याप्रमाणें ऐकून व त्या पिंजऱ्याकडे पाहून आश्चर्यचकित मुद्रेनें कोल्हा ह्मणतो—"ह्यांत आपली अक्कल तर अगदीं चालत नाहीं बुवा. आतां जर तूं सांगतोस त्याप्रमाणें वाघ पुनः आंत जाईल आणि पहिल्याप्रमाणें बांधून घेईल व तूं पुनः त्याला मोकळा करशील, तर मी खरें मानीन."

असें ऐकतांच वाघ ब्राह्मणाला सोडून पिंजऱ्यांत गेला व ब्राह्मण त्याचे हातपाय बांधूं लागला. तेव्हां कोल्हा ह्मणाला—"संभाळरे ब्राह्मणा, जर तूं बांधण्यांत कसर ठेवसील तर मी एकही शब्द न बोलतां निघून जाईन." ब्राह्मणानें कोल्ह्याच्या सांगण्याप्रमाणें वाघाचे चारीपाय खूप मजबूत बांधले आणि सांपळ्याचा दरवाजा बंद करून कोल्ह्याला ह्मणाला—"पहा, वाघ असा बंदींत पडलेला होता व मी सोडविलें होतें." कोल्हा ह्मणाला—"अरे दगड्या, मूळ प-

ढली तुझ्या अकलेवर! अशा दुष्टावर कोणी तरी उप[illegible] केले आहेत? जा आपल्या मार्गानें आणि पूर्व सुकृतामुळें जिवंत राहिलों [illegible] मान."

ताजुल्मुल्क अशी गोष्ट सांगून ह्मणाला—"सुंदरी, वे[illegible] कोण उपयोगीं पडेल याचा नेम नाहीं. त्याचप्रमाणें अकलेच्या योगानें पर्व[illegible] इकडला तिकडे उलटून टाकतां येतो. तर आतां मी सांगतों असें कर. [illegible] कित्येक राजपुत्रांस तूं कैदेंत टाकलें आहेस, त्या सर्वांस सोडून दे." आ[illegible] भावांविषयीं त्यानें तिला असें सांगितलें कीं—"मी परत येईपर्यंत त्यांच्या[illegible] चांगलें लक्ष्य ठेव." असें बोलून त्यानें जाण्याची तयारी केली. तेव्हां ने[illegible] अश्रु आणून ती वेश्या त्याला ह्मणते—"प्राणप्रियकरा, तूं मला वियोगाग्नी[illegible]रपळत टाकून चालता होशील असें मला वाटलें नवतें. आतां तर तुझा वियोग मला सहन होणार नाहीं. जोंपर्यंत दृष्टीस पडला नवतास तोंपर्यंत ठीक होतें. पण आतां चातक जसा चंद्रोदयाची मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात असतो; त्याप्रमाणें तुझ्या मार्गाकडे माझे डोळे लागून राहतील. यासाठीं सांगतें कीं, तुझ्या सहवासापासून जो मला आनंद होणार आहे, तो जाऊन नाहींसा करूं नको." इत्यादि अनेक प्रकारें बोलून त्याच्या जाण्याला अडथळे सांगूं लागली. तरी त्याचा जाण्याविषयींचा आग्रह सुटेना. तेव्हां निरुपाय होऊन ती ह्मणाली—"तूं माझें न ऐकतां आपलाच हट्ट पूर्ण करणार तर जा. पण मी दोन शब्द सांगतें ते ध्यानांत ठेव. हें सर्व जग आणि विशेषेंकरून प्रवासाचे मार्ग कपटानें भरलेले आहेत. प्रवासी मनुष्यानें भोळेपणाकरून कधींही कोणावर विश्वास ठेवूं नये. आत्मसंरक्षणासाठीं मनुष्यानें सदोदित फार सावधगिरी ठेवली पाहिजे. आतां तूं पऱ्यांच्या राज्यांतील मुख्य जी बकावली परी तिच्याच बागेंत जाण्याची उमेद बाळगीत आहेस व ती तर रूपगुणसंपन्न प्रत्यक्ष इंदिराच आहे, असें ह्मटलें तरी चालेल. जर तिच्या रूपावर लुब्ध होऊन तेथें अडकलास तर आपल्या हयातीला मुकलास. जसजसा निस्पृहपणा धरशील तसतशी ती तुझ्या रूपावर मोहित होईल व तुझी तावेदारी करीत राहील." इत्यादि अनेक प्रकार तिनें सांगितले. त्यांबद्दल तिचे आभार मानून ताजुल्मुल्कानें जेव्हां तिच्याजवळ शेवटचा निरोप मागितला, तेव्हां तर ती फारच शोक करूं लागली, तरी पुढील कृत्यावर लक्ष्य देऊन ताजुल्मुल्कानें तिची समजूत केली व निरोप घेतला.

## भाग ३ रा.

ही गोष्ट मूळ लिहिणारानें असें लिहिलें आहे कीं, फिर्दोस शहर सोडून ताजुल्मुल्क पुढें निघतांच त्यानें आपल्या अंगावरील मूल्यवान् वस्त्रालंकारांचा त्याग करून अंगाला राख लावली आणि फकीराप्रमाणें वेष धारण करून, ईश्वराचें नांव घेऊन तो मार्गास लागला.

कित्येक दिवस पर्यंत मार्ग क्रमून तो एका अशा विकट अरण्यांत आला कीं, जेथें मनुष्याचा तर वास नाहींच; पण पशु किंवा पक्षी कोणीही त्या अर-

ण्यांत त्याला दृष्टीस पडेना! कारण झाडें उंच जाऊन अशा खुबीनें एकमेकांत मिळालीं होतीं कीं, त्या अरण्यांत संचार करणाऱ्यास रात्र आहे कीं दिवस आहे हें समजूं नये. शहाज्यादा तें भयंकर अरण्य पाहतांच घाबरला, तरी आपल्या मनाला ह्मणूं लागला.—"ही तर पहिली मजल आहे. अजून कोण कोणते प्रसंग येतील याचा नेम नाहीं; परंतु एक आख्यायिका आहे कीं, "बुडी मारणारा मगराचें भय मानील तर त्याच्या हातीं मोतीं लागणार नाहीं." असो. तर भय धरून उपयोग नाहीं. पुढें जाऊन इच्छित कार्य केलें पाहिजे. असें मनांत आणून तो त्या अंधःकारांतून पुढें चालूं लागला. वारंवार पायांला ठेंचा लागून ते रक्तबंबाळ होताहेत; कांटेही खोडतातच आहेत आणि कांहींच दिसत नसल्यामुळें झाडाला टकरा बसून डोकेंही फुटत आहे, अशा विलक्षण प्रसंगामुळें त्याच्या प्रत्येक अवयवांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. वरचेवर गोते खात इकडून तिकडे धडपडत असतां "ईश्वरा! तुजवांचून कोणीही साह्यकर्त्ता नाहीं! देवा! कृपाकरून चांगला मार्ग दाखीव!" अशी त्यानें ईश्वराजवळ करुणा भाकावी. असो. कित्येक दिवस पर्यंत तशाही संकटानें मार्ग क्रमण करीत असतां जेव्हां त्याला थोड थोडा प्रकाश दिसूं लागला, तेव्हां आनंद मानून त्यानें ईश्वराच्या अगाध चरित्राचें स्मरण करून त्याचे आभार मानले आणि पुढें चालूं लागला. कांहीं थोडी मजल मारून समोर पाहूं लागला—तों एक पोलादाचा पहाड आहे. खरें पहातां तो काजळाच्या पर्वता सारखा एक भयंकर व क्रूर राक्षस बसलेला होता; परंतु शहाज्यादा त्याला पर्वत मानून त्याच्या जवळ गेला. इतक्यांत तो क्रूर उभा राहिला आणि आनंदानें उड्या मारूं लागला. त्याचें तें भयंकर रूप पहातांच "आपला मरणकाळ जवळ आला" असें शहाज्याद्यास वाटलें. तो "ईश्वरा! माझें रक्षणकर! मी अनाथ आहें. !!" ह्मणून आकाशाकडे पाहून हात जोडूं लागला आणि राक्षसही आनंदानें मेघासारखी गर्जना करून खासा नाजुक सुग्रास पाठवून देणाऱ्या ईश्वराचे आभार मानूं लागला. नंतर तो शहाज्याद्यास ह्मणाला—"रे मनुष्या! तुझ्या एवढ्याश्या अल्पवयांत व भर तारुण्यांत तुझी आयुष्यवल्ली कोणी तोडली? तूं आपलें शिर हातावर घेऊन ह्या अरण्यांत काय ह्मणून आलास? बोल? बोल?" असें ह्मणत राक्षस पुढें येऊं लागतांच शहाज्यादा थर थर कांपूं लागला. त्याचा चेहरा भयानें अगदीं फिक्का पडला आणि त्याची बोबडी वळली. तरी राक्षस पुढें उभा राहून जेव्हां त्याला त्याची हकीकत विचारूं लागला; तेव्हां शहाज्यादा ह्मणाला—"हे राक्षसाधीशा, तूं माझी हकीकत काय विचारतोस? मला माझें आयुष्य खरोखर जड झालें आहे. मला जर आपला प्राण प्रिय असता तर मी मुद्दाम इकडे कां आलों असतो? तुला अधिक काय सांगूं? एकेक पळ मला वर्षाप्रमाणें जात आहे. कारण—मनुष्याला जर त्याच्या इराद्याप्रमाणें सर्व सुखें अनुकूल झालीं; तरच त्याच्या जीविताचें सार्थक, नाहींतर मरण आलेलें चांगलें."

राक्षसानें जेव्हां अशीं उदासवृत्तीचीं भाषणें ऐकलीं, तेव्हां त्याला शहाज्याद्याची दया आली आणि त्यानें हजरत सुलेमानाची शपथ घेऊन शहाज्याद्याला सांगितलें—

"हे मनुष्या, मी तुला कधींही दुःख देणार नाहीं. तूं ज्या कामाकरितां निघाला आहेस, त्यांत माझ्याकडून होईल तितकी मी मदत करीन." असें बोलून राक्षसानें त्याला आपल्या घरीं नेलें व त्यावर नित्य अधिकाअधिक लोभ करूं लागला.

एके दिवशीं राक्षसानें शहाज्याद्यास विचारिलें—"मित्रा, तुझा खुराक (भक्ष्य) काय आहे मला सांग, ह्मणजे मी तुला आणून देईन." ताजुल्मुल्क ह्मणाला—"मनुष्यांचे भक्ष्य पदार्थ ह्मटले ह्मणजे तांदूळ, डाळ, कणीक, तूप, साकर इत्यादि अनेक आहेत." असें ऐकतांच राक्षस त्वरेनें जो उठून गेला तो एका क्षणांत एका काफल्यावर ( प्रवासी व्यापाऱ्यांच्या टोळीवर ) जाऊन पडला. ते लोक सर्व भक्ष्य पदार्थांचाच व्यापार करणारे होते. असो. राक्षसानें काफल्यांतील सर्व व्यापारी पळविले आणि मालानें भरलेलीं सर्व उंटें उचलून शहाज्याद्या समोर उभीं केलीं. तेव्हां त्यानें उंटांवरील सामान उतरून घेतलें आणि उंटे अरण्यांत सोडून दिलीं.

नंतर कित्येक दिवसपर्यंत शहाज्यादा नित्य एक दोन रोट्या तयार करून भोजन करीत असे. एके दिवशीं त्यानें पुष्कळच रवा, मैदा, तूप, साकर इत्यादि एके ठिकाणीं मळून मोठमोठाले रोट तयार केले व भाजून काढिले आणि एक उंट कापून त्याचे मोठमोठाले मसालेदार कबाब तळून पदार्थांचा रखा ढीग पाडला. तो पाहून राक्षसानें त्याला विचारिलें—"मित्रा, आज तूं हा काय खटाटोप चालविला आहेस?" शहाज्यादा ह्मणाला—"हे आश्रयदात्या राक्षसाधीशा, आज माझ्या मनांत असें आलें कीं, आपल्या हितेच्छु मित्राच्या पंगतीला बसून भोजन करावें; ह्मणून ही सर्व तयारी केली आहे. तर ये आणि मानवी खुराकाची लज्जत कशी आहे ती दोन घांस घेऊन पहा." असें ऐकतांच त्या राक्षसाला अत्यानंद झाला व त्यानें त्या सर्व पदार्थांचा एकच ग्रास केला! राक्षसानें कधींच मानवी भक्ष्य पदार्थ चाखले नव्हते. ताजुल्मुल्कानें केलेले पदार्थ त्याला फारच रुचकर लागले व त्यांची तो फारच वाखाणणी करूं लागला. तो ह्मणाला—"हे मानव मित्रा, आज तूं मला जो पदार्थ खावविलास, तसला पदार्थ माझ्या पूर्वजांपैकीं एकानेंही चाखला नव्हता. फार काय सांगूं? आमच्यांतील एकानेंही ही चव अनुभविली नाहीं, असें मी खात्रीनें ह्मणतों. ह्या भोजनाचा उपकार मी कधींही विसरणार नाहीं." याप्रमाणें त्याची अभिरुची पाहून शहाज्यादा त्याला नित्य भोजन घालूं लागला व राक्षस प्रसन्नांतःकरणानें त्याच्या कामांत त्याला मदत करावी असें मानूं लागला.

एके दिवशीं भोजनोत्तर दोघेही आनंदानें बसले असतां राक्षस शहाज्याद्यास ह्मणतो—"मित्रा, नित्य अमृताप्रमाणें भोजन देऊन तूं मजवर उपकार करीत

आहेस, परंतु मी अजून ते फेडण्याचा उद्योगही आरंभीत नाहीं; पण हें योग्य नव्हे. तुझ्या मनांत जें असेल तें मला सांग. तुझी इच्छा पूर्ण केल्या शिवाय मला चैन पडणार नाहीं. " शहाज्यादा ह्मणाला-" मी सांगेन; पण राक्षस वचन पाळणारे नसतात असें ऐकतों. तें जर खरें असेल, तर मी आपलें इच्छित सांगून काय उपयोग ? जर तूं हजरत सुलेमानाची शपथ घेऊन ' मी तुझें काम करतों ' असें ह्मणशील, तर माझ्या मनांत आहे तें तुला सांगेन. " राक्षसानें त्याच्या प्रीतीस्तव निरुपाय होऊन शेवटीं शपथ वाहिली; तेव्हां राजपुत्रानें आपलें इच्छित कार्य त्याला कळविलें.

हें ऐकतांच राक्षस पाण्यांत ढेंकूळ विरघळतें तसा अगदीं विरघळला. तरी " शपथेप्रमाणें कार्य केलें तर पाहिजेच. " असें मनांत आणून तो ह्मणाला-हे शहाज्याद्या, मजकडून शपथ घेववून तूं मला आपल्या ताब्यांत घेतलेंस हें खरें. पण बकावली कोण आहे, तिचा बाग किती रक्षणांत आहे व तिची योग्यता केवढी आहे ? हें तुला सांगतों ऐक. बकावली परीजातींतील बादशहाची कन्या आहे. अठराहजार राक्षस तिचे गुलाम आहेत; ते तिच्या मुलखाचें व मालाचें रक्षण करीत असतात. बकावलीच्या बागांत जाण्याची कोणाचीही शक्ति नाहीं. असें असतां तिच्या बागांतील अमूल्य फूल तूं इच्छितोस, तें कसें मिळावें ? आतां मी वचनबद्ध झालों आहे, ह्मणून मला तुझें कार्य करणें भाग आहे, यासाठीं असें कर. आज उत्तम प्रकारच्या भोजनाची तयारी कर. मी आपल्या भावाला या ठिकाणीं घेऊन येतों, तो तुझ्या कार्याचा सूड लावील. असें ऐकतांच शहाज्याद्यानें त्याविषयीं खूप मेहेनत करून रोजच्या चौपट अन्न तयार केलें आणि राक्षसाला कळविलें. तेव्हां राक्षस जो आकाशांत उडाला तो एका क्षणांत दुसऱ्या एका राक्षसाला बरोबर घेऊन आला. ताजुल्मुल्कानें त्या दुसऱ्याला पाहतांच जमीनीपर्यंत लवून सलाम केला. पहिल्या राक्षसानें " हा मानव असून मोठ्या योग्यतेचा व कसबी असल्या कारणानें माझा मित्र झाला आहे, " असें नव्या राक्षसाला सांगितलें. नंतर ताजुल्मुल्कानें दोघांस भोजनास बसविलें आणि सर्व पदार्थ यथेच्छ वाढले. भोजन होतांच नवा राक्षस शहाज्याद्यावर संतुष्ट होऊन आनंदानें नाचूं लागला, आणि वारंवार पहिल्या राक्षसास विचारूं लागला कीं, " अरे नित्य हा मानव तुजवर असेच उपकार करीत असेल, ह्याचें कांहीं काम तूं केलें आहेस कीं नाहीं ? " असें ऐकतांच पहिल्या राक्षसानें पहिल्यानें दुसऱ्याचें वचन घेतलें आणि ताजुल्मुल्काचा सर्व वृत्तांत त्याला सांगितला. नंतर दोघांनीं बसून विचार केला आणि ताजुल्मुल्कास त्यांची बहीण हम्माला नामक राक्षसी, जी बकावलीच्या अठराहजार राक्षसगुलामांवर हुकूमत चालविणारी होती तिच्या हवालीं केलें.

ताजुल्मुल्काला पाहून व आपल्या बंधूंच्या मुखानें त्याची तारीफ ऐकून हम्माला राक्षसीस आनंद झाला. कारण-त्या राक्षसी जवळ एका बादशहाची मेहमुदा नामक कन्या होती. ही कन्या त्या राक्षसीनें केवळ लडिवाळपणानें

पाळलेली असल्यामुळें हिचें एखाद्या शहाज्याद्या बरोबर लग्न करावें, असें तिच्या मनांत होतें. त्या इराद्याची पर्तता शहाज्याद्याला पाहतांच झाली. तिनें अल्प काळांतच ताजुल्मुल्काकडून मेहमुदेचें पाणिग्रहण करविलें आणि त्या दोघांस पुत्रवात्सल्यानें पाळूं लागली. तिचें प्रेम पाहून शहाज्यादाही आनंदानें कांहीं दिवसपर्यंत मेहमुदेसहवर्तमान ऐषआराम भोगीत पडून राहिला.

## भाग ४ था.

ताजुल्मुल्क जरी वरकरणी ऐष आराम करीत राहिला होता; तरी त्याचें अंतःकरण प्रसन्न आहे असें मेहमुदेनें कधींच पाहिलें नाहीं. तेव्हां एके रात्रीं तीं उभयतां एकांतांत असतां मेहमुदा त्याला ह्मणाली—" प्राणनाथ, जरी मी मानवी स्त्री आहे, तरी लहानपणापासून राक्षसांच्या संगतींत असल्यामुळें मला मनुष्याच्या खऱ्या रितीभाती ठाऊक नाहींत. तरी हम्माला मातेच्या तोंडानें वारंवार मी असें ऐकलें आहे कीं, मानवी पुरुष आपल्या बुद्धीनें अनेक उपद्व्याप करणारे असल्यामुळें जरी दिवसाचे आपापल्या प्रियांपासून दूर राहतात; तरी रात्र होतांच ते स्त्रियांच्या गळ्यांत गळा घालून प्रेमसुखाचा अनुभव घेत असतात. असें असतां कित्येक दिवसांत मी तें सुख अनुभवीत नाहीं, त्याचें कारण काय असावें बरें? जेव्हां पहावें तेव्हां आपण कांहीं विचारांत गर्क झालां आहां असें दिसतें. तर जें काम असेल तें आपण मला सांगावें. आईच्या मदतीनें मी आपली काळजी दूर करीन." ताजुमुल्क ह्मणाला—" जोंपर्यंत माझ्या मनांतील इच्छा पूर्ण झाली नाहीं, तोंपर्यंत कोणत्याही प्रकारानें मला सुख होणार नाहीं." असें बोलून त्या स्वाधीन अबलेला बकावलीच्या फुलाबद्दल सगळी हकीकत त्यानें सांगितली, आणि तिनें आपल्याबद्दल हम्माला राक्षसीजवळ पूर्ण भीड खर्च करावी. इतकें तिचें मन आकर्षण करून घेतलें.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं मेहमुदा आपल्या पतीसह हम्माले जवळ आली तिला पाहतांच त्या राक्षसीनें दोघांसही प्रेमानें अंकांवर घेतलें आणि ह्मणाली— " बालकांनों, तुमच्या मनांत जी इच्छा उत्पन्न झाली असेल, ती मला सांगा." असें ऐकतांच मेहमुदेनें शाहज्याद्याची इच्छा आपल्या मातेला कळविली आणि सांगितलें कीं, जर माझ्या पतीची इच्छा पूर्ण न होईल, तर तूं माझें लग्न केलेंस त्याचा उपयोग होत नाहीं."

शहाज्याद्याची इच्छा पूर्ण करण्याचें हम्माला राक्षसीच्याही जिवावर आलें, तरी कन्येच्या आग्रहास्तव तिनें चुव्यांच्या ( उंदरांच्या ) बादशहास बोलावून आज्ञा केली कीं, " येथून बकावलीच्या बागापर्यंत एक भुयार तयार करून ह्या शहाज्याद्याला आपल्या मानेवर बसवून तो बाग दाखवून आण. पण संभाळ बरें, याच्या एका केंसाला जर धक्का लागला तर तुला शिक्षा करीन."

असें ऐकतांच त्या मूषकस्वरूपी राक्षसानें आपल्या सेनेला आज्ञा करून त्या मंदिरापासून बागेपर्यंत एक भुयार खणलें आणि शहाज्याद्याला आपल्या

खांद्यावर घेऊन तो त्याला त्या मनोहर बागेंत घेऊन गेला. बाग पाहतांच राजपुत्रास वाटलें कीं, " आतां ह्या बागेंत क्षणभर फिरावें आणि फूल घेऊन निघून जावें. " पण तो राक्षस त्याला आपल्या मानेवरून उतरूं देईना. तेव्हां शहाज्यादा ह्मणाला—" जर तूं मला ह्या बागेंत फिरूं देणार नाहींस, तर मी जीव देईन. " असें ऐकतांच तो राक्षस भय पावला आणि " लौकर पाहून परत ये. " असें सांगून त्यानें त्याला बागेंत सोडलें व स्वतः त्याची वाट पहात भुयाराच्या तोंडाजवळ बसला.

शहाज्यादा बागेंत शिरतांच पहातो तों सगळी जमीन सोन्याची आहे. बागेसभोंवती [illegible] भिंत आहे, ती ध्रुवमंडळापर्यंत उंच गेलेली असून तिला लाल, याकूत, जमरूद, हिरे, मोतीं, इत्यादि रत्नें खालपासून वरपर्यंत जडविलेलीं आहेत. बागेला पाणी पोंचविण्यासाठीं माणकांचे पाट बांधलेले असून त्यांतून सुवासिक गुलाबपाणी वहात आहे, प्रत्येक फळवृक्ष फलभारानें नम्र झालेला आहे व सर्व फळें रत्नांप्रमाणें चमकत आहेत. फुलझाडांचे असंख्य ताटवे लागून राहिले आहेत व सर्व फुलें फुलल्यामुळें अंधारी रात्र आहे तरी त्या बागेंत चंद्राप्रमाणें शांत प्रकाश पडला आहे. याप्रमाणें अवर्णनीय शोभा पहात पहात आनंदानें पुढें चालला आहे, तों एक चमत्कारिक ताटवा त्याच्या दृष्टीस पडला. तो असा कीं, ज्याच्या सभोंवतीं स्वच्छ व सुवासिक गुलाब पाण्यानें भरलेला एक हिरेजडित हौद आहे; त्याच्या आसपास नानाप्रकारचे वृक्ष आहेत; आणि जो हौदाच्या मध्यभागीं वैडूर्यांच्या आळयांत एकाच फुलानें भरगच्च झालेला आहे. तो ताटवा पाहतांच शहाज्याद्यानें निश्चयात्मक ठरविलें कीं, " ज्याला गुलबकावली ह्मणतात तो हाच ताटवा असला पाहिजे. " असें मनांत येतांच त्यानें अंगावरील वस्त्रें काढून ठेवून त्या हौदांत उडी टाकली आणि त्या ताटव्यापर्यंत पोंहत जाऊन त्यानें त्यावरील पुष्प काढून घेतलें. नंतर हौदाबाहेर येऊन पोषाख करून शोभा पहात पहात तो बकावलीच्या महालाकडे निघाला चार पावलें पुढें गेला नाहीं तों अकीक, पुष्कराज, वैडूर्य इत्यादिकांनीं शोभविलेला मनोरम महाल त्याच्या दृष्टीस पडला. त्या महालाच्या भिंतींवरून तीं अमूल्य रत्नें जडविलेलीं होतीं; त्यांचा लखलखीत प्रकाश पडलेला पाहतांच शहाज्याद्याचे डोळे दिपून गेले. तरी " येथपर्यंत आल्यासारखें मंदीर पाहून जावेंच, " असें मनांत आणून धैर्यानें तो त्या मंदिरांत शिरला. जी जी वस्तु त्याच्या पाहण्यांत येई, ती ती अप्रतिम ! प्रत्येक दिवाणखान्यांत सोनेरी जडावाचें काम नाहीं असें नाहींच. शहाज्यादा मागें फिरण्याच्या ओढीमुळें घाईघाईनें पहात एका रमणीय दिवाणखान्यांत आला आणि पाहूं लागला—तों एका जडावाच्या पलंगावर मच्छरदाण्या सोडून एक लोकोत्तर रूपवती अप्सरा आपल्या तारुण्यमदानें धुंद होत्साती उशाखालीं नाजुक हात घेऊन निजलेली आहे. जिच्या लावण्यामुळें सर्व आकाश प्रकाशित झालें आहे, अशी ती लावण्यलतिका पाहतांच शहाज्याद्याला देहभान नाहींसें झालें. तो क्षणभर

स्तब्ध होऊन चित्राप्रमाणें तिच्या रूपाकडे पहातच उभा राहिला. नंतर शुद्धी
येऊन तिला पूर्ण अवलोकन करून परत निघतेवेळीं त्यानें मनांत आणलें कीं
“ आपण याठिकाणीं आलों होतों, याबद्दल कांहीं तरी खुण ठेवून गेलें पाहिजे.
असा विचार करून त्यानें आपल्या हातांतून आपल्या नांवाची आंगठी काढ
ली व ती तिच्या बोटांत घालून हळूच तिच्या हातांतील आंगठी काढून घेऊ
आपलें अंतःकरण तिच्या जवळ ठेवून तेथून निघाला, तो राक्षसाच्या खांद्या
वर बसून हम्माला राक्षसीच्या महालांत आला. हम्मालाही त्याची काळजी
वाटच पहात होती; ती त्याला पाहतांच आनंदित झाली; त्याचप्रमाणें मेहमुदे
सही आनंद झाला.

## भाग ५ वा.

बकावलीनामक पुष्प हातीं येतांच एके रात्रीं आपली स्त्री मेहमुदा आनंद
आहे असें पाहून शहाज्यादा तिला ह्मणाला—“ प्रिये, या ठिकाणीं मला सर्व
कारें सौख्य आहे, कोणत्याही गोष्टीची वाण नाहीं. असें जरी आहे तरी मा
पिता, आप्त, इष्ट, मित्र, सोयरे, इत्यादि मनांत आले; ह्मणजे जें कांहीं दुः
होतें तें सांगून पुरवत नाहीं. ” असें ऐकतांच ती ह्मणाली—“ प्रियकरा, इत
दुःखित होण्याचें कारण नाहीं. उद्यां प्रातःकालीं मी आईजवळ ही गोष्ट सां
आणि तिचा निरोप घेतें. ”

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं जेव्हां मेहमुदेची व हम्मालेची गांठ पडल
तेव्हां तिनें आपल्या पतीची इच्छा तिला कळविली. कन्येचें भाषण ऐकतां
त्या राक्षसीला वियोग दुःख वाटलें, तरी “ कन्या सासरीं गेलीच पाहिजे
असें मनांत आणून, त्याचवेळेस एका राक्षसाला बोलावून तिनें आज्ञा के
कीं, “ ज्या ठिकाणीं हा शहाज्यादा तुला सांगेल, त्या ठिकाणीं याला या
स्त्रीसह पोंचवून दे. ” असें बोलून तिनें जांवयाला आंदण देण्यासाठीं ना
प्रकारचीं रत्नें, अलंकार, वस्त्रें, अशी अगणित संपत्ति एकत्र करून तिचा पर्व
सारखा बोजा बांधला व राक्षसाच्या डोकीवर दिला. नंतर आपल्या डोक
वरील दोन केश तोडून तिनें ताजुल्मुल्कास एक व मेहमुदेस एक देऊन सां
गितलें कीं, “ ज्या वेळेस तुह्मांला कोणताही प्रसंग पडेल, त्यावेळेस हा के
अग्निवर ठेवा, ह्मणजे अठरा हजार राक्षसांसह येऊन मी तुह्मांला साह्य करीन.
असें बोलून तिनें नेत्रांत प्रेमाश्रु आणले आणि शहाजाद्याच्या हातांत मेहमुदे
हात देऊन सांगितलें—“ बाळा, आजपर्यंत प्राणाही पलीकडे जिचें रक्षण के
ती प्रियकन्या आज माझें सर्वस्व ह्मणून तुझ्या हवालीं केली आहे. ” शहाज
द्यानें तिचे आभार मानून सांगितलें—“ आई, मी आपला प्राण तुझ्याच क
च्या हवालीं केला आहे; ह्मणून तिच्या रक्षणाविषयीं तुला कांहीं काळजी करा
ला नको. ” तो असें बोलतांच हम्मालेनें दोघांचीही मस्तकें अवघ्राण क
त्यास राक्षसाच्या हवालीं केलें आणि त्याला तांकिदीनें सांगितलें कीं, “ जे
ह्या माझ्या जांवयाच्या हातचें “ मी आपल्या घरीं सुखरूप पोंचलों. ” 



पत्र आणशील, तेव्हां आनंदानें तुला बक्षीस देईन; पण जर ह्यांत हरामखोरी
केलीस; तर तुला ह्या जगांतून नाहींसा करीन. माझी शक्ति तूं जाणतोस. ”

ही गोष्ट मूळ लिहिणारानें असें लिहिलें आहे कीं, शहाज्यादा हम्मालेचा नि-
रोप घेऊन मेहमुदेसह राक्षसाच्या खांद्यावर बसतांच त्यानें शहाजाद्यास विचा-
रलें.—“ मेहेरबान शहा साहेब, मी आपणाला कोणत्या ठिकाणीं नेऊन पोंचवूं ?
शहाजाद्यानें “ फिरदोस ” एवढा उच्चार मात्र केला; तों त्या राक्षसानें त्यांस
फिरदोस येथील लख्खा बागेंत नेऊन उभें केलें.

ती बाग दिलबरलख्खानामक गणिका जिला शहाज्याद्यानें द्यूतांत जिंकलें
होतें, तिचीच होती आणि ती गणिका शहाज्याद्यासाठीं रात्रंदिवस झुरत होती.
तिचा नियम असा होता कीं, नित्य प्रातःकालीं प्रातर्विधि उरकतांच त्या बागेंत
यावें आणि दहा घटिका दिवस येईपर्यंत आपल्या प्रियकराची मार्गप्रतीक्षा
करीत बसावें. राक्षसानें दोघांस त्या बागेंत नेऊन उतरलें आणि शहाज्याद्या
जवळ सुखरूप पोंचल्याबद्दल पत्र लिहून मागितलें. इतक्यांत दिलबरलख्खा
नियमाप्रमाणें तेथें आली आणि ज्याचें आपल्या हृदयांत रात्रंदिवस चिंतन क-
रीत होती, त्यालाच बागेंत उभा पाहून हर्षातिशयानें धांवली व बेशुद्ध होऊन
ताजुल्मुल्काच्या पायांवरच पडणार होती, तों त्यानें तिला सांवरून धरिलें.
नंतर शहाज्याद्यानें तिला सावध करून मंदिरांत नेलें आणि पहिल्यानें हम्मा-
लेस “ मी मेहमुदेसह फिरदोस येथें सुखरूप पोंचलों ” असें पत्र लिहून दिलें.
नंतर राक्षसाचें भेटणें, त्याच्या मेहेरबानीनें हम्मालेची गांठ, मेहमुदे बरोबरचा
विवाह आणि भुयारमार्गानें जाऊन बकावलीच्या बागांतील सहल, इत्यादि
गोष्टी त्यानें गणिकेला सांगितल्या. त्या ऐकतांच गणिकेनें मेहमुदेस प्रेमालिं-
गन दिलें आणि बहिणीप्रमाणें मान देऊं लागली. शहाज्यादा कित्येक दिवस
दोन्ही स्त्रियांचा उपभोग घेत फिरदोस शहरांत राहिला होता. नंतर त्यानें
पूर्वेकडील राज्यांत असलेल्या स्वस्थानास जाण्याची आपली इच्छा गणिकेस कळविली आणि सर्व संपत्ती-
सह जाण्याचा निश्चय करून सर्व मालमत्ता तारवांत भरली. तेव्हां तुरुंगावरील
दरोगा येऊन शहाज्याद्यास ह्मणाला—“ हजरत, पूर्वेकडील चौघे शहाज्यादे
मात्र अजून आपल्या हुकुमानें कैदेंत आहेत; त्यांची काय व्यवस्था करावया-
ची, तो हुकूम व्हावा. ” असें ऐकतांच शहाज्याद्यानें गणिकेला सांगितलें—
“ जोंपर्यंत माझे चौघे बंधु तुझ्या नांवाचा डाग मानेवर घेण्यास कबूल हो-
णार नाहींत, तोंपर्यंत तूं मी तुझीं कितीही आर्जवें केलीं तरी माझें ऐकूं नको.
लाशक त्यांच्या मानेवर “ दिलबरलख्खेचे गुलाम ! ” असे डाग दे. ग-
णिकेनें ती गोष्ट कबूल केली आणि चौघांसही आपल्या समोर बोलावून शहा-
ज्याद्याचें न ऐकतां त्यांच्या मानेवर गुलामीचे डाग दिले. नंतर शहाज्याद्यानें
त्यांचें शांतवन करून त्यांस पोषाख व एक लक्ष रुपये खर्चे करण्यासाठीं दिले.
ते घेऊन लाचारीमुळें लाजिरवाणें, अक्षयींचा डाग पावलेले चौघेही शाहाज्यादे
दुसऱ्या एका शहरांत गेले व कांहीं थोडा माल खरेदी करून आपल्या शहरा

कडे चालते झाले. ताजुल्मुल्कही आपल्या सर्व संपत्तीसह स्त्रिया जलमार्गा पाठवून स्वतः फूल घेऊन फकीराच्या वेषानें त्यांच्या मागून निघाला.

### भाग ६ वा.

असें सांगतात कीं, ताजुल्मुल्क फकीराच्या वेषानें एका अरण्यांत आला, एक वृद्धफकीर अंधत्वामुळें दुःख करीत मार्गानें ठेंचा खात व कळवळत चा लला आहे. त्याला पाहतांच शहाज्याद्याचे मनांत आलें कीं, " आपण जिवापा कष्ट करून बकावलीचें फूल मिळवून आणलें आहे खरें; पण त्याचा अनुभ घेतल्याशिवाय त्याजवर विश्वास ठेवितां येत नाहीं. ईश्वर करो, या अंधाचे नें आले तर आपल्याला हा मनापासून दुवा देईल. " असें मनांत येतांच त्या त्या अंधाला थांबवून त्याच्या नेत्रांस तें फूल लाविलें. फुलाचा नेत्रांला स्प होतांच त्या ठिकाणीं चमत्कारिक सीतता उत्पन्न झाली व एकाएकीं त्या वृ फकीरास दिसूं लागलें ! त्यानें शहाज्याद्याचे आभार मानून त्याला अंतःकर पूर्वक आशीर्वाद दिला आणि आपला मार्ग धरिला.

त्या फकिराला व्यापाऱ्याच्या वेषानें आपल्या शहरास जात असलेले चौ शहाज्यादे मार्गांत भेटले. ते आपसांत आतां बापाला काय सांगावें आ आपली प्रतिष्ठा कायम राखावी ह्मणून विचार करीत होते. एक ह्मणाला—" गु बकावलीचा बाग वैद्यांशिवाय कोणाच्यांही सांगण्यांत व ऐकण्यांत नाहीं सांगावें. " दुसरा ह्मणाला—" तसें रुचणार नाहीं. बकावली नामक अप्स स्वर्गांत आहे व तो बागही तेथेंच आहे असें सांगावें. " तिसरा ह्मणाला—" शोभत नाहीं. भलतें कसलें तरी अनोळखी जंगली फूल घेऊन जावें आ कौम लोकांला मूर्खांत काढावें. " चौथा ह्मणाला—" अरे बाप आपल्या दुर्दैवा अंध झाला; त्याच्यासाठीं आपण मुलांनीं जीव द्यावा असें कोणीही सांगण नाहीं. आर्धी मानेवरचे लाजिरवाणे डाग कसे जातील याचा विचार करा. हीं सर्व भाषणें त्यांच्या मागून चाललेला फकीर ऐकत होताच. चवथ्याचें पण तिघांस न रुचल्यामुळें ते बापाला खोट्या नाट्या बाता मारून फस ज्याचा जेव्हां विचार करूं लागले; तेव्हां तो वृद्ध फकीर पुढें झाला आणि त्यां धिःकार करून ह्मणाला—" मूर्खहो, व्यर्थ बादशहाचे पोटीं उत्पन्न झाले त्याला खोट्या गोष्टी सांगून प्रतिष्ठा मिरवूं पहाल तर तसें कधीं होणार ना बकावलीच्या बागांतील फूल घेऊन एक पराक्रमी तरुण नुकताच पुढें गे आहे. ईश्वर त्याचें कल्याण करो ! त्यानेंच माझ्या ह्या अंध झालेल्या नेत्र तें फूल लावून मला हें विस्तीर्ण जग पुनः दाखविलें. मी कोणाची उग तारीफ करणार नाहीं, आणि कोणाच्या व्यर्थ वढायाही ऐकणार नाहीं. " ऐकतांच चौघांनींही कपटाची नम्रता धरून त्या फकिराजवळ त्या बकावली फुलाची चौकशी आरंभिली. ते ह्मणाले तें बकावलीचें फूल घेऊन जाण कोणी एकटाच आहे किंवा त्याचे कोणी साथिदार आहेत ? तो गृहस्थ किंवा फकीर आहे ? इत्यादि अनेक प्रश्न ऐकून तो फकीर सांगूं लागला



सभाग्य तरुण महातेजस्वी असल्यामुळें कोणी तरी राजपुत्र असावा असें वाटतें. तुह्मांला जर त्याची गरज असेल तर जाऊन चौकशी करा. अजून कांहीं तो फार लांब गेला नसेल. असें ऐकतांच ते चौघेही घोडे उडवीत ताजुल्मुल्काचा शोध करीत निघाले.

फकीराला नेत्र आल्यामुळें " आज आपल्याहातून एक सत्कर्म घडलें " असें मनांत आणून ताजुल्मुल्क आनंद मानीत चालला होता. तों आपल्या मागून कोणी घोडे उडवीत येत आहेत, असें घोड्यांच्या टांपावरून त्याला वाटलें आणि त्यानें मागें पाहिलें, तों आपले चौघेही बंधु आपल्याच अंगावर येत आहेत. असें दिसल्यामुळें तो बाजूलों झाला; पण ज्यानीं फकीराजवळ त्यांची पूर्ण चौकशी केली होती; ते त्याला काय सोडणार ? तो एका झऱ्याजवळ जाऊन बसत आहे तों चौघेही त्याच्या सभोंवतीं जाऊन उभे राहिले आणि त्याला विचारूं लागले–तुह्मीं बकावलीचें फूल मिळवून आणलें आहे आणि आंधळ्याला दृष्टि देतां असें ऐकलें हें खरें आहे काय ? असें ऐकतांच ताजुल्मुल्क ह्मणाला—बकावलीचें फूल माझ्यापाशीं आहे खरें; पण त्याचा तुह्मांला चमत्कारच पाहणें असेल तर चौघांपैकीं एकाचा नेत्र फोडा ह्मणजे दाखवितो. असें ऐकतांच ते चौघे ह्मणाले–आधीं जर फुल दाखवाल, तर त्याचा अनुभव पाहण्यासाठीं कोणाचा तरी डोळा फोडूं, किंवा एखादा अंध धरून आणूं. असें ऐकतांच ताजुल्मुल्कानें कबरेचें फूल सोडून त्याला दाखविलें. तें पाहतांच " पाहूं पाहूं ? " ह्मणून त्या चौघांनीं त्याच्या हाताला झोंबून तें फूल हिसकावून घेतलें आणि त्याला मूर्छित पडे पर्यंत मार देऊन, तसाच लोळत टाकून घोडे उडवित पुढें चालते झाले.

बकावलीचें फूल हातीं येतांच चौघांनींही आपल्या शहराचा मार्ग धरिला आणि बापाच्या राज्याच्या सरहद्दीवर येतांच त्यानीं आपण गुलबकावली घेऊन आल्याची खबर आपल्या बापाकडे पाठविली. जैनुल्मुल्क बादशहा पुत्रांचा फार दिवस शोध नसल्यामुळें चिंताच करीत होता. त्याला जेव्हां पुत्र कृतकार्य होऊन आले असें समजलें, तेव्हां अत्यानंद झाला आणि ईश्वराचे आभार मानून तो त्यांस आणावयासाठीं स्वतः कांहीं मजला पुढें आला. बापाला पाहतांच चौघानींही धांवत जाऊन त्याच्या चरणांचें चुंबन घेतलें. जैनुमुल्कानेंही त्यांची मस्तकें अवघ्राण करून त्यांस वात्सल्यानें हृदयाजवळ धरिलें. नंतर त्याच ठिकाणीं त्या चौघांही कपटी पुत्रांनीं तें फूल बापाच्या नेत्रांस लाविलें. त्यावेळेस जैनुल्मुल्क बादशहाच्या नेत्रांला अशीकाहीं चमत्कारिक सीतता उत्पन्न झाली कीं, त्याच्या नेत्रांचा जो कांहीं सारखा भडका चालला होता, तो एकाएकीं शांत झाला आणि अकस्मात त्याच्या नेत्रांला दिव्यतेज प्राप्त झालें ! त्यावेळेस " हें जग मला पुन्हां दिसलें ! " असें त्याच्या मनांत आलें आणि आधीं ईश्वराचे व नंतर त्या चौघांही पुत्रांचे अभार मानून त्यानें आपल्या वजीरास आज्ञा केली कीं, अजपासून एक वर्ष पर्यंत माझ्या सर्व राज्यांत अनंदोत्साह चालू करा.

याप्रमाणें आज्ञा करून तो आपल्यापुत्रांसह आनंदानें त्या ठिकाणा पासन प्र रात करीत आपल्या नगरांत आला.

### भाग ७ वा.

लिहिणारानें असें लिहून ठेविलें आहे कीं, जेव्हां बकावली परी आपल मंदिरांत जागृत झाली आणि गजराजासारख्या मंदगतीनें गुलावपाण्यानें भर ल्या हौदावर येऊन मुखप्रक्षालन करूंलागली, तेव्हां अकस्मात तिची दृष्टि हौदां ल ताटव्यावर गेली आणि त्यावरील अमोलिक पुष्प न दिसल्यामुळें दुःखि झाली व अशा संरक्षरणांतून पुष्प कोणी चोरून नेलें असावें, ह्मणून विचार रू लागली; तों हातांतील आंगठीवरही तिची दृष्टि पोंचली आणि ती बदल आहे असें दिसतांच तिचा धीर पूर्ण सुटला ? ती ह्मणूं लागली–" मी हे स्व तर नाहीं पहात ? पण स्वप्नांत अशा गोष्टींचा प्रत्यक्ष प्रत्यय येत नाहीं. " ठ गठीवर ताजुल्मुल्काच्या नांवासह त्याचा चेहरा मोठ्या कसबानें कोरले होता. त्याचें अप्रतिम सौंदर्य पाहतांच बकावली परी मोहित झाली. तरी आप ती विरहज्वराची स्थिति वाह्यात्कारीं न दाखवितां मुखप्रक्षालन करून राग याकूताच्या महालांत आली आणि सगळ्या पऱ्या एके ठिकाणीं जमवून फु विषयीं चौकशी करूंलागली. " अठरा हजार राक्षस पाहेरकरी बाहेर आ तुह्मी सर्व पऱ्या आंत पाहरा करीत असतां माझें फूल कोणी चोरून नेलें स गा ? " असा जिला तिला प्रश्न करूं लागली; पण ज्या बिचाऱ्यांना कांहीं ठाऊक नाहीं, त्या उत्तर काय देणार ? शेवटीं संतापून बकावलीनें सर्व पऱ्यां स सांगितलें–" जर माझ्या फुलाचा आणि त्याला चोरून नेणाराचा शोध क न त्याला आणाल तर ठीक आहे; नाहीं तर मी तुमचा प्राण घेववीन. " अ ऐकतांच सातशें पऱ्या आकाशांत उडाल्या व त्या फुलाचा शोध नाहीं ह्मणू एका क्षणांत परत आल्या.

शेवटीं कोणाच्यानेंही शोध लागत नाहीं, असें जाणून विषयमदानें वे झालेली बकावली स्वतःच आपल्या सुमनचोराचा शोध करण्यासाठीं निघा पण अशा तऱ्हेनें कीं, तिनें मात्र सर्वांना पहावें आणि तिला कोणी पाहूं न हें कृत्य तिला सहज होतें. जादू व मांत्रिकविद्येंत ती इतर पऱ्यां फार श्रेष्ठ होती. कित्येक दिवसपर्यंत ती गुप्तराहून आपल्या प्रियकराचा शो करीत होती पण तिला कोणत्याही प्रकारें शोध लागेना. शेवटीं फिरतां फिर ती जैनुल्मुल्काच्या राज्यांत आली आणि पाहूं लागली; तों प्रत्येक लहान मनुष्य उंची पोषाख करून आनंदानें फिरत आहे; सगळे बाजार चैनीच्या स्तूंनीं भरलेले आहेत आणि जिकडे तिकडे नाचरंग चालला आहे. असा प्रथ पाहतांच ती आश्चर्यचकित झाली. नंतर स्वतः पुरुष वेषानें प्रकट होऊन ति एका मनुष्याला विचारिलें "ह्या शहरांत सर्व ठिकाणीं आनंद व नाच चालला आहे याचें कारण काय ? " असें ऐकतांच त्यानें बाशहाच्या चौ पुत्रानीं गुलबकावली आणून बापाचे नेत्र बरे केले इत्यादि सगळी हकीकत त



व ळविली आणि बादशहाला नेत्र आल्याबद्दल आनंद झाला आहे ह्मणून सगळी प्रजा आनंदांत आहे, असेंही त्यानें तिला सांगितलें. तेव्हां आनंदित होऊन आपली इच्छा आतां खचित पूर्ण होणार असें मनांत आणून तिनें ईश्वराचे आभार मानिले आणि बादशाही वाड्याचा शोध करीत निघाली. तिचें पुरुषवेषांतील लोकोत्तर लावण्य पाहून प्रत्येक पाहणारास " हा स्वर्गींचा देव आनंदानें येथें आला आहे " असें वाटे. जोतो तिच्या रूपाची तारीफ करूं लागला आणि जों ती बादशाही वाड्यांत पोंचली नाहीं, तों आधींच बादशहाला तिची वर्दी लागली आणि बादशहाचे हुकुमानें तिला वाड्यांत नेण्यासाठीं लोक पुढें आले व तिला दरबारांत घेऊन गेले. बादशहा जैनुल्मुल्क बकावलीचा पुरुषवेष पाहतांच प्रसन्न झाल व तिची चौकशी करूं लागला. तेव्हां ती ह्मणाली–" हजरत, मी पश्चिम प्रदेशांतील राहणारा आहें. माझें नांव जानबक्ष. खावंदाची कीर्ति ऐकली आणि मुद्दाम खिदमतींत राहण्यासाठीं आलों आहें. " असें ऐकतांच बादशहानें प्रसन्नांतःकरणानें तिला आपल्या पदरीं ठेवून घेतलें आणि जनानखान्यासह सर्वत्र ठिकाणीं संचार करण्याची परवानगी दिली.

इतक्यांत बादशहाचे चौवेही पुत्र त्याच्या पादवंदनासाठीं आलेले बकावलीच्या दृष्टीस पडले, आणि हेच बकावलीच्या बागांतील फूल आणणारे, असेंही तिला कळलें, परंतु त्यांची चर्या तसें साहस कर्म करण्याची दिसेना; ह्मणून ती " ह्या बादशहास पांचवा पुत्र आहे काय ? आणि तोही यांच्या बरोबर बकावलीच्या बागांत फूल आणण्यासाठीं गेला होता कीं काय ? " अशी चौकशी केली; पण पांचवा पुत्र नव्हता आणि हेच चौघे फूल आणणारे. असेंच जेव्हां खात्रिपूर्वक सगळ्या लोकांनीं तिला सांगितलें, तेव्हां मात्र ती फार घोंटाळ्यांत पडली. नंतर आपल्याशींच विचार करूं लागली ! "आतां त्याला कोठें शोधावें ! ह्यां चौघांपैकीं एकाचीही शक्ति माझ्या बागेंतून जाऊन येण्याची नाहीं. माझ्या बागेंत येऊन फूल चोरून धैर्यानें मला पाहून आंगठी बदलून जाणारा पुरुष फार चतुर असला पाहिजे. त्याचें तेज सर्व लोकांवर सहज पडलें पाहिजे. तर आतां त्याचा शोध कोणत्या ठिकाणीं करावा ! ज्या ठिकाणीं फूल असेल त्याच ठिकाणीं तो असला पाहिजे, अशी मनाला आशा होती ती आज अगदीं नाहींशी झाली. " इत्यादि अनेक विचार करून वियोग अनुभवीत तिनें निश्चयात्मक असें ठरविलें कीं, " जरी हे नाहीं ह्मणतात तरी बादशहाला पांचवा पुत्र असला पाहिजे. " अशा मनोविचारांत गर्क होऊन तिनें कांहीं दिवस त्याच ठिकाणीं राहण्याचें ठरविलें. तिला असें वाटलें कीं, खऱ्या फूल आणणाराचा शोध कांहीं अवकाशानें कां होईना; पण तो येथेंच लागेल असा संभव आहे. ह्या प्रमाणें विचार करून ती त्याच ठिकाणीं राहिली.

मूळ फारशी भाषेंत गोष्ट लिहिणारा ह्मणतो–" सुभानअल्ला ! माशुक आषकाचा शोध करीत फिरते, हा उलटा प्रकार नव्हे ? "

## भाग ८ वा.

ताजुल्मुल्काला बेशुद्ध करून धुळींत लोळत टाकून चौघे शहाज्यादे पुढें न त्यावर मागून तो वृद्ध फकीर त्या ठिकाणीं आला आणि ताजुल्मुल्कास त्या खराब स्थितींत पाहून त्यानें त्याला सावध केलें. " आपल्या जवळचें फूल विनाकारण गेलें " असें मनांत आणून दुःखी झालेल्या ताजुल्मुल्कानें जेव्हां त्या फकीराला पाहिलें व " मीच त्या शहाज्याद्यांस तुजकडे पाठविलें " असें त्याच्या तोंडानें ऐकलें, तेव्हां त्याला फार राग आला व त्या रागावरोबर त्यानें हात चोळले. तों असा चमत्कार झाला कीं, एकाएकीं त्या ठिकाणीं पर्वताप्रमाणें देह धारण करणारा राक्षस येऊन ताजुल्मुल्का पुढें हात जोडून उभाच राहिला. त्या भयंकर राक्षसास पाहतांच वृद्ध फकीराची तर बोबडीच वळली आणि तो पळून गेला. नंतर शहाज्याद्यानें त्या राक्षसाला विचारिलें कीं " तूं येथें कां व कसा आलास सांग ? " राक्षस ह्मणाला—" खुदावंत, आपल्या हातांत बकावली परीच्या हातांत असणारी आंगठी आहे व त्या आंगठीचा मी चाकर आहें. ती ज्याच्या जवळ असेल त्याची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. आपण ती आंगठी हातानें चोळलीत ह्मणून मी या ठिकाणीं तुमची सेवा करण्यासाठीं आलों आहें. " असें ऐकतांच आनंद मानून शहाज्याद्यानें त्याला सांगितलें कीं," मी लहानपणीं ज्या अरण्यांत वाढलों; तें हल्लीं ओसाड आहे. त्या ठिकाणीं मला घेऊन चल. " असें ऐकतांच शहाज्याद्यास त्या राक्षसानें उचललें आणि एका क्षणांत त्या अरण्यांत नेऊन उभें केलें. नंतर त्याला जाण्याचा हुकूम करून ताजुल्मुल्कानें आपल्या सासूनें ( हम्माला राक्षसिनें ) दिलेला केश काढला व अग्नीवर ठेविला. त्याचा वास त्या राक्षसीला एका निमेषांत पोंचला व अठरा हजार राक्षसांसह ती त्या ठिकाणीं येऊन ऊभी राहिली. जेव्हां तिनें ताजुल्मुल्काला फकीराच्या वेषांत अरण्यवासी एकटाच पाहिलें, तेव्हां तिला फार वाईट वाटलें आणि " माझ्या मुलीला कोठें टाकलेंस " असें ती त्याला विचारूं लागली. तेव्हां ताजुल्मुल्क ह्मणाला—" माते, तुझ्या ममतेनें सगळी व्यवस्था नीट आहे. मी फकीर मुद्दामच बनलों आहें; पण आज तुझ्या साह्याची गरजच लागली ह्मणून तुला तसदी दिली आहे. माते, माझी अशी इच्छा आहे कीं या जंगलांत बकावलीच्या बागाप्रमाणें बाग व महाल तयार व्हावा आणि त्यांत मेहमुदेसह ऐषआराम भोगीत रहावें " असें ऐकतांच ती ह्मणाली—" पुत्रा कांहीं चिंता नाहीं. थोड्या दिवसांतच मी तसा बाग व महाल तयार करून तुला देतें. " असें बोलून तिनें राक्षसांना आज्ञा केली कीं " पहिल्यानें जाऊन सोनें, हिरे, पाच, माणिक, मोतीं, पुष्कराज, अकीक, याकूत, लाल, इत्यादि रत्नें आणून त्यांच्या राशी घाला आणि महाल व बाग तयार करण्यासाठीं ज्या ज्या वस्तूंची गरज लागेल त्या त्या सर्व आणून देण्यास तयार असा. " असें ऐकतांच कित्येक राक्षस आकाशमार्गानें उडून गेले व त्यांनीं सोन्या रुप्याच्या

व नानाप्रकारच्या रत्नांच्या त्या ठिकाणीं राशी तयार केल्या. नंतर हुम्माला बाग व महाल तयार करूं लागली. पहिल्यानें शंभर शंभर गज, पाये खणले व संगमरवरानें भरले. दोन दोन गज नंतर त्यावर सोनें ओतून सर्व पाये मढविले आणि महालाचें काम सुरू केलें. त्याच प्रमाणें जिकडे तिकडे सोन्याची माती पसरून बागेच्या कामाचीही सुरवात केली.

असें सांगतात कीं, त्या राक्षसीमायेच्या कर्तृत्वामुळें थोड्क्याच दिवसांत त्या जंगलांत बकावलीच्या बागाप्रमाणें सर्व वृक्षवल्ली इत्यादिकांसह बाग व महाल तयार करून त्या राक्षसीनें शहाज्याद्याच्या हवालीं केला. त्याचप्रमाणें त्याचें भांडारगृह अपार संपत्तीनें भरून दिलें आणि तेथें मनुष्य वस्ती होइ पर्यंत मनुष्यरूपानें कित्येक राक्षस शहाज्याद्याच्या खिदमतींत ठेवून ती राक्षसी आपल्या ठिकाणीं निघून गेली. नंतर शहाज्याद्यानें आपल्या स्त्रिया बंदरांत येऊन उतरण्याच्या सुमारास सेवकांसह बंदरावर जाऊन सर्व संपत्तीसहवर्तमान दोन्ही स्त्रिया मोठ्या डामडौलानें त्या महालांत आणून ठेविल्या.

## भाग ९ वा.

ताजुल्मुल्क आपल्या दोन्हीं स्त्रियांसह त्या रत्नजडित महालांत राहून सुखानुभव घेत असतां त्याचा एक गुलाम–ज्याचें नांव " सय्यद " होतें, तो सहज एके दिवशीं त्या अरण्यांत सहल करण्यासाठीं फिरत असतां त्याला कित्येक लांकुडतोड्ये आढळले. जेव्हां त्यांजपाशीं जाऊन तो ते कोठील राहाणारे वगैरे चौकशी करूं लागला; तेव्हां ते सिकंस्थान शहरांतील मोळीविक्ये आहेत असें त्याला कळलें. नंतर तो त्यांना ह्मणाला–" जर तुह्मीं आमच्या मालकाकडे येऊन ह्या मोळया द्याल, तर तो तुह्मांला दुप्पट दाम व शिवाय इनाम देईल. तो जवळच एक बाग व महाल तयार करून राहिला आहे. " ते ह्मणाले–" आमचा सगळा जन्म या अरण्यांत फिरून गेला. आजपर्यंत कांहीं आह्मीं असें ऐकिलें नाहीं कीं, कोणी ह्या जंगलांत महाल बांधून रहात आहे किंवा शहर आहे." सय्यद ह्मणाला–" तुह्मीं माझ्या बरोबर चला, ह्मणजे तुमची खात्री होईल. " असें ऐकतांच ते त्याजबरोबर निघाले; पण कांहीं चालून पाहतात तों पुढें अग्नीचा पर्वत उभा आहे ! तो पाहतांच ते त्या सय्यदाला ह्मणाले– " अरे बाबा तूं आह्माला आगींत लोटण्यासाठीं नेतोस कीं काय?" सय्यदानें त्यांला सांगितलें " घाबरूं नका. माझ्या श्रीमान् मालकाचा तो रत्नजडित महाल आहे. "लांकुडतोड्ये चार पावलें पुढें चालून पाहतात तों खरेंच ! जमीनही सोन्याची आहे !

सय्यदानें त्या सर्वांस ताजुल्मुल्काजवळ नेलें. त्यांस पाहतांच ताजुल्मुल्कानें पसा पसा मोत्यें इनाम देऊन शिवाय त्यांच्या मालाची किंमत दिली आणि त्यांला सांगितलें कीं, " जर तुह्मीं सर्व आमच्या या नव्या शहरांत येऊन रहाल तर तुह्मांला सुखी करीन. " लकडतोड्ये शहाज्याद्याचीं मधुर भाषणें ऐकून व त्यानें दिलेलें इनाम घेऊन फारच खुष झाले आणि आपल्या इष्टमित्रांसह पहिल्यानें सिकंस्थान सोडून ताजुल्मुल्काच्या महाला शेजारीं येऊन राहिले.

सिकेस्थान शहरांत हळू हळू ताजुल्मुल्काच्या महलाची व बागाची बातमी पसरत चालली व कित्येक लोक ती शोभा पाहण्यासाठीं ह्मणून तिकडे जात;— ते तिकडचेच रहिवासी होत. अशा चमत्कारिक प्रकारामुळें शहरांतलि वस्ती अगदीं कमी झाली. तेव्हां कोतवालानें जैनुल्मुल्क बादशहाकडे स्वतः जाऊन वर्दी दिली कीं—"येथून सुमारें १५,२० कोशांवर जें भयंकर ओसाड अरण्य आहे; त्या अरण्यांत कोण्या एकानें एक शहर, बाग आणि महाल तयार केला आहे. त्या शहराच्या आसपास पांच पांच कोसपर्यंत सगळी जमीन सोन्याची तयार केली आहे. शहराची रचना तर अप्रतिमच आहे; पण त्या शहराच्या मध्यभागीं जो एक बाग आहे तो व त्यांत एक त्याचा स्वतः राहण्याचा महाल आहे त्याचें तर वर्णनच करवत नाहीं ! त्या कामांत हिरे, माणकें, मोत्यें इत्यादि रत्नें किती जडलीं आहेत ह्याचा अंत लागत नाहीं. लोक ह्मणतात कीं, तो महाल व बाग स्वर्गांतून खालीं आलेला आहे " हें वर्तमान ऐकतांच बादशहा आश्चर्यचकित होत्साता सभाजनांकडे पाहूं लागला; तेव्हां कोतवाल पुनः ह्मणाला—" हुजूर, माझें बोलणें जर खोटें वाटत असेल तर स्वतः पहावें आणि खात्री करून द्यावी. त्या महालाचा मालक इतका उदार आहे कीं, अगदीं गरीब लोकांलाही त्यानें धनाढ्य केलें. शिवाय आपल्या औदार्यानें सिर्केस्थान ओसाड पाडलें; आणखीं किती मुलूख ओस करून आपल्या सभोंवती मनुष्यवस्ती करील याचा नेम मला लागत नाहीं. खरोखर त्याचा सर्वच प्रकार विलक्षण पाहून असें वाटतें कीं तो मानव नव्हे. चमत्कारिक प्रकारची शक्ति ठेवणारा एक देव आहे. " असें ऐकतांच बादशहा मोठ्या अचंब्यांत पडला आणि "इतकी कुबेरासारखी संपत्ति त्यानें कोठून आणली असावी ? " ह्मणून तो विचार करूं लागला. तेव्हां एक वजीर सांगतोः—

हजरत, पूर्वी एका बादशहाच्या कन्येला एका राक्षसानें आपलें पौरुष दिलें होतें. त्याप्रमाणें या तरुण पुरषालाही संपत्ति कांहीं प्रसंगानें कोणी दिली असेल व ती तशीच कायम राहिली असेल." बादशहा ह्मणाला—"तो प्रकार काय तो मला सांग " असें ऐकतांच वजीर सांगतो—

पूर्वी एका बादशहानें शंभर स्त्रिया वरेल्या होत्या; पण एकीलाही संतती होईना. पुढें ईश्वरकृपेनें एका स्त्रीला गर्भ राहिला व नव मास पूर्ण होतांच कन्या झाली. बादशहाला किंचित् आनंद झाला; परंतु पुढें त्याच स्त्रीला एकावरएक तीन कन्याच झाल्या आणि चौथे वेळीं तीच स्त्री गर्भवती झाली तेव्हां बादशहानें ठराव केला कीं, आतां जर कन्या झाली तर मारून टाकीन. ईश्वरेच्छेनें चौथ्या वेळेसही त्या स्त्रीला कन्याच झाली, ती फारच रूपवती. तेव्हां तिच्या मातेनें त्या कन्येच्या जीवाच्या भयास्तव पुत्र झाला असेंच प्रसिद्ध केलें आणि जोश्यांकडून बादशहाला कळविलें कीं"आपण एक वर्षपर्यंत पुत्राचें तोंड पाहूं नये." पुढें जसजशी ती कन्या मोठी होत चालली तसतशी तिची माता तिला शिकवूं लागली कीं, " बाई, बादशहाच्या समोर तूं पुत्रा सारखी वागत जा

नाहीं तर तुझा व्यर्थ जीव घेतील." असो. ती कन्या उत्तरोत्तर नाना प्रकारच्या विद्यांत व कला कौशल्यांत तयार होतांच बादशाहानें दुसऱ्या एका बादशहाच्या कन्येबरोबर तिचा विवाह ठरविला. पण जेव्हां त्या कन्येला समजलें कीं " आपला बाप आपलें लग्न दुसऱ्या एका बादशहाच्या कन्ये बरोबर करीत आहे." तेव्हां ती पुरुषरूपी बादशहाची कन्या विचारांत पडली आणि एके रात्रीं एकटीच निघून एका भयंकर घोर अरण्यांत शिरली. त्या अरण्यांत एक राक्षस रहात होता; त्यानें जेव्हां त्या कन्येचें रूदन ऐकलें, तेव्हां त्याला तिची दया आली व त्यानें प्रसन्न होऊन "तुझें काम होई पर्यंत माझें पुरुषत्व घेऊन जा." असें सांगून आपलें पुरुषत्व त्या कन्येला देऊन स्वतः स्त्री होऊन बसला. नंतर ती कन्या आपल्या शहरांत आली; तिचें दुसऱ्या एका बादशहाच्या कन्ये बरोबर लग्न झालें आणि थोडक्याच कालांत तिला एक पुत्रही झाला. तेव्हां राक्षसाचें पौरुष राक्षसाला देऊन आपलें स्त्रीत्व आपण परत घ्यावें, असें मनांत अणून जेव्हां ती कन्या परत त्या राक्षसाकडे गेली; तेव्हां त्यानें तिला सांगितलें कीं "आतां तें पुरुषत्व तुलाच असो मी तुझें स्त्रीत्व घेऊन गरोदर झालों आहें. आतां जर पुरुष होऊन राहिलों तर प्रसूतिकालीं विनाकारण मरूनजावें लागेल, म्हणून मी तुझें स्त्रीत्वच आनंदानें कबूल केलें आहे." असें ऐकतांच ती कन्या अक्षयी पुरुष होऊन आपल्या राज्यांत आली.

अशी गोष्ट सांगून वजीर बादशहास म्हणतो–" ईश्वराला कोणतीही गोष्ट दुर्घट नाहीं. त्याच्या कृपेनें रावाचा रंक आणि रंकाचा राव सहज होत असतो. आतां जो तरुण आपल्या शहरा जवळ शहर वसवून आपली वस्ति ओसाड करीत आहे; तो कोण आहे? त्याची शक्ति किती आहे आणि त्याच्या मनांत काय आहे? हें समजून घेऊन त्या प्रमाणें वागणें आपलें कर्तव्य आहे." असें ऐकतांच बादशहानें त्याच वजीरास हुकूम केला कीं, " उद्यां तुम्ही स्वतः त्या नगरांत जा आणि त्याच्या मालकाची काय इच्छा आहे, या बद्दल चौकशी करून या."

### भाग १० वा.

दुसरे दिवशीं जैनुल्मुल्क बादशहाचा वजीर ताजुल्मुल्काचें नवें शहर पाहण्यासाठीं गेला आणि त्या शहरांत पोंचल्या पासून ताजुल्मुल्काची भेट होईपर्यंत त्यानें जी जी वस्तु पाहिली; ती ती त्याला अप्रतिम व देवलोकचीच आहे असें वाटलें. तो येत आहे अशी जेव्हां ताजुल्मुल्काकडे वर्दी आली; तेव्हां त्यानें सेवकांसह पुढें जाऊन मोठ्या सन्मानानें त्या वजीराला आपल्या जडावाच्या महालांत आणून सोन्याच्या खुर्चीवर बसविलें. तो वजीर जिकडे पाहत असे तिकडे त्याला सर्व जवाहिराचा चकचकाट दिसे. ताजुल्मुल्कानें त्याचा आदर सत्कार करून प्रश्न केला कीं, "आपण कोणत्या ठिकाणाहून व कोणत्या कार्यासाठीं आलां आहां हें कृपा करून सांगावें?" याप्रमाणें विचारितांच वजीर म्हणतो–"हजरत, आपण सिर्केस्थाना नजिक हें शहर नवीन वसविलें आणि सिर्केस्थान ओसाड करण्याचा विचार चालविला आहे. हें बादशहा जैनुल्मुल्क यास कळल्यावरून

त्यानें मला मुद्दाम तुमच्या चौकशी करितां पाठविलें आहे. कारण–एकाच प्रांतांत दोघे बादशहा किंवा एकाच मेणांत दोन सुऱ्या सहन होत नाहींत. आपली मर्जी असेल तर जैनुल्मुल्क बादशहा जवळ सल्ला करून त्याच्या मसलतीनें असावें, अथवा लढाई करणें असेल तर तसें सांगावें ह्मणजे आह्मी आपल्या बादशहाला त्याप्रमाणें जाऊन सांगूं. ”

या प्रमाणें वजीर बोलल्यावर ताजुल्मुल्क ह्मणाला–“ मी बादशाहीची इच्छा करीत नाहीं आणि मला लढाई करून जय मिळविण्याचीही हौस नाहीं. केवळ सुखानें ईश्वरभजन करीत आसावें, ह्मणन मी हा आराम बाग तयार केला आहे.” बादशहाची इच्छा असेल तर त्यानें हा बाग पाहण्यासाठीं यावें असें मी ह्मणतों असें ऐकतांच वजीरानें अत्यानंद मानून त्याचा निरोप घेतला आणि जें पाहिलें होतें व ऐकलें होतें, तें त्यानें बादशहा जवळ येऊन कळविलें. तेव्हां आश्चर्य मानून बादशहानें दुसऱ्याच दिवशीं ताजुल्मुल्काच्या भेटीस जाण्याचें ठरविलें आणि सर्व प्रकारें तयारी करण्यासाठीं हुकूम दिला.

बकावली जैनुल्मुल्का कडे राहिलेली होती. तिनें जेव्हां बागाचें व महालाचें साकल्य वर्तमान ऐकिलें, तेव्हां “ त्या महालाचा जो धनी, तोच आपल्या फुलाचा चोर, अशी तिनें निश्चयात्मक खुणगांठ मारली आणि दुसऱ्या दिवशीं बादशहाच्या स्वारी बरोबर तिनें तो बाग व महाल पाहण्यासाठीं जाण्याचा निश्चय ठरविला.

त्याचरात्रीं ताजुल्मुल्कानें आपल्या जवळचा केश अग्नीवर ठेवून हम्मालाराक्षसीला बोलाविलें आणि “ स्वतः बादशहा उद्यां माझ्या भेटीसाठीं व बागेसह बंगला पहाण्यासाठीं येणार आहे; तर त्याचा बादशाही आदरसत्कार त्यानें या अरण्यांत पाऊल ठेवल्यावेळेपासून चालू झाला पाहिजे.” असें सांगितलें. तें ऐकतांच राक्षसीनें आपल्या दासांस हुकूम करून एका रात्रींत सिंहासनापासून ताजुल्मुल्काच्या महालापर्यंत उत्तम प्रकारची राजकीय सन्मानायोग्य व्यवस्था लावली.

दुसऱ्या दिवशीं बादशहाची स्वारी मोठ्या थाटानें व कडाक्यानें ताजुल्मुल्काकडे जाण्यासाठीं निघाली. बादशहा जडावाच्या अंबारींत येऊन बसतांच बकावलीही मर्दानीवेषानें येऊन बादशहाच्या खवासींत येऊन बसली. स्वारी बरोबर असणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें उत्तम प्रकारचा पोषाख केला होता. चौघे शहाज्यादेही मोठ्या राजकीय पोषाखानें निरनिराळ्या हत्तींवरून निघाले. बादशहाची स्वारी शहर सोडून एक कोसभर जंगलांत शिरली मात्र; तों सोनेरी तंबू विजेप्रमाणें चमकत असलेला त्याच्या दृष्टीस पडला तेव्हां बादशहा वजीरास ह्मणतो–“अरे तो हाच महाल आहे कीं काय? ज्याच्यावर नजरही ठरत नाहीं” वजीर ह्मणाला–“ हजरत, तें ठिकाण तर अजून लांबच आहे. काल या ठिकाणीं कांहीं नव्हतें. हा सगळा प्रकार रात्रींतल्या रात्रींत बनून आला आहे.” याप्रमाणें दोघाचें भाषण चाललें आहे तों ताजुल्मुल्काचा सेवक हत्ती समोर

येऊन बादशहास मुजरा करून ह्मणाला-"आमच्या मालकाचा असा हुकूम आहे कीं, आलमपनाहची स्वारी ज्या ठिकाणा पासून पुढें येईल, तें ठिकाण बादशहाची ओंवाळणी समजून फकीरफुकऱ्यांस लुटण्याचा हुकूम करावा; आणि ज्या डेऱ्यांत हुजूरची राहण्याची इच्छा होईल त्यांत राहून विश्रांती घेतल्या नंतर पुढें व्हावें." हें ऐकून बादशहा फार हैराण झाला. त्याला हा प्रकार काय आहे ? याविषयीं अनुमानही करितां येईना. ताजुल्मुल्काच्या सेवकांनीं बादशहा एकेक ठिकाण सोडून पुढें चालला ह्मणजे ते तें लुटावें आणि त्याजबरोबर चालूं लागावें. स्वतः ताजुल्मुल्कही बादशहाला मान देण्यासाठीं सर्व ऐश्वर्यासहवर्तमान एक कोस पुढें आला होता. बादशहाची स्वारी पाहतांच लोटांगण घालून तो पायांनीं चालूं लागला. बादशहाचा दिवाण त्याला 'हाच महालाचा धनी' असें ओळखत होता. तो दृष्टीस पडतांच त्यानें बादशहास त्याची नम्रता दाखविली आणि उभयतांची ओळख करून दिली. नंतर ताजुल्मुल्कानें बादशहास आणून सन्मानानें आपल्या महालांतील मुख्य दिवाणखान्यांत बसविलें आणि नम्रतेनें हात बांधून पुढें उभा राहिला.

बादशहा त्या महालांत येण्याचे आधींपासूनच गुलाबाचीं कारंजीं सुरू झालेलीं होतीं, आणि जिकडे तिकडे उत्तमप्रकारची व्यवस्था करून ठेविलेली होती. ती सर्व व्यवस्था पहात असतां बकावली जी बादशहाच्या बरोबर होती, तिला असें वाटूं लागलें कीं, मी इरम येथील आपल्या बागेंतूनच चाललें आहें. जों जों तिला एकेक प्रकार आपल्या बागेप्रमाणें अगदीं हुबेहुब दृष्टीस पडूं लागला; तों तों तिची शुद्धि जात चालली. तरी कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन ती आपल्याशींच ह्मणूं लागली-" हें स्थान तयार करणारा मोठा जादूगार असला पाहिजे. हा सर्व प्रकार अगदीं माझ्या इरम येथील बागेसारखा व महालासारखा आहे." शेवटीं तिला कांहीं सुचेनासें झालें व तिनें एका बाजूला जाऊन जी परी तिच्या बरोबर होती, तिला आपला बाग व महाल पाहून येण्यासाठीं पाठवून दिलें. त्या परीनें एका क्षणांत जाऊन परत येऊन सांगितलें कीं, आपला बाग जागच्या जागीं आहे. आतां मला असें वाटतें कीं, हा बाग तयार करणारा आपल्या बागेंत कांहीं दिवसपर्यंत राहून आलेला असावा. नाहीं तर इतकी हुबेहुब तसवीर उतरण्याची दुसऱ्या कोणाचीही शक्ति नाहीं.

परीच्या मुखांतील भाषणें ऐकून बकावलीला अत्यानंद झाला. ती आपल्या मनांत ह्मणाली-" आज मी आपला चोर धरिला, आणि चोरीस गेलेली वस्तुही मिळविली. " तिनें आपल्या मनांत अनेक वेळां आणलें कीं, ह्याच वेळेस ताजुल्मुल्काला ओळख देऊन विरहज्वर नाहींसा करावा; पण केवळ स्त्री जातीच्या स्वाभाविक लज्जेमुळें तिच्या कडून तसें घडलें नाहीं.

इकडे महालांत बादशहासाठीं मेजवानीची तयारी होती. तिकडची वर्दी येतांच बकावली आपल्या मैत्रिणीसह तिकडे गेली. सर्वत्रांचीं भोजनें वगैरे झाल्यावर नाचरंग सुरू झाला आणि जिकडे तिकडे आनंदीं आनंद होऊन रा-

हिला. नंतर ताजुल्मुल्क व बादशहा गोष्टी बोलूं लागले. ताजुल्मुल्कानें बादशहास विचारलें—"आपणांस पुत्र किती आहेत ?" बादशहा आपले चौघेही पुत्र दाखवून ह्मणाला—"ईश्वराच्या कृपेनें हे चोघे कुलदीपक पुत्र आहेत. यांच्याशिवाय आणखीही एक होता; पण त्याचें मुखावलोकन करितांच मी अंध झालों होतों. त्यावेळीं हे माझे पुत्र होते, ह्मणून गेले आणि श्रम करून बकावलीच्या बागेंतील फूल घेऊन आले, ह्मणून हें जग मी पुनः पहात आहें. तो पांचवा पुत्र एकच वेळ माझ्या दृष्टीस पडून जो नाहींसा झाला तो अजून पर्यंत कोणाच्याही दृष्टीस पडला नाहीं." ताजुल्मुल्क विचारूं लागला—"त्या दुर्दैवी पुत्रानें आपला आश्रय कां बरें सोडला असावा? बरें इतक्या ह्या सभासदांतून कोणी त्याला ओळखीत होता?" असें ऐकतांच बादशहानें त्याला त्याच्या जन्मापासूनची सगळी हकीकत सांगितली आणि एका वृद्ध प्रधानाकडे हात करून ह्मणाला—"हा माझा वृद्ध प्रधान त्याचा गुरु आहे. हा जर त्याला पाहील तर ओळखील." असें ऐकतांच ताजुल्मुल्क त्याजकडे पाहून विचारूं लागला—"कायहो, तुह्मांला या मंडळींत कोणी बादशहाच्या पुत्राप्रमाणें दिसत आहे ?" असें ऐकतांच जो वृद्ध प्रधान ताजुल्मुल्काला ओळखून व त्याचें वैभव पाहून आश्चर्यचकित झाला होता तो एकदम ह्मणाला—"हजरत, मला तर तुह्मीच ते शहाज्यादे आहां असें वाटतें." इतकीं भाषणें ऐकतांच ताजुल्मुल्क आपल्या बापाच्या पायांवर जाऊन पडला आणि बोलूं लागला—"हे प्रियजनका, मीच तो तुझा दुर्दैवी पुत्र. इतके दिवस पर्यंत अनेक प्रकारचे कष्ट भोगून शेवटीं तुझ्या आश्रया खालींच हा महाल बांधून राहिलों आहें. हे पाय पाहण्याची फार उत्कट इच्छा होती, ती ईश्वरकृपेनें आज पूर्ण झाली!" जैनुल्मुल्कानें असें ऐकतांच ताजुल्मुल्काला हृदयाजवळ धरून त्याचें मस्तक अवघ्राण केलें आणि ह्मणाला—"बालका, ही अमुपसंपत्ति तुला अनुकूल होईल हें मला तुझ्या जन्मकालींच कळलेलें आहे. तुझ्या व माझ्या दुर्दैवामुळें आजपर्यंत आपला वियोग झाला होता; परंतु त्या जगच्चालक ईश्वरानें आज आपणांस एकत्र केलें आहे. वत्सा, आजपर्यंत तूं कोणत्या ठिकाणीं होतास? तुझा विवाह झाला आहे कीं नाहीं? इत्यादि सर्व वर्तमान मला सांग." असें ऐकतांच शहाज्यादा ह्मणाला—"प्रियजनका, आपल्या कृपेंकरून आजपर्यंत मला दोन स्त्रियांनीं वरिलें आहे, हुकूम असेल तर त्या दोघींसही चरणांवर घालण्यासाठीं घेऊन येतों." असें ऐकतांच बादशहानें स्नुषा पाहण्याची इच्छा दर्शविली; तेव्हां ताजुल्मुल्कानें स्वतः मंदिरांत येऊन गणिका व मेहमुदा यांस बादशहा बसला होता त्या दिवाणखान्यांत नेलें. त्या दोघीही जेव्हां दिवाणखान्याच्या दारापर्यंत येऊन थबकून उभ्या राहिल्या तेव्हां बादशहा त्यांस पाहून ह्मणूं लागला—"याया, कन्यकांनों, तुह्मांला अवलोकन केल्या ह्मणजे माझे नेत्र अधिक शांत होतील." असें ऐकताच गणिका सासऱ्याला ऐकूं जाण्या इतक्या मोठ्या स्वरानें बोलली—"हुजूर, कुलस्त्रियांनीं गुलामांसमोर येण्याबद्दलची आपल्या धर्मपुस्तकांत म-

नाईं आहे. आपणांजवळ माझे चार गुलाम उभे आहेत, त्यांना दूर करा ह्मणजे आह्मी निःशंकपणानें येऊन वडिलांचे पाद वंदन करूं." गणिकेचीं भाषणें ऐक, तांच चौवेही शहाज्यादे भयचकित होऊन कांपूं लागले, त्यांचीं मुखें म्लान झालीं आणि त्यांवर काळ्या रंगाची झांक मारूं लागली. बादशहा जैनुल्मुल्क तर तिचीं भाषणें ऐकतांच बुचकळ्यांत पडल्याप्रमाणें होऊन आश्चर्ययुक्त संशयितमुद्रेनें चोहोंकडे पहातच होता. त्यानें चौघांतही जेव्हां वर सांगतल्याप्रमाणें चलबिचल झालेली पाहिली; तेव्हां आपल्या मनांत ताडलें कीं, बहुतकरून प्रवासांत असतां माझ्या चौघां पुत्रांनींच "गुलाम" या पदवीची कमाई केलेली असावी. तरी संशयनिवृत्ति व्हावी ह्मणून तो गणिकेस ह्मणाला—"कन्यके, तुझ्या अपूर्ण भाषणानें माझी चांगली समजूत झाली नाहीं. यासाठीं जो कांहीं प्रकार असेल तो स्पष्ट सांग आणि त्या सांगण्यांत मला थोडा तरी पुरावा मिळवून दे. ह्मणजे झाला तर कांहीं लाभच होईल असें मनांत आलें आहे." असें ऐकतांच दिलबरलख्खा ह्मणाली—"खुदावंत, आपण ज्या चौघांना आपले पुत्र ह्मणतां, ते माझे गुलाम आहेत, आणि ते कोणालाही ओळखतां यावे ह्मणून मीं त्या प्रत्येकाच्या मानेवर आपल्या नांवाची मोहोर करून ठेविली आहे." हीं भाषणें पूर्ण झालीं नाहींत तोंच बादशहा क्रोधानें संतप्त होऊन त्यांजकडे पाहूं लागला आणि तेही लज्जेमुळें अधोवदन होत्साते भयानें थरथर थरथर कांपूं लागले. त्यांची ती स्थिति पाहतांच त्यांच्याकडे पाहून जैनुल्मुल्क तुच्छपणानें ह्मणाला—"हा मूर्खहो! डाग खाऊन गुलाम हें नांव मिळविलेंत आणि माझें शुद्ध कूळ मळविलेंत. धिःकार असो तुह्मांला! यावरून पुष्प तरी तुह्मींच आणलें किंवा दगाकरून मिळविलेंत याविषयीं मला संशय येतो. तर ताजुल्मुल्का, सत्पुत्रा, जें काय वर्तमान असेल तें मला सविस्तर कथन कर." असें ऐकतांच ताजुल्मुल्क विनयानें बोलूं लागला—"जनाब, जेव्हां माझ्या पूर्ण पातकांमुळें मी अकस्मात् आपल्या दृष्टीस पडलों आणि आपणांस अंधत्व प्राप्त झालें; तेव्हां आपण शोक क्रोधाधीन होऊन मला हद्दपार करण्याचा हुकूम केला. तेव्हांपासून प्रवासांतील अनेक दुःखें व संकटें सोशीत असतां अकस्मात् एके दिवशीं (चौघांकडे हात करून) हे माझे बांधव आपल्या नेत्रांसाठीं गुलबकावलीचा शोधकरीत सैन्यासह निघालेले माझ्या दृष्टीस पडले. माझ्या फिरण्याचा हेतु तरी आपल्या नेत्रांसाठीं उपाय शोधनाचाच होता. त्यास यांचें साह्य मिळाल्यामुळें नांव आणि वेष बदलून यांच्याच सैन्यांत "सय्यद" नामक सरदाराजवळ चाकरीला राहिलों आणि फिरत फिरत "फिर्दोस" शहरीं गेलों. तेथें 'दिलबर लख्खा' या नांवाची एक वेश्येची कन्या द्यूतनिष्णात प्रत्येक द्यूतकाराला कपटानें ठकवून सर्वस्वहरण करून बंदिवान करण्यांत प्रख्यात होती. तिच्या रूपाला लुब्ध होऊन हे तिच्या जवळ जुगार खेळले आणि तिच्या कपटपाशांत सांपडून सर्वस्वहरले, व त्या वेश्येच्या बंदिखान्यांत कैद होऊन गुलाम होऊन कष्ट भोगूं लागले. जेव्हां यांचें सर्वस्व त्या कपटी स्त्रीनें हरण के

लें, तेव्हां मी निराश्रित झालों आणि मनांत विचार करूं लागलों कीं, आतां जर मी स्वतः गुलबकावलीचा शोध न करीन तर पित्याच्या नेत्रासाठीं औषधी शोधून आणणारा कोणी काळजीचा उरला नाहीं. बरें अंगाला राख लावून फकीराच्या वेषानें फुलाचा शोधकरीत जावें, तर आपले सख्खे बंधु तुरंगांत पडले आहेत त्यांना सोडविणाराही कोणी काळजीचा नाहीं. अशी दोन्हीं बाजूनें नड दिसूं लागल्यामुळें पहिल्यानें समोर असलेलें संकट दूर करावें आणि मग फुलाच्या शोधासाठीं एकटेंच निघून जावें. असा निश्चय करून थोडेंसें द्रव्य मिळविण्याकरितां त्याच शहरांत एका अमिराकडे चाकरी पतकरून राहिलों; द्यूतकर्म शिकलों; ती वेश्या कोणतें कपट करून लोकांस फसविते ? या गोष्टीचा शोध करून बेतापुरता द्रव्यसंचय होतांच त्या वेश्येकडे जाऊन जुगार खेळलों आणि तिच्या देहासह तिचें सर्व वित्त हरण करून यांना मुक्त केलें. नंतर तेथून मुद्दाम फकीराचा वेष घेऊन जो निघालों, तो कित्येक दिवस पर्यंत फिरून एका भयंकर अरण्यांत आलों. तेथें मनुष्य काय; पण पशु किंवा पक्षी कोणीही जिवंत प्राणी संचार करीत नसे. कारण—वृक्षांच्या दाटीमुळें त्या रानांत सूर्याचें किंवा चंद्राचें किरणही प्रवेश करूं शकत नसे. तथाही संकटांतून कांहीं दिवस चाललों आणि प्रकाशांत आलों, तों एका भयंकर राक्षसाच्या हातीं सांपडलों ! पण ईश्वरी कृपेमुळें त्याचा मजवर लोभ जडला आणि माझ्या इच्छित पूर्ततेची आशा त्या वेळेपासून अधिक दृढ झाली. त्या राक्षसाची बहीण एक " हम्माला " नामक राक्षसी आहे. ती बकावली परीच्या बागाची मुख्य रखवालदारीण. जेव्हां माझी इच्छा त्या राक्षसाला कळली; तेव्हां त्यानें युक्तीनें मला तिच्या हवालीं केलें. त्या राक्षसीनें एक शहाज्यादी लहानपणापासून बाळगलेली होती व तिच्यावर त्या राक्षसीचें कन्येहून अधिक प्रेम होतें. मला पाहतांच ती कन्या उपवर झाली आहे असें जाणून त्या राक्षसीनें मजबरोबर तिचें लग्न लविलें. नंतर मी त्या " मेहमुदा " नामक " हम्माले " च्या कन्येचा लोभ संपादन करून आपला इष्ट हेतु तिच्याद्वारें राक्षसीला कळविला. तेव्हां राक्षसीनें त्या मेहमुदेच्या प्रीतीस्तव आपल्या ठिकाणापासून बकावलीच्या बागेपर्यंत विवर तयार करविलें आणि एके रात्रीं मला त्या बागेंत पोंचविलें. त्या बागेचा नमूनाच ही माझी बाग आहे. ती लोकोत्तर बाग माझ्या दृष्टीस पडतांच क्षणभर मला देहभान नाहींसें झालें होतें; परंतु पुढील कार्याच्या ओढीमुळें पुनः शुद्धीवर येऊन मी तें बकावलीचें फूल पहिल्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें. नतर अशा श्रीमान् बागेची मालकीण कशी आहे ती पहावी, असें वाटल्यावरून मोठ्या धैर्यानें त्या बागेची मालकीण जी बकावली नामक परी, तिच्या जमरूद महालांत गेलों. ईश्वरकृपेनें त्या वेळेस ती निद्रावश झाली होती आणि तिच्या परिजनांपैकीं त्या ठिकाणीं कोणीही नवतें ह्मणून बरें झालें, नाहींतर प्राणालाच मुकलों असतों. असो. ती बकावली परी तरुणी, नवयौवनसंपन्ना, रूपशील, जरी मी निद्रिस्तच पहिली आहे; तरी माझ्या हृदयावर मी तिचा

ठसा कोरून ठेविला आहे. खरोखर सांगतों; त्या ठिकाणीं वडिलांच्या पुण्या-नेंच शुद्धींत राहिलों आणि परत आलों. त्या परीला जो पाहील, तो मोहित होईल आणि मूर्च्छाच पावेल; असा तिच्या लावण्यमद्याचा अगाध महिमा आहे. मी तिची ती भोळी मुद्रा पाहिली आणि आत्मसंयमानें इंद्रियनिग्रह करून परतलों आणि विवर मार्गानें हम्माला राक्षसीच्या घरीं परत आलों. नंतर कांहीं दिवसांनीं त्या राक्षसीनें दिलेल्या अपार संपत्तीसह मेहमुदेला बरोबर, घेऊन एका राक्षसाच्या खांद्यावर बसून "फिर्दोस" शहरीं आलों. तेथून दिलबर-लख्खा आणि मेहमुदा यांस सर्व संपत्तीसह तारवांत बसवून इकडे पाठविलें आणि मी फूल घेऊन, मुद्दाम खुष्कीच्या मार्गानें फकीराचा वेष घेऊन निघालों. कांहीं मजला चालल्यावर मार्गांत एक वृद्ध व अंध फकीर आढळला. त्याला पाहतांच मनांत आलें कीं "कोणतीही वस्तु अजमाविल्या शिवाय तिजवर कोणत्याही गुणाविषयीं दृढ विश्वास ठेऊन राहूं नये; जो राहील तो प्रसंगीं फजीत होईल." असें मनांत येतांच मी तें फूल त्या अंध फकीराच्या नेत्रांस लाविलें. तों अकस्मात् त्याला दिव्य दृष्टी आली, त्याला हें जग पुनः दिसूं लागलें. तेव्हां आनंदानें अनेक आशीर्वाद देऊन तो चालता झाला. पण माझ्या मागून हे माझे चौघे बंधु त्या बकावलीच्या फुलाविषयीं असंभाव्य गोष्टी बोलत येत होते, त्या गोष्टी जेव्हां त्या फकीरानें ऐकल्या; तेव्हां त्याला राग आला व त्यानें स्वतः अनुभविलेल्या गोष्टीसह त्या फुलाचा शोध यांस सांगितला.

बकावलीच्या बागांतील फूल घेऊन कोणी पुढें चालला आहे. असें ऐकतांच हे चौघेही धांवत आले व मला गांठून मार देऊन यांनीं तें फूल मजपासून हिराऊन घेतलें. नंतर मी विचार केला कीं, फूल मी जरी नेलें तरी आपल्याच उपयोगासाठीं. तो उद्देश यांनीं नेलें तरी सिद्धीस जात आहे. असें मनांत आणून मी आपल्या हम्माला नामक सासूला बोलावून केवळ देवावर हवाला ठेवून स्वस्थ रहावें; ह्मणून हा बाग व महाल बांधला आणि येथें राहिलों नंतर ईश्वर कृपेनें आज आपल्या भेटीचा आनंद अनुभवी आहे.

या प्रमाणें ताजुलमुल्कानें आपली हकीकत सांगितल्यावर जैनुमुल्कानें चौघांचाही राज्यावरील वारसा उडवून त्यांस हद्दपार केलें. ताजुल्मुल्काची माता कष्ट भोगीत होती, तिला आणवून ताजुल्मुल्क आनंदानें भेटला. राजाचे चौघेपुत्र तेथून गेल्यावर गणिका व मेहमुदा यांनीं येऊन जैनुल्मुल्काच्या चरणांचें चुंबन घेतलें. नंतर कांहीं दिवस तेथें राहून जैनुल्मुल्क सिकेस्थानास परत आला. इतका प्रकार झाल्यावर जैनुल्मुल्काचा निरोप घेऊन बकावली इरम येथें निघून गेली.

## भाग ११वा.

इरम येथें पोंचल्यावर बकावलीनें ताजुल्मुल्कास एक पत्रलिहिलें आणि तें समनरूपरीच्या ( जी तिच्या बरोबर प्रवासांत होती. ) हातीं देऊन आं-

गठीसह तिला सांगितलें कीं, तेथें जा आणि तो एकांतांत आहे असें पाहून आधीं पत्र व मग आंगठी त्याला दे. असें ऐकतांच समनरूपरी जी आकाश मार्गानें निघाली, ती ताजुल्मुल्काच्या बागांत आली आणि एक निवांत जागा पाहून त्या ठिकाणीं बसून राहिली.

जेव्हां ताजुल्मुल्काला बकावलीचें स्मरण झालें व तो एकांतीं बसून तिज विषयीं विचार करूं लागला; तेव्हां समनरूपरी पुढें झाली व तिनें पत्रासह आंगठी त्याच्या पुढें ठेवली. ती आंगठी पाहतांच त्यानें ओळखली आणि पत्र उघडून वाचूं लागला. त्यांतील आशय—

परम प्रियकर ताजुल्मुल्क यांस—

बकावली परीचा सलाम. लिहिण्यास कारण कीं, आपण आपल्या अगाध चातुर्यानें माझ्या राखलेल्या बागेंत येऊन माझ्या बागेची शोभा जें माझ्या नांवाचें फूल तें चोरून नेलें; हातांतील आंगठीही काढून घेतली आणि त्या बरोबरच माझ्या चित्तावरही दरोडा घातलात. यावरूनच आपण महापराक्रमी आहां, असा मी निश्चय केला आणि शोध घेण्यासाठीं आपल्या बागापर्यंत आलें होतें. आपण दिलबरलखखेला कपटानें जिंकलें आणि बांधवांच्या मानेवर डाग देववून त्यांना हैराण केलें. तसें मला करूं पहाल, तर ती गोष्ट कधीं घडणार नाहीं. सामोपचारांनीं प्रेमाची वृद्धि व्हावी ह्मणून हें पत्र लिहिलें आहे. तर पत्र-दर्शनीं निघण्याचें करावें. आपण अकस्मात् येऊन माझे अवयव पाहिले व हात धरून आंगठी काढून घेतली. तर आतां हे अवयव मी दुसऱ्या कोणाला दाखवावे ? प्रियकरा, जो तूं माझ्या हृदयांत आहेस; तोच जेव्हां एकांतीं भेट देईल, तेव्हां जन्माचें सार्थक झालें असें वाटेल. नाहींतर हा जन्म तुझ्याशिवाय फुकट चालला आहे. चातक मेघाची जशी इच्छा करीत असतो; तशी मी तुझी वाट पहात आहे. दर्शनलाभ होईल तो सुदिन. अधिक काय लिहूं. लोभ आहेच, तोउभय पक्षीं जडवून वृद्धिगत करणें आपणांकडे आहे, ही विनंती.

आपल्या दर्शनासाठीं उत्सुक झालेली चातकी—

बकावली परी, मुक्काम इरम.

यांप्रमाणें पत्र वाचीत असतां ताजुल्मुल्काच्या मनांत पूर्ण प्रीतीचा उद्भव झाला. तो तिला भेटण्याविषयीं अतिशय उत्सुक झाला; पण इरमपर्यंत पोंचण्यास मार्गांत किती व कसकशीं संकटें भोगावीं लागतील ? याविषयीं विचार करून बकावलीच्या पत्राचें त्यानें योग्य व समर्पक शब्दांनीं उत्तर लिहिलें. त्यांत विशेषेंकरून असा आशय होता कीं, एकवेळ दैवयोगानें तुझ्या बागेंतून फूल घेऊन व तुला पाहून निर्भय परत आलों, तेव्हांपासून तुझ्या सौंदर्याचा ठसा जो माझ्या हृत्पटावर उठला आहे, तो ज्ञानदृष्टीनें पाहून आजपर्यंत अप्राप्त वस्तु प्राप्त होण्याची ही माझी दुराशा आहे, असें समजत होतों, परंतु तुझ्या प्रतिपत्रानें आशा उत्पन्न झाली. तरी तुझ्या ठिकाणापर्यंत येण्याला आतां मला दुसरा जन्म घेतला पाहिजे. मी तुझ्या सारखा जर पक्षयातीपैकीं असतों तर

तेव्हांच उडून आलों असतों. काय करूं ? माझी तशी शक्ति नाहीं. ह्मणून केवळ तुझें चिंतन करीत बसलों आहें. आतां तुलाच जर माझी दया येत असेल तर मी सिद्ध आहें. येथून तेथपर्यंत पोंचण्याची सोय करून जेव्हां निघण्याचा हुकूम करशील, तेव्हां निघेन व येऊन तुला भेटेन आणि वियोगाग्नि जो धडकत आहे तो शांत करीन.

याप्रमाणें पत्रोत्तर लिहून तें त्यानें तिच्या आंगठीसह समनरूपरीच्या हवालीं करितांच ती निघून बकावलीकडे गेली.

## भाग १२ वा.

समनरूपरीनें ताजुल्मुल्काकडील जवाब बकावलीच्या हातीं देतांच तिनें तो वाचला आणि आपल्या प्रियकराच्या मनांत आपणाविषयीं पूर्ण प्रेम आहे असें जाणून समनरूपरीला हुकूम केला कीं, जा आणि हम्माला राक्षसीला यावेळेस मी बोलावतें असें सांगून इकडे घेऊन ये. असें ऐकतांच समनरूपरी तिला बोलाविण्यासाठीं निघून गेली. त्यावेळेस हम्माला एकटीच बसलेली होती. समनरूपरीला पाहतांच तिनें तिचें व बकावलीचें कुशल विचारून शेवटीं प्रश्न केला कीं, बाई आज अवचित इकडे आलीस याचें कारण काय ? समनरूपरीनें तिला बकावलीच्या तोंडचा निरोप सांगितला. तो ऐकतांच आज तिनें अवेळीं कां बोलाविलें ? असें मनांत आणून ती समनरूपरीबरोबर बकावलीच्या महालांत गेली आणि बकावलीला पाहतांच हात जोडून उभी राहिली.

हम्माला राक्षसीला पाहतांच बकावलीनें तिला विचारिलें—"हम्माला बाई, मागें माझ्या बागांतील फूल कोणी चोरून नेलें हें तुह्मांला ठाऊक आहे ? " असें ऐकतांच हम्माला कांहीं ठाऊक नसल्यासारखें बोलूं लागली—"बाईसाहेब, तुमच्या बागांतील फूल चोरीस गेलें हें पूर्वीं मी ऐकलें आहे, पण तें कोणी नेलें आणि कोणत्या ठिकाणीं आहे, याबद्दल मी कांहीं जाणत नाहीं. " हे शब्द ऐकतांच बकावली क्रोधानें संतप्त होऊन तिला ह्मणाली—"दुष्टे कुंटिणी, माझें फूल कोणी नेलें हें तुला जर ठाऊक नाहीं; तर तुझ्या मेहमुदेचा पति कोण आहे मला सांग ? माझ्या या बागापर्यंत विवर तयार करून देणारी कोण बोल ? आणि पूर्वेस सिकेस्थाना जवळ माझ्या बागासारखा बाग व महाल कोणी तयार केला आहे ? याचें उत्तर दे; नाहींतर प्राणाला मुकलीस, असेंच समज. " याप्रमाणें बकावलीनें सगळी गोष्ट पाहिल्याप्रमाणें तिच्या अंगीं लावितांच ती निरुत्तर झाली. तेव्हां बकावली तिला ह्मणाली—" आतां जर तुझ्या जिवाची व अब्रूची आशा असेल तर त्या आपल्या जांवयाला या ठिकाणीं घेऊन ये. " असें ऐकतांच हम्माला अवश्य ह्मणून तेथून जी निघाली, ती ताजुल्मुल्काच्या बागांत येऊन त्याला भेटली.

हम्माला राक्षसीला पाहतांच ताजुल्मुल्क तिच्या चरणांवर मस्तक ठेवून विचारूं लागला—"माते, आज अकस्मात् कां आलीस ? तुझा मुखेंदु आज म्लान कां झाला आहे ? " असें ऐकतांच त्या राक्षसीनें बकावलीकडील सर्व

वर्तमान सांगितलें आणि तुला आज तिच्याकडे नेण्यासाठीं मी आलें आहे' असें ह्मणाली. तेव्हां ताजुल्मुल्क अति उत्सुकतेनें बकावलीची भेट घेण्यासाठीं सिद्ध झाला; असें पाहतांच त्या राक्षसीनें त्याला उचलून आपल्या खांद्यावर घेतलें आणि इरमचा मार्ग धरिला.

हम्माला ताजुल्मुल्काकडे त्याला बोलाविण्यासाठीं गेल्यानंतर बकावलीची माता तिच्या समाचाराला आली व तिची चमत्कारिक स्थिति पाहून तिला नानाप्रकारचे प्रश्न करूं लागली; पण बकावलीनें कसलाही थांग लागूं दिला नाहीं. फक्त माझ्या बागांतील फूल कोणी चोरून नेलें, ह्मणून मी त्या चोराचा शोध लावण्यासाठीं स्वतः गेलें होतें. एवढा मजकूर मात्र तिनें आपल्या मातेला खरा सांगितला. त्यांचें हें बोलणें चाललें आहे तों हम्माला ताजुल्मुल्काला घेऊन आली. तिला पाहतांच समनरूपरीनें खुणावून पुढें येऊं नको ह्मणून सांगितलें. त्याचप्रमाणें बकावलीनेंही तिला पाहिल्याबरोबर नेत्रांचा इशारा केला आणि ताजुल्मुल्काला कोठेंतरी नेऊन लपीव, असें कळविलें. तेव्हां हम्माला ताजुल्मुल्काला जी घेऊन गेली ती बागेंतील एका कुंजगृहांत लपवून निर्धास्त होऊन बसली.

इकडे एक प्रहर रात्र होईपर्यंत बकावलीची माता बोलत बसली होती. नंतर ती जेव्हां आपल्या शयनस्थानीं जाऊन निजली आणि तिला जेव्हां गाढ झोंप लागली; तेव्हां बकावली आपल्या प्रियकराला भेटण्यासाठीं बागेंत आली. ताजुल्मुल्क जिची मार्गप्रतिक्षा करीत बसला होता; ती लोकोत्तर रूपयौवन संपन्न स्त्री बकावली येऊन पुढें उभी राहतांच तिच्या सौंदर्यमद्यामुळें ताजुल्मुल्काला एकदम धुंदी आली व तो जागच्या जागींच मूर्च्छित झाला. त्याची ती तशी स्थिति पाहतांच बकावली धांवत त्याच्या जवळ जाऊन बसली आणि त्याचें उसें आपल्या मांडीवर घेऊन त्याला आपल्या शालूच्या पदरानें वारा घालूं लागली. त्याचप्रमाणें त्यानें सावध व्हावें ह्मणून त्याच्या गालावर गाल ठेवून अमृतासारखीं मधुर भाषणें बोलूं लागली. बकावलीच्या मुखाला गुलाबाच्या फुला सारखा सुवास अक्षय येत असे. तो सुवास जेव्हां फार वेळपर्यंत त्याच्या घ्राणेंद्रियद्वारानें त्याच्या शरीरांत गेला; तेव्हां त्याला थोडीशी शुद्धि आली व एका क्षणानंतर तो चांगला हुशार झाला. जेव्हां त्यानें पाहिलें कीं, बकावली परी आपल्यावर प्रेम करीत आहे, तेव्हां त्याला आपल्या जन्माचें सार्थक झालें असें वाटलें. नंतर दोघेंही आशक व माशुक प्रेमभरांत येऊन, लज्जेचा पडदा बाजूला सारून एकरूप झालीं !!!

इकडे मध्यरात्रीच्या सुमारास जमीलाखातुन नामक बकावलीची माता जागृत झाली आणि चांदणें पडलें आहे असें जाणून एकटीच बागेची सहल करण्यासाठीं उठली व बागेंत येऊन इकडे तिकडे फिरूं लागली. फार वेळपर्यंत फुलांचा सुगंध घेत आनंदानें सहल करीत करीत ती ज्या ठिकाणीं ताजुल्मुल्क आणि बकावली एकरूप होऊन अत्यानंदांत पडलीं होतीं त्या ठिकाणीं आली.

व बकावलीला मनुष्या बरोबर रत झालेली पाहतांच कोपली. तिचा राग इत-का भडकला कीं, तो क्रोधाचा वेग तिचा तिलाही सहन होईना. तिनें रागानें ताजुल्मुल्काच्या तंगड्या धरून त्याला फिरवून फेंकून दिलें आणि बकावलीच्या दहा पांच श्रीमुखांत भडकावून तिला ओढीत जेथें बकावलीच्या बापाचें तख्त होतें, त्या ठिकाणीं घेऊन गेली. तिनें आपल्या पतीला बकावलीचें सर्व चरित्र जें पाहिलें होतें तें सविस्तर सांगितलें; तेव्हां बकावलीच्या फिरोजशाह नामक पित्यानें तिला बंदींत ठेविलें आणि तिला बोध करून ताळ्यावर आणण्यासाठीं चांगल्या चतुर व बोलक्या अशा दहा पऱ्या तिच्या तैनातींत नेमल्या. त्या मनुष्य जातीचा मूर्खपणा, दुर्बळपणा, इत्यादि अनेक प्रकार तिला सांगून तिचें मन फिरवायाला पाहत; परंतु बकावलीला जो ताजुल्मुल्काच्या प्रीतीचा एकवेळ चटका लागला, तो लागलाच. रात्रंदिवस ती आपल्या प्रियकराच्या विचारांत अन्न पाणी ही न घेतां केवळ भ्रमिष्टाप्रमाणें राहूं लागली.

## भाग १३ वा.

जमीलाखातुन हिनें ताजुल्मुल्काच्या तंगड्या धरून त्याला फेंकून दिलें, तो एका महासागरांत जाऊन पडला आणि गोते खात खात कित्येक दिवसांनीं एका किनाऱ्यास लागला. जेव्हां त्याला चांगलें ऊन लागलें व त्याच्या हात-पायांत उष्णता आली, तेव्हां तो कांहींसा शुद्धीवर आला आणि थोड्या वेळानें कांहीं शक्ति येतांच इकडे तिकडे फिरूं लागला. तों एक बाग त्याच्या दृष्टीस पडला. त्यांतील प्रत्येक वृक्ष फलभारानें नम्र झालेला होता. तेथूनही तो पुढें गेला आणि एका प्रचंड वृक्षाकडे पाहूं लागला, तों त्यावर फळांच्या ठिकाणीं मनुष्यांचीं शिरेंच लटकताहेत. ताजुल्मुल्क जेव्हां त्यांजकडे लक्ष्यपूर्वक पाहूं लागला, तेव्हां तीं त्याच्याकडे पाहून सर्व खद खद हंसलीं आणि जमिनीवर पडलीं. शहाज्यादा तो विलक्षण प्रकार पाहतांच भय पावला. इतक्यांत त्या वृक्षावर दुसरीं तितकींच शिरें लोंबताहेत असें दिसूं लागलें. असो. शहाज्यादा भिऊन पुढें चालूं लागला, तों एक डाळिंबाचें झाड त्याच्या दृष्टीस पडलें. त्या झाडावर पानापानाला डाळिंबें लागलीं होतीं; तीं पाहतांच ताजुल्मुल्काला थोडेंसें समाधान वाटलें. तें एकेक घागरी एवढें डाळिंब पिकलेलें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां त्यांतील एक तोडून घेतलें व चिरलें, तों त्यांतून नानाप्रकारच्या मनोहर रंगाचीं पाखरें उडून गेलीं; याही गोष्टीचें त्याला आश्चर्यच वाटलें. नंतर अशाच प्रकारचे अनेक विलक्षण चमत्कार पहात पहात तो त्या रानांतून भटकूं लागला. तरी त्याला त्या जंगलाच्या बाहेर निघण्याला मार्ग सांपडेना. शेवटीं त्यानें कंटाळून त्या रानांतील सुकलेलीं लांकडें जमा केलीं आणि वेलींनीं त्यांचा एक मोठा भारा बांधून समुद्रांत सोडला आणि ईश्वराचें नांव घेऊन त्यावर बसला व वाहूं लागला. कित्येक दिवसांनीं तो दुसऱ्या एका भयंकर व निर्जन अरण्याजवळ पोंचला आणि किनाऱ्याला लागतांच त्यानें तो भारा सोडून दिला व पूर्ववत् भटकूं लागला; पण जेव्हां सूर्यास्ताचा समय झाला आणि जिकडे ति-

कडे भयंकर श्वापदें शब्द करूं लागलीं, तेव्हां तो भ्याला आणि जीव रक्षणासाठीं एका झाडावर चढून बसला.

जेव्हां प्रहर रात्र झाली, तेव्हां दक्षणेच्या बाजूनें सर्पासारखे फुस्कारे शहाज्याद्याच्या कानावर येऊं लागले, ह्मणून तो इकडे तिकडे पाहूं लागला; पण कांहीं ध्यानांत येईना. तेव्हां काय आहे ह्मणून विचार करूं लागला. शेवटीं पर्वतासारखा एक भयंकर सर्प ताजुल्मुल्क ज्या झाडावर बसला होता; त्याच झाडाखालीं येत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. तो सर्प झाडाखालीं येतांच शहाज्याद्याला मोठ्यानें श्वासोच्छ्वास घेण्याचेंही भय वाटूं लागलें, तो त्या झाडाच्या खांदीला अगदीं चिकटून बसला. नंतर त्या सर्पानें आपल्या मस्तकांतील तेजस्वी मणि काढून तो त्या वृक्षाखालच्या एका मोठ्या दगडावर ठेविला. मणि बाहेर निघतांच त्या जाग्यापासून आसपास चार कोशपर्यंत शांत प्रकाश पडला आणि त्या तेजाला मोहित होऊन कित्येक पशु पक्षी त्या महा नागापुढे येऊन नाचूं लागले आणि नाचतां नाचतां जेव्हां त्या सर्वांनीं प्राण सोडला तेव्हां तो नाग त्यांस यथेच्छ भक्षण करूं लागला. खातां खातां जेव्हां त्याची क्षुधा शांत झाली, तेव्हां तो इकडे तिकडे फिरूं लागला. शेवटीं त्यानें तो मणि पुन्हां गिळला आणि ज्या रस्त्यानें आला होता; त्याच मार्गानें तो हळु हळू निघन गेला.

ताजुल्मुल्कानें बाकी उरलेली रात्र त्या झाडावर बसूनच संपविली आणि बसल्या बसल्या त्यानें त्या महाभुजंगाचा मणि घेण्याचा निश्चय केला. दुसऱ्या दिवशीं सूर्योदय झाल्या नंतर तो झाडावरून खालीं उतरला आणि सारा दिवस त्यानें त्याच भयंकर अरण्यांत इकडे तिकडे फिरून घालविला. सायंकाळच्या सुमारास त्यानें समुद्रावर जाऊन भला मोठा एक खाजणांतील मऊ चिखलाचा गोळा उचलला आणि सूर्यास्त होण्याच्या सुमारास तो त्या चिखलाच्या गोळ्यासह पहिल्याच दिवसाच्या वृक्षावर चढून बसला. नियमाप्रमाणें तो भुजंगही प्रहर रात्र होतांच त्या झाडाखालीं आला व नियमाप्रमाणें मणि काढून ठेवून यथेच्छ चरून फिरूं लागला. तो जरा लांब गेला असें पाहून टपत बसलेल्या ताजुल्मुल्कानें खांदीवरून चिखलाचा गोळा जो टाकला, तो नेमका त्या मण्यावर पडला. त्यामुळें अरण्यांतील प्रकाश एकदम नाहींसा झाला आणि वेडा झालेला नाग त्या झाडाखालीं आला नाहीं तोंच रागानें फडा आपटून आपटून मरण पावला. दुसऱ्या दिवशीं ताजुल्मुल्क सूर्योदय होतांच त्या झाडावरून उतरला आणि आधीं त्यानें चिखलांतून तो तेजस्वी मणि काढून समुद्रावर नेऊन धुतला व वस्त्रांत गुंडाळून कंबरेला बांधला. नंतर त्यानें विचार केला कीं, आतां एखादें शहर सांपडेल तर पहावें. असें मनांत येतांच तो चालूं लागला. तरी कित्येक दिवसपर्यंत त्याला मनुष्यवस्ती आढळली नाहीं. त्यानें सायंकाळ होय तों पावेतों चालतां चालतां रानांतील सांपडतील तीं फळें खावीं आणि मिळेल तसलें पाणी प्यावें व सायंकाळीं एकाद्या मोठ्याशा वृक्षावर

जाऊन बसावें आणि सगळी रात्र सावध राहून घालवावी. असें कित्येक दिवस गुजरल्यावर एके दिवशीं सायंकाळीं तो ज्या एका मोठ्या वृक्षावर जाऊन बसला; त्यावर एक मैना आपल्या पिलांसह राहत होती. ती मैना " कानीं पडेल तर कामीं येईल " अशा समजुतीनें आपल्या बच्चांला नेहमीं मोठमोठ्या बादशहांच्या व कामदारांच्या अनेक प्रकारच्या गोष्टी सांगत असे. ज्या दिवशीं ताजुल्मुल्क जाऊन त्या वृक्षावर बसला, त्या दिवशीं मैनेचीं पिलें आपल्या आईला ह्मणालीं—" आई, तूं नित्य मोठमोठ्या बादशहांच्या गोष्टी सांगतेस; पण कधीं आपण ज्या या रानांत रहातों; त्यांतील गोष्ट सांगत नाहींस; तर आज कृपाकरून कांहींतरी या रानांतील गोष्ट सांग. " असें ऐकतांच मैना सांगते—

" ह्या अरण्यांत अपार संपत्ति गाडलेली आहे. त्या शिवाय येथून दक्षिण दिशेस एका हौदाच्या किनाऱ्यावर एक मोठा वृक्ष आहे, त्याचें नांव " सिराजुलकर्तब " त्या वृक्षाचा असा गुण आहे कीं, जो कोणी त्याच्या सालीची टोपी करून डोईस घालील, तो सर्वांस पाहील; पण त्याला कोणी पाहणार नाहीं. बाळांनों, असें जरी आहे; तरी त्या वृक्षापर्यंत कोणीही जाऊं शकत नाहीं. कारण एक मोठा विखारी भुजंग त्या वृक्षाची राखण करीत असतो. त्याजवर कोणी तलवारीनें किंवा तिरानें मारूं पाहील; तर तें व्यर्थ जाईल. कारण त्यावर कसलेंही शस्त्र चालत नाहीं, त्याच्या विषानेंच शस्त्रें जळतात " असें ऐकतांच पिलें विचारतात—" आई, तर मग त्या वृक्षा जवळ जाण्याची काय युक्ति आहे बरें ? " मैना ह्मणाली—" कोणी धैर्यवान् जर त्या हौदाच्या किनाऱ्यापर्यंत पोंचला, तर त्याच्या अंगावर सर्प धांऊन येईल. तो येतो, असें पाहतांच जाणारानें हौदांत उडी टाकावी; ह्मणजे त्याचें रूप बदलेल व तो कावळा होईल. तरी त्यानें धैर्य सोडूं नये. कावळ्याचें रूप मिळतांच उडावें आणि त्या महावृक्षाच्या पश्चिमेकडील खांदीवर जाऊन बसावें. त्या खांदीला पुष्कळ लाल व हिरवीं फळें लागलेलीं आहेत. त्यांतील लाल फळ तोडून खातांच खाणारा आपलें मूळरूप धरील. हिरव्या फळांचा असा गुण आहे कीं, तें जर डोकीवर ठेवलें, तर त्यावर कोणतेंही हत्यार चालणार नाहीं. तें जर कंबरेला बांधलें तर हवेंतून उडत राहण्याची शक्ति येईल. त्याच्या पानांचा असा गुण आहे कीं, तें जर जखमेवर ठेवलें; तर तत्क्षणीं ती जखम भरून येईल. त्या झाडाची जर काठी केली; तर ती आपल्या स्पर्शानें हजार मणांचें कुलुप असलें तरी तें सहज तोडील.

ताजुल्मुल्कानें ती गोष्ट ऐकतांच त्या झाडाचा लाभ करून घेण्याचा निश्चय केला आणि प्रातःकाल होतांच मैनेनें सांगितलेल्या खुणांप्रमाणें त्या हौदाच्या किनाऱ्यावर गेला. तो तेथें पोंचतांच तो पर्वता सारखा नाग त्यावर धांऊन आला; पण तो येतो असें पाहतांच ताजुल्मुल्कानें हौदांत उडी टाकली. तो हौदांत पडतांच कावळा झाला व उडाला तो वृक्षाच्या पश्चिमेकडील शाखेवर

स्त्री पलंगावर पडून शोक करीत असलेली त्याच्या दृष्टीस पडली. तिच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या. ताजुल्मुल्काला तिची फारच दया आली आणि त्यानें आपल्या मस्तकावरील टोपी काढून तिला विचारलें—" हे रूपसुंदरी, ह्या तुझ्या तारुण्यांत तुला आपल्या प्रियकरा शिवाय राहणें संकटाचें आहे; असें असतां तूं हा अरण्यवास कां पतरकरलास ? " असें ऐकताच ती स्त्री लज्जित झाली आणि ह्मणाली " हे तरुणा, तूं कोण आहेस ? या भयंकर जाग्यांत धैर्य धरून कां आलास ? तुला आपल्या जिवाची धास्ती कां रे नाहीं ? आतां मजवर कृपा करून येथून चालता हो, नाहींतर व्यर्थ प्राणाला मुकशील. " ताजुल्मुल्क ह्मणाला—" बाई, तुलाच जर माझा जीव घेण्याची इच्छा असेल, तर तूं आपल्या हातानें मला खुशाल मार. दुसऱ्या कोणाविषयीं जर ह्मणशील, तर मी काळालाही भीत नाहीं- मला मरण्याचें किंवा मारणाराचें मुळींच कांहीं वाटत नाहीं. तर आतां तूं आपलें सर्व वर्तमान मला सांग " असें ऐकतांच ती आपलें शिर वर उचलून सांगूं लागली—" मी एक परी आहे. माझें नांव " रुहआफ्जा. " जंजिरे फिर्दोस शहरांतील मुजफरशहा—जो हल्लीं तख्तावर आहे, तो माझा बाप. माझ्या काकाची मुलगी बकावली नामक परी आहे, ती इरम येथें असते. मी तिच्या समाचारासाठीं एके दिवशीं गेलें होतें; पण जेव्हां आपल्या बापाकडे येण्यासाठीं तेथून परत फिरलें, तेव्हां मार्गांत मला " सीयाहरान " नामक राक्षसानें बलात्कारानें उचललें आणि येथें आणलें. आतां तो मजशीं लग्न लावण्याच्या विचारांत आहे, पण मी कबूल करीत नाहीं. या साठीं नित्य येऊन तो मला त्रास देतो व नित्य नवीं नवीं भयें दाखवितो. "

या प्रमाणें तिचें साकल्य वर्तमान ऐकून शहाज्याद्यानें तिला विचारिलें " तुझ्या काकाची मुलगी कोणत्या ठिकाणीं आहे ? " ती ह्मणाली—" ती हल्लीं दुखणेकरी आहे " शहाज्याद्यानें विचारिलें–" तिला काय दुखणें झालें आहे ? " रुहआफ्जा ह्मणाली—" तिनें एक तरुण मानवावर आपली प्रीति ठेविली होती. नंतर कित्येक दिवसांनीं तिनें त्याला शोधून आणलें आणि त्याच्या फारच नादीं लागली. तें वर्तमान तिच्या मातेला कळल्यावर तिनें रागानें तिच्या प्रियकराला कोणीकडे उडवून दिलें आणि तिला नेऊन कोंडून ठेवलें. तरीही अजून ती आपल्या त्या प्रियकरासाठीं अपार शोक करीत असते, तिचे प्राण कंठीं आले आहेत. तरी माझा काका व काकी ती आपलें ऐकत नाहीं ह्मणून तिला वंदींत टाकून फिकिरींत आहेत.

याप्रमाणें तिच्या मुखानें बकावलीची स्थिति ऐकतांच शहाज्याद्याला फार वाईट वाटलें, तो एकदम फिक्का पडला, त्याचें तोंड उतरलें, नेत्र भरून आले आणि दीर्घ व उष्ण श्वास सोडून तो रडूं लागला. त्याची ती स्थिति पाहतांच रुहआफ्जा विचारूं लागली " हे सुंदरतरुणा, तुला असें काय झालें हें ? तुझ्या चेहऱ्याचा रंग बदलला आहे, नेत्रांतून अश्रुपात होत आहेत आणि तुझा कंठ भ-

गर्दी भरून आला आहे याचें कारण काय ? " असें ऐकतांच शहाज्यादा सांगूं लागला—" सुंदरी तुला काय सांगूं ? मीच तो दुर्दैवी तुझ्या बकावली परीचा प्रियकर ! अरेरे या दुर्दैव्यामुळें तुझ्या बहिणीवर संकट आलें ! तिकडे कैदेंत तिनें कंठीं प्राण आणले आहेत आणि इकडे मी आनंदानें फिरत आहें ! " या प्रमाणें शोक करीत असतां शहाज्याद्यानें आपली व बकावलीची सर्व हकीकत तिला सांगितली. ती ऐकतांच त्या परीनें दोघांच्या प्रीतीविषयीं फारच ममतायुक्त आश्चर्य केलें आणि शाहाज्याद्याला सांगितलें—" जर मी या मेल्या राक्षसाच्या बंदीत नसतें; तर तुमची दोघांची इच्छा खरोखर पूर्ण केली असती; पण-काय करावें ? मला येथून चालतां येत नाहीं । " शहाजादा ह्मणाला—" असें आहे तर चल तुला कोण अडविणार आहे ? तुझी इच्छा असेल त्या ठिकाणीं आनंदानें चल. तुला त्या राक्षसाचें भय वाटत असेल तर येऊंदे त्याला; मी त्याचे सहस्रावधि तुकडे उडवीन. आतां कमतरता इतकीच आहे कीं, मजपाशीं कोणतेंही हत्यार नाहीं. तरी चिंता नाहीं चल तूं. मी तुझें रक्षण करून तुला तुझ्या बापाकडे पोंचवितों. " असें बोलून त्यानें आपल्या हातांतील काठी तिच्या पायांतील बिडीवर मारतांच बिडी तुटून ती परी मोकळी झाली. नंतर आनंदित होऊन तिनें ताजुल्मुल्काला त्या राक्षसाचें शस्त्रागार दाखविलें. तेव्हां ताजुल्मुल्कानें एक उत्तम तेगा ( एका प्रकारची तलवारच ) हातांत घेतला व दुसरींही कित्येक उत्तम हत्यारें कंबरेला बांधलीं.

नंतर निर्भयपणानें दोघेंही तीं हवेली सोडून बाहेर पडलीं व कांहीं अंतरावर जात आहेत तों एक भयंकर गर्जना त्यांच्या कानांवर आली. ती ऐकतांच रुह-आफ्जेनें सांगितलें—" हे तरुण शहाज्याद्या, आतां सावध रहा. तो दुष्ट राक्षस अगदीं जवळ आला आहे. " ताजुल्मुल्कानें कांखेंतील टोपी काढून ती त्या परीच्या डोक्यांत घातली आणि तिला अदृश्य करून तो स्वतः धैर्यानें हत्यार परजीत राक्षसाच्या पुढें झाला. त्याला पाहतांच तो राक्षस जेव्हां अधिक गर्जना करीत पुढें चाल करूं लागला; तेव्हां शहाज्यादाही मोठ्यानें गर्जना करून त्याला ह्मणाला—" खबरदाररे दुष्टा ! तुला जर तुझा जीव प्रिय असेल तर एक पाऊलही पुढें टाकूं नको. जर चळवळ करीत पुढें येशील तर असा हात चालवीन कीं, तुझे तिळा एवढाले तुकडे होत तोंपर्यंत सोडणार नाहीं. " अशीं भाषणे ऐकतांच तो राक्षस हंसून ह्मणाला—" आश्चर्याची गोष्ट आहे कीं, मुंगी हत्ती जवळ स्पर्धेच्या गोष्टी सांगते. अरे मूर्खा, तुला कीटकाला मारून यःकश्चिताच्या रक्तानें हात भरण्याची मला शरम वाटते. ज्या हाताच्या चापटीनें मोठमोठ्या पर्वतांचा चुराडा उडून जातो, त्या हातांपुढें तुझा टिकाव कसा लागेल. तूं जर आपलें कल्याण इच्छित असशील तर बऱ्या बोलानें, माझी प्रिया माझ्या हवालीं करून चालता हो. तिच्या साठीं मला फार तळमळ लागली आहे. ती तुला पचणार नाहीं. मानवा ! दाखिवरे, माझी स्त्री मला दाखीव आणि माझ्या हवालीं करून आपला जीव घेऊन चालता हो. नाहीं तर मेलास बघ. " असें

ऐकतांच ताजुल्मुल्क त्याला ह्मणाला—" अरे मुर्दाडा; तुला रुहआफ्जा पाहिजे काय ? पुनः तिला माझी प्रिया ह्मण, ह्मणजे तुझी जीभच तोडून टाकतों. तूं काय समजला आहेस ? चल ये लढ मजबरोबर ! "

असें ऐकतांच तो राक्षस अत्यंत कोपयुक्त होत्साता मेघाप्रमाणें गर्जना करूं लागला व त्यानें एक शंभर मणांचा धोंडा उचलून शहाज्याद्यावर फेंकला. तो दगड येतांच शहाज्यादा हवेंत उडाला व त्यानें हातांतील ' सीराजुलकर्तब ' वृक्षाची काठी त्या राक्षसाच्या मानेवर मारली. त्यामुळें त्याचें सर्वांग कंप पावलें. नंतर शहाज्यादा त्याला ह्मणाला—" दुष्टा, जा आतां आल्या मार्गानें ! नाहींतर दुसऱ्या हाताबरोबर तुझा प्राण घेईन. " राक्षसानें जेव्हां आपला शत्रु महा बलवान् आहे असें पाहिलें; तेव्हां अशी एक आरोळी मारली कीं, त्या आरोळी बरोबर दशदिशांकडून भयंकर आरोळ्या ठोकीत हजारों राक्षस येऊन ताजुल्मुल्काच्या सभोंवती उभे राहिले. ती राक्षसांची गर्दी पाहतांच ताजुल्मुल्काला आवेश चढला आणि त्यानेंही असा पराक्रम केला कीं, एका क्षणांत सगळे राक्षस मरणोन्मुख झाले, कित्येक जीव घेऊन पळत सुटले आणि कित्येक दांतीं तृण धरून त्याला शरण आले. ताजुल्मुल्काच्या हातांतील तेगा विजेप्रमाणें चमकत चपलतेनें चालत असल्यामुळें थोडक्याच वेळांत त्या जाग्यावर मांसाचा चिखल झाला आणि रक्ताचे पाट वाहूं लागले. तो त्या राक्षसांजवळ लढत असतां त्या सर्वांना तो कृतांताप्रमाणें दिसत असे. जेव्हां सर्व राक्षस हतवीर्य होऊन पळून गेले, तेव्हां ताजुल्मुल्कानें हातांतील शस्त्र ठेवलें. पण राक्षसांजवळ युद्ध करीत असतां त्याला फार श्रम झाले होते, त्या कारणानें हातांतील शस्त्र खालीं ठेवतांच त्याला मूर्च्छना आली व निचेष्टित होऊन तो तेथेंच पडला.

आपल्यावर अयाचित उपकार करणारा व साह्य कर्ता युद्ध करीत असुन मूर्च्छित पडला असें पहातांच रुहअफ्जा धांवत त्याच्या जवळ आली आणि त्याचें शिर आपल्या मांडीवर घेऊन त्याला आपल्या पदरानें वारा घालूं लागली. कांहीं वेळानें तिनें आपलें प्रफुल्लित कमळासारखें वदन त्याच्या वदनाजवळ नेलें आणि मंजूळ स्वरानें त्याला हांक मारली. तिच्या मुखाला अंबर नानक अत्तराहूनही उत्तम प्रकारचा सुगंध येत असे, तो घ्राणेंद्रियद्वारें शरीरांत शिरतांच ताजुल्मुल्क शुद्धीवर आला व त्याला थोडा आराम झाल्यासारखें वाटलें. तेव्हां रुहआफ्जेलाही आनंद झाला. नंतर तिनें आपल्या डोक्याची टोपी काढून शहाज्याद्यापुढें ठेविली आणि त्याच्या पराक्रमाबद्दल त्याची अतोनात स्तुति करूं लागली. नंतर दोघेंही तेथून जंजिरेफिर्दोस शहरच्या मार्गानें हळू हळू मार्ग क्रमण करूं लागलीं.

जेव्हां तीं दोघें शहराच्या अगदीं जवळ आलीं, तेव्हा रुहआफ्जेनें ताजुल्मुल्काला तिच्याच नांवाचा एक बाग होता, त्यांत नेऊन बसविलें आणि ती स्वतः एकटीच आपल्या आई बापांच्या दर्शनासाठीं गेली. त्यांना कन्या पाहतांच आपला पुनर्जन्म झाला असें वाटलें. त्यांनीं रुहआफ्जेला हृदयाजवळ ध-

रून तिचें चुंबन घेतलें. नंतर त्यांनीं जेव्हां तिला तिची हकीकत विचारली, तेव्हां तिनें "मला राक्षसानें बलात्कारानें उचलून नेऊन बंदींत टाकलें होतें; पण तेथें एका शहाज्याद्यानें येऊन आपल्या पराक्रमानें मला सोडविलें." इत्यादि वर्तमान त्यांस कळविलें; परंतु तोच बकावलीचा प्रियकर आहे, असें मात्र तिनें त्यांला सांगितलें नाहीं.

मुजफ्फरशहा कन्येच्या मुखांतील वर्तमान ऐकतांच मोठ्या लगबगीनें उठला व पहिल्यानें बागेंत येऊन त्यानें शहाज्याद्याचे अनेक प्रकारें आभार मानले आणि त्याला कांहीं दिवस राहण्याचा आग्रह करून त्याच्या सेवेसाठीं कित्येक दास, दासी व पऱ्या ठेविल्या. त्यांशिवाय नित्य स्त्रीसह व कन्येसह त्या बागांत येऊन तो मुजफ्फरशहा ताजुल्मुलकावर पुत्राप्रमाणें ममता करूं लागला. यामुळें उत्तरोत्तर त्यांचा स्नेहही वाढत चालला.

## भाग १६ वा.

कांहीं दिवसांनीं आईबाप आनंदांत आहेत, असें पाहून रुहआफ्जेनें ताजुल्मुल्काची सगळी हकीकत आपल्या बापाला सांगितली. तो एक शहाज्यादा आहे, असें कळतांच मुजफ्फरशहानें त्याला अधिक मान देऊन त्यालाआपल्या वाड्यांत आणून ठेविलें. नंतर रुहआफ्जा अकल्पित सांपडल्याबद्दल एक पत्र लिहून त्यानें आपला बंधु जो फिरोजशहा यास एका परीच्या हातीं पाठविलें. तें पत्र वाचतांच आनंदित होऊन फिरोजशहानें जमीलाखातुनला हुकूम केला कीं, तूं स्वतः जा आणि रुहआफ्जेचा समाचार घेऊनये. असें ऐकतांच तिनें जेव्हां निघण्याची तयारी केली, तेव्हां ती बातमी बकावलीला समजली आणि तिनेंही आपल्या मातेकडे सांगून पाठविलें कीं, मी आपल्या बहिणीच्या समाचारासाठीं येणार. जमीलाखातुनला वाटलें कीं, बकावलीला तिकडे नेलें तर कदाचित् तिची प्रकृति सुधारण्याचा संभव आहे. तिनें बकावलीला बरोबर घेतलें आणि रुहआफ्जेचे भेटीला जाण्यासाठीं मार्ग क्रमण आरंभिलें.

जेव्हां मुजफ्फरशहाला समजलें कीं, बकावलीसह जमीलाखातून येत आहे, तेव्हां त्यांचा सत्कार करण्यासाठीं त्यानें रुहआफ्जेला पुढें पाठविलें. तिनें दोघींला पाहतांच आधीं आपल्या काकीला नमस्कार केला व नंतर बकावलीला प्रेमालिंगन दिलें. नंतर बकावलीनें विचारल्यावरून तिनें राक्षसाने नेलें व एका शहाज्याद्यानें पराक्रम करून सोडविलें, इत्यादि मजकूर जमीलाखातुनच्या समोर सांगितला; तरी त्या शहाज्याद्याचें नांव मात्र सांगितलें नाहीं. नंतर बकावलीच्या कानांत तिनें सांगितलें कीं, "ताई, ज्यानें मला सोडविलें; तो तुझाच प्रियकर शहाज्यादा ताजुल्मुल्क बरें." असें ऐकतांच बकावलीला अत्यानंद झाला; तरी जमीलाखातुन जवळ होती, तिचा राग मनांत आणून ती कांहीं बोलली नाहीं.

नंतर रुहआफ्जेनें त्या दोघींला घरीं आणतांच मुजफ्फरशहा व हुस्नआरा या दोघांनीं त्यांची भेट घेतली आणि आनंदानें क्षेम कुशल विचारिलें. कांहीं

जाऊन बसला. नंतर एक लाल फळ तोडून खातांच तो आपलें पूर्वरूप पावला. नंतर एक मोठीशी काठी तोडून घेऊन, हिरवीं फळेंही त्यानें घेतलीं व आपल्या कंबरेला बांधलीं. नंतर थोडीशी साल टोपी करण्यासाठीं व पानें घेऊन हवेंत उडाला. तो लांब जाऊन उतरला. नंतर त्यानें चाकूनें आपली मांडी चिरून तींत सापाचा मणि भरला व त्यावर त्या वृक्षाचीं पानें ठेवलीं मात्र, एका क्षणांत जखम भरली. नंतर सालीची टोपी करून काठी हातांत घेऊन तो तेथून निघाला.

## भाग १४वा.

असें सांगतात कीं, ताजुल्मुल्क तेथून जो निघाला तो एका संगमरवरी हौदावर पोंचला. त्याच्या चारी बाजूस चित्रविचित्र रंगांचीं फुलें फुललेलीं होतीं. तें रमणीय स्थळ पाहतांच क्षणभर विश्रांति घ्यावी ह्मणून ताजुल्मुल्क त्या ठिकाणीं वृक्षछायेंत पडून राहिला, तों त्याला निद्रा लागली. तरी क्षणभर निजून जागा होतांच त्याला वाटलें कीं, या पुष्करणींत स्नान करावें. असें मनांत येतांच त्यानें हातांतील काठी व टोपी त्या झाडाखालीं ठेवून हौदांत उडी टाकली आणि इकडे तिकडे गोते मारून बुडी दिली व डोकें वर काढलें, तों त्याला वाटलें कीं, मी एका शहरच्या वेशीजवळ उभा आहें. शिवाय तो स्त्रीरूप पावला. त्याचे पुरुषाचे अवयव नाहींसें झालें व त्या त्या ठिकाणीं सर्व स्त्रियांसारखे अवयव त्याला भासूं लागले. याप्रमाणें विलक्षण प्रकार पाहतांच तो घाबरला. तरी निरुपाय जाणून एका बाजूला जाऊन बसला. इतक्यांत त्या ठिकाणीं एक तरुण पुरुष आला व ताजुल्मुल्काचें तें उत्तम स्त्रीरूप पाहून मोह पावला आणि तिला विचारूं लागला—" हे रूपयौवनसंपन्न सुशीले, तुजवर असें कोणतें संकट आलें आहे ह्मणून तूं अशी एकटी या ठिकाणीं येऊन चिंता करीत बसलीस ? " असें ऐकतांच ताजुल्मुल्क सांगतो—

" माझा बाप एक सौदागर होता. तो व्यापाराला निघाला ह्मणजे मला आपल्या बरोबर घेत असे. कालरात्रीं आह्मी या शहरा बाहेर उतरलों असतां चोरट्यांनीं येऊन आह्मांला लुटलें आणि माझ्या बापासह सगळीं मनुष्यें ठार मारलीं; ह्मणून मी निराश्रित होऊन या ठिकाणीं बसलें आहें. या परदेशांत माझ्या ओळखीचें कोणीही नाहीं. " असें ऐकतांच तो तरुण ह्मणाला—" तुला जर कबूल असेल तर मी आपल्या घरीं तुला घेऊन चलतों. " असें ऐकतांच त्या स्त्रीरूपी ताजुल्मुल्काच्या मनांतही त्या तरुण पुरुषाविषयीं प्रीति उत्पन्न झाली व त्याची स्त्री होऊन तो त्याज बरोबर त्याचे घरीं जाऊन राहिला. पुढें त्या तरुणापासून त्याला गर्भ राहिला आणि नवमास भरतांच तो प्रसूतही झाला व त्यानें एका पुत्राला जन्म दिला.

स्त्रीरूपी ताजुल्मुल्क जरी पुत्र प्रसवला होता; तरी त्या स्थितीचा त्याला खेद होत असे. पुत्र झाल्यानंतर चाळीस दिवसांनीं तो त्याच्या घराशेजारच्या एका हौदांत उतरला आणि बुडीमारून वर निघाला तों त्याचें तें स्त्रीरूप

नाहींसें होऊन भयंकर राक्षसाचें आवडधोबड रूप त्याला प्राप्त झालें. त्याला तो प्रकार पहातांच आश्चर्य वाटलें आणि स्त्रीरूप नाहींसें झाल्यामुळें थोडासा आनंदही झाला. इतक्यांत एक राक्षसी त्याठिकाणीं येऊन उभी राहिली आणि ताजुल्मुल्काचा हात धरून ह्मणाली"—रे बेवकूवा, आज तीन दिवस मुलें उपाशीं मरताहेत, तूं कोणत्या ठिकाणीं गेला होतास? असो. आतां तरी चांगलीशी एक लांकडाची मोळी घेऊन ये. ह्मणजे ती विकून मुलांचा निर्वाह चालवितां येईल." ताजुल्मुकानें आकाशाकडे पाहून ईश्वराची स्तुति केली आणि ह्मणाला—" देवा अजूनपर्यंत तुला माझी दया येत नाहीं काय? अशा प्रसंगांत आणखीं किती दिवस मला ठेवणार? नुकाच एका प्रसंगांतून निघालों तों दुसरा तयारच आहे." असो. त्या राक्षसीनें ताजुल्मुल्काला आपल्या घरीं नेलें. त्याला पाहतांच राक्षसीचीं पोरें बाबा बावा ह्मणून त्याच्या अंगाला विलगलीं आणि आमच्यासाठीं खाऊ काय आणला आहेस ह्मणून विचारूं लागलीं; पण ताजुल्मुल्क त्यांच्याजवळ एकही शब्द बोलला नाहीं. शेवटीं त्या अवदसेनें त्या शहाजाद्याच्या हातांत एक कुऱ्हाड आणून दिली आणि लांकडें तोडून आणण्याचा हुकूम केला. ताजुल्मुल्क तिच्या हातून सहज मुक्ता होते हाच लाभ मानून अरण्यांत गेला आणि विचार करूं लागला— " दोन वेळ हौदांत बुड्या मारून दोन रूपें पावलों. आतां जर तिसरा हौद दृष्टीस पडला तर त्यांतही बुडी मारून काय होतें तें पहावें." असें मनांत आणून तो पुढें जात आहे तों दैवयोगानें तिसरा हौद त्याच्या नजरेस आला तो हौद पाहतांच ताजुल्मुल्काला आनंद झाला व त्यानें ईश्वराचें नांव घेऊन त्यांत उडी टाकली आणि बाहेर निघाला तों आपल्या अस्सल रूपानें पहिल्या हौदाच्या कांठीं तो उभा आहे असें त्याला वाटलें. त्याला त्याची टोपी, काठी वगैरे सर्व सामान दिसलें, तेव्हां अत्यानंद झाला. नंतर त्यानें ईश्वराचे आभार मानून पुनः कोणत्याही हौदांत उडी न टाकण्याचा निश्चय केला व आपला मार्ग धरिला.

## भाग १५ वा.

ही गोष्ट सांगणारा असें ह्मणतो कीं, मागील भागांत सांगितल्याप्रमाणें जेव्हां शाहाज्याद्यानें अनेक संकटें भोगलीं, तेव्हां जमिनीला पाय लागण्याचेंही वर्ज केलें. तो हवेंतून उडत जात असे. एके दिवशीं तो एका पर्वतावर आला. तो पर्वत दिसण्यांत फार रमणीय होता. त्या पर्वतावर संगमरवरी पाषाणांनीं बांधलेली एक हवेली होती. शाहाज्यादा ती हवेली पाहतांच उभा राहिला आणि " एवढ्या मोठ्या घरांत कोण रहातें? पहावें " असें मनांत आणून आंत गेला. जरी तो इकडे तिकडे फिरला, तरी कोणीही त्याच्या दृष्टीस पडलें नाहीं. नंतर तो त्या हवेलीच्या प्रत्येक भागांत फिरूं लागला. इतक्यांत एक दीन स्वर त्याच्या कानीं आला व तो चमकून उभा राहिला. कांहीं वेळानें त्या स्वराच्या अनुरोधानें तो जेव्हां त्या हवेलीच्या मुख्य भागांत गेला; तेव्हां एक नवयौवनसंपन्ना

दिवस तेथें राहून जमीलाखातुन जेव्हां परत निघाली, तेव्हां हुस्नआरा आणि रुहआफ्जा, यांनीं आग्रहपूर्वक तिला सांगितलें कीं, बकावलीची प्रकृति बिघडलेली आहे, यासाठीं चार दिवस तिला येथें ठेवून जा. हवा पूर्ण बदलल्यासारखी होईल आणि कदाचित् तिची प्रकृति सुधारेलही. असें ऐकतांच जमीला खातुन्ला अत्यानंद झाला व ती ह्मणाली—"काय चिंता आहे! बकावली तुमच्या जवळच राहिली तरी मला कांहीं काळजी नाहीं. रुहआफ्जा आणि ती समवयस्क आहे. दोघी आनंदानें राहू लागल्या ह्मणजे माझ्या पोरीला दुष्ट नाद लागला आहे तो सुटण्याचा संभव आहे." असें बोलून बकावलीची माता आनंदानें आपल्या घरीं निघून गेली. नंतर रुहआफ्जा आणि बकावली एकांतांत बसून गोष्टी सांगत असतां रुहआफ्जेनें ताजुल्मुल्काची विरह दुःखांतील स्थिति तिला वर्णन करून सांगितली. ती ऐकतांच बकावलीला फार वाईट वाटलें आणि तिला होणारें विरह दुःख ताजें झाल्यामुळें तीही दीर्घ श्वास सोडून गहिवरली; तरी आपल्या मनाचा कोतेपणा न दिसावा ह्मणून ती रुहआफ्जेला ह्मणाली—"ताई, हीग कोण मेली थट्टा? मला नाहीं बाई असल्या गोष्टी सांगतां येत. कदाचित् तूं ह्मणतेस तसे प्रसंग तुजवरच आले असतील आणि तूं ते मजवर लोटून सांगत असशील; पण मी खरेंच सांगतें, तूं ह्मणतेस तें मला मुळींच कळत नाहीं. शहाज्यादा कोण? ज्यानें तुला सोडविलें तो? त्याच्यावर तुझी प्रीति बसली आहे? असेल बाई. नाहीं तर परी कोण आणि मानव कोण? एकमेकांचा कांहीं तरी संबंध? तुला राक्षसाच्या बंदांतून मानवी राजपुत्रानें सोडविलें ह्मणून तुझी प्रीति त्याच्यावर जडली असेल. तशी कांहीं मी कोणत्याही प्रसंगांत सांपडलें नवतें आणि मी प्रीति ठेवावी इतके कोणत्याही मानवानें मजवर उपकार केलेले नाहींत. मेल्यानों, मजविषयीं तुमच्या सगळ्यांच्याच मनांत भलभलत्या कल्पना भरल्या आहेत ह्या काय ह्मणून? आतां मी तुला शेवटचें सांगतें कीं, जर मजविषयीं ह्यापातशा कल्पना करून भलत्याच गोष्टी माझ्या अंगीं लावाल तर मी एक क्षणभरही या ठिकाणीं राहणार नाहीं. आपली आईकडे निघून जाईन."

रुहआफ्जेनें पाहिलें कीं, ही कांहीं अशी दाद देत नाहीं. तेव्हां ती बोलणें फिरवून तिला ह्मणाली—"ताई, मी तुला नाहीं तसें ह्मणत. अग, दिव्याचें तेज पाहून पतंग त्याच्यावर झेंपा घालतात, तरी त्याचा दिव्याकडे कांहीं संबंध नसतो, त्याप्रमाणें तुझ्या दिव्य रूपावर लुब्ध होऊन पतंगासारखा कोणी जीव देऊं लागला तर तूं काय करशील? तूंच सांग बरें. तुझ्याविषयीं तुझ्या मातेनेंच भलती बातमी उठविली कीं दुसऱ्या कोणी? आतां ती बातमी जर खोटी असेल तर आह्मांला आनंद आहे." याप्रमाणें अनेक प्रकारचीं लाघवी भाषणें करून तिनें बकावलीचा राग शांत केला आणि सहज बोलतां बोलतां तिचा हात धरून जी निघाली ती ज्या ठिकाणीं ताजुल्मुल्काला ठेवलें होतें, त्याठिकाणीं आली आणि बकावलीसह इकडे तिकडे फिरूं लागली. इतक्यांत विरह दुःखानें तळ

मळत असलेल्या ताजुल्मुल्काचा दुःखस्वर त्यांच्या कानीं आला. त्या वेळेस बकावली मनांतल्या मनांत अतिशय थिजली आणि रुहआफ्जेला विचारूं लागली—"ताई कोणग हें? दुःखांत पडल्यामुळें हाय हाय करीत आहे!" रुहआफ्जा म्हणाली—"कांहीं दिवसांपूर्वीं एक शिकार हातीं लागली होती, ती या घरांत कोंडून ठेवली आहे. तुझी इच्छा असेल तर चल आणि ऐक काय आहे तें." असें बोलत असतां तिनें बकावलीला आणून एकदम ताजुल्मुल्का पुढें उभें केलें.

आषक व माषुक एके ठिकाणीं झाल्यावर बिच्याऱ्या लज्जेनें त्याठिकाणीं काय म्हणून रहावें बरें? तशा ठिकाणीं तिला कोणी तरी विचारील? ताजुल्मुल्क आणि बकावली यांची नजरानजर होतांच त्यांच्या मधील शरमेचा पडदा तुटून पडला, दोघांच्याही अवयवांस लोहचुंबकाप्रमाणें आपोआप ओढ लागल्यामुळें गति उत्पन्न झाली आणि प्रीति भरांत आल्यामुळें दोघांनींही एकमेकांकडे धांवत जाऊन एकमेकांच्या गळ्याला मिठी मारली. दोघांचेही गळे भरून आले व नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले. रुहआफ्जा तो तमाशा पहात उभी राहून खूप हंसत होती. जेव्हां दोघांच्याही प्रीतीची उकळी कमी झाली आणि दोघें एकमेकांस सोडून डोळे पुसून एकमेकांकडे पाहूं लागलीं; तेव्हां रुहआफ्जा बकावलीला म्हणाली—"ताई, जगिक व्यवहाराविषयीं पूर्ण अज्ञानत्व दाखविणारी जी तूं, त्या तुझी हीग कोण स्थिति? चमत्कार नव्हे का हा एक? मला बाई मोठें गूढ पडलें आहे, याचा तूं तरी निवाडा करशील का?" बकावली हें भाषण ऐकतांच लाजली व निरुत्तर झाली, तेव्हां रुहआफ्जा पुनः बोलूं लागली—"ताई, तूं बोलत नाहींस, यावरून आतां मला असें म्हणावें लागतें कीं, तूं काकाचें नांव बुडविलेंस आणि सगळ्या परी यातीला कलंक लाविलास!" असें ऐकून बकावली बोलूं लागली—"बाई रुहआफ्जे, आतां तुला खरोखर सांगते कीं, आज तूं माझ्या कित्येक दिवसांच्या बऱ्या न होणाऱ्या हृदयावरील जखमेवर खरोखरीचें मलम लाविलेंस? यासाठीं आतां त्याच हृदयाला शब्दबाणांनीं भेदूं नको. ज्यापेक्षां हा आनंदाचा दिवस दाखविण्याला तूं कारण झाली आहेस, त्यापेक्षां हा असाच आनंद सदोदित रहावा म्हणून माझ्या आईचें मनोधारण कर आणि आमचे दोघांचेही प्राण वाचीव; आतां माझा भाव सगळा तुझ्यावर आहे. या बकावली परीला जगविणें किंवा मारणें तुझ्या हातांत आहे. पहा बाई, मला याहून कांहीं अधिक सांगतां येत नाहीं." याप्रमाणें तिचें सविनय व मृदु भाषण ऐकतांच रुहआफ्जेला तिची दया आली आणि तिनें तिला वचन दिलें कीं, "मी अनेक प्रयत्न करून तुमचें दोघांचें लग्न प्रसिद्ध रीतीनें लागेल असें करीन." याप्रमाणें भाषण करून रुहआफ्जेनें बकावलीला तेथेंच ठेविलें आणि आपल्या मंदिराचा मार्ग धरिला. नंतर दोघेंही एकत्र बसून अत्यानंदानें एकमेकांचा वियोग झाल्यापासून संयोग होईपर्यंत एकमेकांस आपापली हकीकत सांगूं लागलीं.

कांहीं दिवसांनीं बकावलीला तिच्या मातेकडून बोलावणें आलें आणि तिला गेलेंच पाहिजे असें जेव्हां झालें, तेव्हां ताजुल्मुल्काला फारच वाईट वाटलें आणि

तो भावी विरहज्वरानें व्याकुळ होऊन अतिशय शोक करूं लागला. त्याचप्रमाणं बकावलीची स्थिति झाली, तिचें पाऊलही उचलेना. तेव्हां रुहआफ्जेनें तिला धीर देऊन सांगितलें कीं, " तुला असें करणें शोभत नाहीं. तूं जर असा धीर सोडून आईच्या पुढें रडत जाशील तर तिला असें वाटेल कीं, तुझें पूर्वीचे वेड कायम आहे. त्यापासून तुला पुनः हालांत, जाचांत आणि प्रतिबंधांत रहावें लागेल, यासाठीं धीर धर. तेथें गेलीस ह्मणजे आई सांगेल तें निमुटपणें ऐकून तिला असें दाखीव कीं, तुझें मन अगदीं निर्मळ झालें आहे. तुमच्या वियोगाचे दिवस आतां अगदीं थोडे राहिले आहेत. तिकडे जाऊन तूं चांगली वागतेस असें ऐकतांच मी आपल्या बाबाला सांगून तुझ्यासाठीं सर्व कांहीं करवीन. माझ्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवून ईश्वराजवळ आपल्या इच्छितावद्दल विनयानें मागणी कर, ह्मणजे तोच सर्वांच्या मनांत तुझ्या इच्छा पूर्तिवद्दल प्रेरणा करील." याप्रमाणें रुहआफ्जेचें भाषण ऐकतांच बकावलीला संतोष झाला आणि तिच्या सांगण्याप्रमाणें वागण्यांतच कल्याण आहे, असे ताजुल्मुल्काच्याही सांगण्यांत आल्यावरून तिनें शोकाचा त्याग केला आणि आपल्या मातेच्या घराचा मार्ग धरिला. बकावली घरीं आल्यावर ती निवळली आहे असें पाहून तिच्या मातापितरांस अत्यानंद झाला आणि त्यांनीं ईश्वराचे आभार मानले.

## भाग १७ वा.

बकावली आपल्या मातेकडे जाऊन राहिल्यानंतर रुहआफ्जेनें आपल्या मातेला ताजुल्मुल्क आणि बकावली यांची सगळी हकीकत सांगितली आणि "माझ्यासाठीं यांचें लग्न तूं खटपट करून केलें पाहिजे." असा हट्ट धरून बसली. तेव्हां हुस्नआरा क्षणभर स्तब्ध झाली आणि थोडासा विचार केल्यानंतर तिनें एक चांगला चितारी बोलावून ताजुल्मुल्काची तसबीर काढविली व ती तसबीर घेऊन ती इरन येथें गेली आणि जमीलाखातुन व फिरोजशहा यांस भेटली.

एक दोन दिवस तेथें राहिल्यावर हुस्नआरा व जमीलाखातुन एके ठिकाणीं गोष्टी सांगत बसल्या असतां गोष्टींच्या ओघांत ओघ आणून हुस्नआरा जमीलाखातुनला ह्मणाली—" बाई, एखादी अप्रतिम वस्तु ईश्वरेच्छेनें निर्माण होऊन प्रकाश पावली आणि जर तिचा उपयोग कोणी केला नाहीं, अथवा ती वस्तु ज्या ठिकाणीं उत्पन्न झाली असेल त्या ठिकाणच्या मालकानें तिचा उपयोग कोणाला करूं दिला नाहीं, तर ती वस्तु उत्पन्न होऊन उपयोग काय? दुसरें—एखादें पाणीदार मोतीं एकाद्याच्या हातीं लागलें व त्यानें त्याचा कांहींच योग्य उपयोग न करितां जर सर्वकाळ झांकून ठेवलें तर तें मोतीं त्याच्या हातीं लागून काय उपयोग? त्याप्रमाणें तुह्मीं आपल्या बकावलीला आणखीं किती दिवस कुंवार ठेवणार? तुमचें आतां अवश्य कर्तव्य हेंच आहे कीं, तिचा कोणाबरोबर तरी विवाह करून द्यावा."

असें ऐकतांच जमीलाखातुन ह्मणाली— " बाई, तुह्मीं ऐकलें असेलच. तिनें आपली प्रीति एका मानवावर ठेवली आहे. ती सर्वकाळ त्याच्याच नादांत अ-

सते; त्याच्यासाठीं शोक करीत बसते आणि तोच माझा प्रियकर ह्मणून हट्ट ध-रून बसली आहे. तिला आजपर्यंत अनेक प्रकारांनीं सांगितलें, शिक्षा केली, तरी ऐकत नाहीं. मग काय झालें असेल कोण जाणे बाई, तुमच्याकडे चार दिवस राहिली होती, तेथून आल्यापासून आलीकडे चार दिवस मात्र ती बऱ्या बेतानें वागते. हा तुमच्या रुहआफ्जेच्या संगतीचा गुण आहे, हें मी समजतें; तें असो. आतां तुह्मींच सांगा बरें? आजपर्यंत कोणत्या तरी परीनें मनुष्याला वरलें आहे का? किती झाली तरी मानव याति हलकी, त्या यातीबरोबर संबंध करून आपल्या निष्कलंक यातीला कालिमा कां लावावी? त्यापेक्षां कार्टी कुंवार राहिली किंवा तशीच मरण पावली तरी चांगलें असें मला वाटतें आणि घरांतही हेंच मत आहे." असें ऐकून हुस्नआरा आपला मतलब साधण्यासाठीं शांतपणानें ह्मणाली—"बाई, हें जग एकाच ईश्वरानें निर्माण केलेलें असल्यामुळें यांत कोणताही वर्ण उंच किंवा नीच नाहीं, असें मोठमोठ्या तत्ववेत्त्यांचें मत आहे. उंच नीच याति मानणारे केवळ दुरभिमानी ह्मणविले जातात. आतां मनुष्य यातीविषयीं तूं ह्मणतेस, तर त्या यातीचे गुणावगुण अनुभवून तूं केव्हां पाहिले आहेस? माझें मत असें आहे कीं, मनुष्यांप्रमाणें ज्ञानी, विचारी, धैर्यवान, गुणी सत्वस्थ अशी एकही जात नाहीं. माझ्या रुहआफ्जेला राक्षसानें धरून नेलें होतें; पण तिला एका मानवी शहाज्याद्यानेंच सोडविलें. तो कसा असावा असें तुझें मत आहे? ही पहा त्याची तसवीर!" असें बोलून तिनें ताजुल्मुल्काची सुशोभित तसवीर जमीलाखातुनच्या हातांत दिली. ती पाहतांच ती बकावलीची माता कांहीं वेळपर्यंत त्या तसबिरींतील एकेक अवयव आश्चर्यानें न्याहाळून पहात होती. शेवटीं लक्ष्यपूर्वक सर्व तसवीर पाहिल्यामुळें आनंदित होऊन तिनें हुस्नआरेला सांगितलें—"बाई, हा शहाज्यादा जसा रूपगुणसंपन्न दिसतो, तसा जर बकावलीचा प्रियकर असता, तर मी तेव्हांच कबल केलें असतें. पण तिचा नाद पहावा तो भलताच!" याप्रमाणें तिचीं भाषणें ऐकल्यावर हुस्नआरेनें "हाच बकावलीचा प्रियकर व यानेंच पराक्रम करून माझ्या रुहआफ्जेला राक्षसाच्या बंदींतून सोडवून घरीं आणून पोंचविलें. यासाठीं तुह्मीं आपली बकावली याला माझ्यासाठीं अवश्य दिलीच पाहिजे." जमीलाखातुन व फिरोजशहा यांस सांगून त्यांजकडून "आह्मीं बकावली ताजुल्मुल्काला देण्यास राजी आहों." असें ह्मणविलें. हा सगळा प्रकार जबर्दस्तीनें झाला असें नाहीं. ताजुल्मुल्काचें स्वरूप लक्ष्यपूर्वक पाहतांच त्या दोघांसही मोह पडला आणि बकावलीला हाच पति योग्य आहे असें वाटलें व अत्यानंद झाला. तरी फिरोजशहा हुस्नआरेस ह्मणाला—"वहिनी, ही तसवीर आपल्या हातांत आहे आणि ज्याची ही आहे, त्याला आह्मीं आपली बकावली देण्यास आनंदानें तयार आहों; पण याला आतां शोधून आणावें कोठून? आह्मीं यक्षांनीं मानवी बादशहाजवळ जाऊन आपली मुलगी तुमच्या मुलाला देतों असें सांगणें जरा हीनपणाचें आहे." असें ऐकतांच हुस्नआरेनें त्याला सां-

गितले.—भाऊजी, अजून आह्मीं तुमच्या जांवयाला आपल्या घरींच ठेवून घेतलें आहे. आह्मांला ह्या असा संबंध कळल्यावर आह्मीं त्याचे उपकार फेडण्यासाठीं त्याला मुद्दाम राहविलें आणि या खटपटीला आरंभ केला, त्याप्रमाणें तुह्मीं- ही पूर्ण यश दिलेंत. यासाठीं आतां स्वस्थ न राहतां लग्नाच्या तयारीला लागा. आमच्याकडून सर्व सिद्धता आहे. तुमच्याकडून तयारीची सूचना येतांच आह्मीं वराला तयार करून मिरवीत मोठ्या थाटानें घेऊन येतों."

असें ऐकतांच जमीलाखातुन आणि फिरोजशहा यांस अत्यानंद झाला आणि त्यांनीं हुस्नआरेला निरोप देऊन मोठ्या थाटानें लग्न करण्यासाठीं कडेकोट तयारी चालविली. बकावलीलाही हें वर्तमान समजलें आणि तिचा आनंद ग- गनांतही मावेनासा झाल्यामुळें ती अत्युकंठेनें त्या शुभ दिवसाची वाट पहात राहिली. तिकडे ताजुल्मुल्कही आतां सर्व व्यवहार उघड होण्यास हरकत येणार नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें आनंदित होत्साता रुहआफ्जेचे उपकार मानीत राहिला.

## भाग १८ वा.

इरम येथें फिरोजशहानें आनंदानें शादीच्या तयारीचा हुकूम देतांच सर्व रा- जमंदिरें शृंगारलीं गेलीं, पेठांतील प्रत्येक दुकान रंगविलें, जिकडे तिकडे ध्वज पताका आणि तोरणें लागून राहिलीं. सुस्वर मंगलवाद्यें अष्टौप्रहर वाजूं ला- गलीं आणि जिकडे तिकडे आनंदीआनंद पसरून राहिला.

इकडे जंजिरेफिर्दोस येथें मुजफ्फरशहानेंही ताजुल्मुल्काच्या लग्नाची त्याचप्र माणें तयारी चालविली. नियमित लग्न तिथि येतांच ताजुल्मुल्काला उत्तम प्रकार चा पोषाख दिला व त्याच्या अंगावर बेतावाताचेच पण अमूल्य रत्नालंकार घालून आपले सर्व वजीर, अमीर, उमराव, मानकरी आणि सरदार बरोबर घे- ऊन ताजुल्मुल्काला एका सोन्याच्या रत्नजडित अंबारींत बसविलें व इरामच्या मार्गानें कुच करण्याबद्दल डंका दिला. त्या वेळेस नानाप्रकारचीं मनोहर मं- गल वाद्यें वाजवीत ती स्वारी पुढें, व हुस्नआरा, रुहआफ्जा इत्यादि मुख्य अ- म्हाउणींसह लक्षावधि पऱ्या आपापल्या वाहनांत बसून ताजुल्मुल्काच्या शादीसाठीं निघाल्या. या वेळेस ताजुल्मुल्काच्या अंगावर सगळा फुलांचा पोषाख होता.

फिरोजशहाला जामात आपल्या शहरा संन्निध आल्याची बातमी कळतांच तो आपले सरदार व अमीर उमराव बरोबर घेऊन मंगलवाद्यें वाजवीत त्यांस सा- मोरा चालला. जमीलाखातुन हजारों पऱ्या बरोबर घेऊन जांवयाला आणण्या- साठीं निघाली. दोन्ही फौजांची नजरानजर होतांच एकमेकांकडून सलामीबद्दल तोफांची सरबत्ती झाली; त्यामुळें सगळी पृथ्वी व आकाश दणाणून गेलें. नंतर दोन्हीं दळें एकत्र होतांच मंगलवाद्यांच्या गर्दींत सर्वांनीं एकमेकांच्या भेटी घे- तल्या आणि सर्व मिळून सुशोभित केलेल्या इरम शहरांत प्रवेश करितांच जि- कडे तिकडे नाच व रंग सुरू झाले. कोणास कोणत्याही गोष्टीची न्यूनता वाटूं नये अशी फिरोजशहानें व्यवस्था केली होती; वराला शहरांत आणतांच जानि- वस्यासाठीं सुशोभित केलेलीं राजमंदिरें मुजफ्फरशहा कडील लोकांस राहण्यास

दिलीं आणि सायंकाळच्या सुमारास वराला मोठ्या थाटानें मिरवीत मिरवीत लग्न-मंडपांत नेलें. तेथें बकावलीलाही लग्नाचा पोषाख देऊन मोठ्या थाटमाटांतच ठेविलें होतें. वर लग्नमंडपांत येतांच जमीलाखातुन व इतर स्त्रियांची फार गडबड उडाली आणि सर्वांनीं मिळून सुमुहूर्तावर बकावलीचा हात ताजुल्मुल्काच्या हातांत दिला !

मध्यान रात्र होईपर्यंत शादीच्या संबंधानें मेजवान्या व नाच रंग चालला होता. तोंपर्यंत बकावली आणि ताजुल्मुल्क जरी एकत्र बसलीं होतीं, तरि त्यांच्यांत फारच लज्जा व संकोच उत्पन्न झाला होता. त्यांस एकमेकांकडे पाहण्याचीही लाज वाटत असे. बकावली जरी खालीं मान घालून बसलेली होती, तरी सभोंवती बसलेल्या परिजनांची व आई बापांची नजर चुकवून ती हळूच ताजुल्मुल्काच्या मुखाकडे पहात असे. त्याचीही तशीच स्थिति असल्यामुळें जेव्हां तो सर्वांचा डोळा चुकवून तिचा आल्हादजनक मुखचंद्रमा अवलोकन करी, तेव्हां आनंदित होऊन मी कृतार्थ झालों, असें मानी; पण तितक्यांत जर बकावलीची व याची दृष्टि एक झाली; तर दोघेंही आपण धन्य आहों असें मानून स्मितवदनें करीत आणि लगेच बकावली संकोचानें खालीं पाहूं लागे. असो. मध्यान रात्र उलटल्यावर जेव्हां लग्नविधि यथासांग आटपला, तेव्हां जिकडे तिकडे शांतता झाली. नंतर बकावली आणि ताजुल्मुल्क यांनीं आनंदानें इंद्रभुवनासारख्या सुशोभित मणिमय मंदिरांत जाऊन शयन केलें.

दुसरे दिवशीं प्रातःकाल होतांच ताजुल्मुल्क हमामखान्यांत ( स्नानागारांत ) उठून गेला आणि रुहआफ्जा बकावलीचा समाचार घेण्यासाठीं तिच्या मंदिरांत आली व पाहूं लागली, तों रात्रीच्या जागरणामुळें ती रूपसुंदरी गाढ निद्रेंत आहे. केश अस्ताव्यस्त सुटले आहेत, गळ्यांतील हार तुटले आहेत, नेत्रांतील काजळ पसरलें आहे, ओठांवरची लाली मुळींच दिसत नाहीं. गालांवर दांतांचे व छातीवर हातांचें वण उठलेले आहेत. या प्रमाणें थट्टा करण्यायोग्य व्यवस्था पाहतांच रुहआफ्जेच्यानें राहवेना. तिनें बकावलीला जागृत केलें आणि अनेक प्रकारेंकरून तिची थट्टा आरंभिली. तेव्हां बकावलीनेंही गालांतल्या गालांत हंसून तिची बतावणी केली आणि तीहि रुहआफ्जेचा हात धरून स्नानासाठीं हमामखान्यांत निघून गेली. पुढें लग्न समारंभ समाप्त झाला. तेव्हां रुहआफ्जा बकावलीचा निरोप घेऊन आपल्या आईबापांसह आपल्या घरीं निघून गेली.

## भाग १९ वा.

एके दिवशीं ताजुल्मुल्क आणि बकावली यांनीं आपसांत मसलत करून फिरोजशहा आणि जमीलाखातुन यांजपाशीं स्वदेशीं जाण्याबद्दल निरोप मागितला. तेव्हां त्यांना कन्यावियोगाबद्दल जरी दुःख वाटलें; तरी शेवटीं " कन्या हें परक्याचें धन, " असें मानून त्यांनीं त्या दोघांस जाण्याचा हुकूम देऊन त्यांच्या प्रवासाची तयारी करविली. शेकडों लवंड्या ( दासी ) आणि हजारों

गुलाम ( दास ) त्याच्या सेवेसाठीं त्यांच्या बरोबर दिले. शिवाय कोट्यावधि वस्त्रें व अमूल्य अलंकार त्यांनीं कन्येस व जामातास दिले

नंतर त्यांचा निरोप घेऊन ताजुल्मुल्क आणि बकावली दास दासींसह आपल्या मुलखांत येऊन पोंचतांच दिलवर आणि मेहमुदा यांच्या जिवांत जीव आला. ताजुल्मुल्क व बकावली आल्याची बातमी समजतांच दोघींनींही समारंभानें पुढें जाऊन त्यांस महालांत आणलें. बकावलीनें त्या दोघींस बहिणीप्रमाणें आलिंगन दिलें आणि तिघी मिळून आनंदानें कालक्रमण करीत राहूं लागल्या. जैनुल्मुल्क बादशहाला ताजुल्मुल्क आल्याची बातमी कळतांच त्यानेंही येऊन आपल्या प्रिय पुत्राला आणि नव्या सुनेला आशीर्वाद दिला.

ताजुल्मुल्काची माता, मुलगा पुनः एकाएकीं नाहींसा झाला ह्मणून अन्नपाणि सोडून बसली होती. तिनें जेव्हां ताजुल्मुल्क आणखीं एक सुरूप स्त्री वरून आला अशी बातमी ऐकली; तेव्हां ईश्वराचे आभार मानले. इतक्यांत बकावलीसह ताजुल्मुल्क तिच्या जवळ येऊन भेटला. नवी सून पाहतांच तिला अत्यानंद झाला व ती उभयतांच्या विनंती वरून ताजुल्मुल्काच्या बागांत येऊन राहिली.

नंतर "आपले चौघेही वडील पुत्र राज्याला नालायक ठरविलेले आणि आपला तर वृद्धापकाळ झाला;" असें जाणून जैनुल्मुल्क बादशहानें मनांत आणलें कीं, "आतां ताजुल्मुल्कास राज्याधिकार देऊन आपण आपलें वार्धक्य ईश्वर भजनांत घालवावें." या विचारानें तो बादशहा आपले सर्व अमीर, उमराव आणि मुत्सद्दी बरोबर घेऊन एके दिवशीं ताजुल्मुल्काच्या बागांत येण्यासाठीं निघाला. "आपला बाप आपली भेट घेण्यासाठीं येत आहे," असें ऐकतांच ताजुल्मुल्कानें आपल्या लवाजम्यासह पुढें जाऊन विनयानें त्याच्या चरणांचें चुंबन घेतलें आणि त्याला आणून रत्नखचित सिंहासनावर बसवून मोठ्या आदबीनें त्याच्या पुढें हात बांधून उभा राहिला. याप्रमाणें त्याची अति लीनता पाहून बादशहाला अत्यानंद झाला आणि तो ताजुल्मुल्काला आपल्या जवळ बसवून सांगूं लागला—"वत्सा ताजुल्मुल्का, आजपर्यंत मी आपल्या धर्माला व कुलाचाराला अनुसरून या पूर्व प्रदेशाचें राज्य केलें. ज्या वेळेस मी राज्याधिकार घेतला; त्या वेळेस मला अनेक शत्रु होते; कोणालाही माझें बळ ठाऊक नव्हतें आणि प्रजेच्या प्रीतीलाही मी नवखा असल्यामुळें रुचत नव्हतों. तरी ह्या सर्व प्रधान मंडळीच्या व ईश्वराच्या साह्यानें मी आपल्या सर्व शत्रूंवर दाब ठेवून आधीं प्रजेची पूर्ण प्रीति संपादन करून घेतली. त्यामुळें हळू हळू जे शत्रु होते; तेच मित्र झाले आणि मी निर्वेध राज्य करूं लागलों. पुढें तुह्मी पांच स्त्रियांपासून पांच पुत्र माझ्या कुळाला प्रकाशित करण्यासाठीं उत्पन्न झालेत त्यांतील चौघांनींतर कुळाचें नांव बुडवून सर्व जगांत जी निंद्य, ती गुलामाची पदवी धारण केली आहे; ह्मणून ते माझ्या अफाट राज्यास नालायक झालेले आहेत. त्यांनीं दूरवर विचार न करितां आपलें अहित करून घेतलें, तर आतां तूं हें

सर्व राज्य संभाळून मला विश्रांति द्यावीस, अशी माझी पूर्ण इच्छा आहे. तिला अनुकूल जबाब देऊन मला आनंदित कर."

याप्रमाणें बादशहाच्या तोंडचीं भाषणें ऐकतांच कांहीं वेळ विचार करून ताजुल्मुल्क ह्मणाला—"हे दयावंत बादशहा, मी तुझा आज्ञाधारक सेवक, जी आज्ञा करशील ती शिरसावंद्य करून अध्यावचनांत राहणारा आहें, तरी आपण माझा जबाब ऐकण्याची इच्छा केली आहे; ह्मणून बोलतों याची क्षमा असावी. लोकांत असें बोलण्याची चाल आहे कीं, बादशहाच्या बेड्याला तोट्याचें स्वप्नही पडत नाहीं. या समजाप्रमाणें जर पाहूं लागलें, तर तोटा नसावा हें खरें आहे. असें असतां माझे चौघे बांधव दुःखांत, विपत्तींत आणि सर्व प्रकारच्या तोट्यांत पडून हैराण होत आहेत. ही गोष्ट जरी त्यांनीं आपल्या हातांनीं करून घेतली आहे; तरी ते बादशहाचे पुत्र, यासाठीं सुखांतच असले पाहिजेत. आपल्या चरणकृपेनें मला सर्व गोष्टींची अनुकूलता आहे; यासाठीं आपण आपल्या प्रदेशाचे सारखे चारच विभाग करून ते माझ्या चौघांही भावांस द्यावे आणि माझ्या ह्या प्रदेशावर मात्र माझी मालकी ठेवून त्या चौघांच्या राज्यांवर देखरेख करण्याचा अधिकार आपण मला देऊन ठेवावा. अशी व्यवस्था झाली, ह्मणजे आपल्या वीर्यापासून उत्पन्न झालेली संतति दुःखांत रहाणार नाहीं; ते चौघेही सुखांत असले ह्मणजे राज्यांत दंगेधोपे, बंडावा, फितूर आणि रक्तपात हे प्रकार घडून येणार नाहींत. प्रजा सुखांत राहून शांतीचा अनुभव घेईल आणि हेंच राज्य चिरकाल असो ह्मणून ईश्वराजवळ दुवा मागत राहील. आपण सर्व चिंता सोडून खुशाल ईश्वरभजन करीत असावें. चौघांपैकीं कोणाच्याही राज्याची अव्यवस्था होईल तर मी व्यवस्था लावीन आणि परशत्रु येऊन त्यांना त्रास देईल तर मी निवारण करीन. ते चौघे जरी तख्ताच्या लायकीचे नसले, तरी आपले दोनदोन प्रधान एकेकाच्या व्यवस्थेसाठीं नेमून चारी राज्यें चालवावीं आणि आपण आपला सारा वृद्धापकाळ माझी सेवा घेत घालवावा अशी माझी पूर्ण इच्छा मी आपल्या चरणीं सादर केली आहे."

याप्रमाणें ताजुल्मुल्काचे पोक विचार ऐकतांच सर्व प्रधान आणि मुत्सद्दी आनंदानें डोलत असतां त्याच्या दूरदर्शित्वाची तारीफ करूं लागले. बादशहाचा जो चौघां पुत्रांवर अतिशय राग होता, तो ताजुल्मुल्काच्या भाषणानें कांहीं कमी झाला. नंतर त्यानें सर्वानुमतें आपल्या राज्याचे चार भाग करून त्या प्रत्येक भागावर आपल्या एकेक पुत्राची स्थापना केली आणि सर्वांवर देखरेख करण्याचा अधिकार ताजुल्मुल्कास देऊन त्यांनीं सर्व प्रकारें ताजुल्मुल्काच्या हुकुमांत रहावें असें केलें. एकेकाच्या राज्याचा बंदोबस्त करण्यासाठीं जैनुल्मुल्कानें आपल्या जुन्या प्रधानांपैकीं दोनदोन एकेकाकडे नेमले आणि तो स्वतः ईश्वरभजनांत काळ घालविण्यासाठीं ताजुल्मुल्काजवळ येऊन राहिला. त्या दिवसापासून ताजुल्मुल्क, बकावली, मेहमुदा आणि दिलबर हीं चौघे एकमेकांच्या प्रीतिजन्य सखाचा लाभ घेत आनंदानें राहूं लागलीं.

## भाग २० वा.

बकावली आणि ताजुल्मुल्क यांचा विवाहसंबंध घडल्यापासून व बकावली ताजुल्मुल्काच्या बागांत येऊन राहिल्यादिवसापासून तिची इंद्रसभेंत गाण्याना-चण्याला जाण्याची आपोआप बंदी झाली. इंद्रही रात्रंदिवस नृत्यगायनांत नि-मग्न राहणारा असल्याकारणानें त्याला फार दिवसपर्यंत बकावलीची आठवण झाली नाहीं. एके दिवशीं तो सर्व पऱ्यांची चौकशी करीत असतां त्याला ब-कावलीची आठवण झाली. तेव्हां तो चौकशी करूं लागला कीं, " फिरोजशा-हाची कन्या बकावली फारदिवसपर्यंत पाहण्यांत आली नाहीं, ती कोणीकडे गेली ? तिला आमच्या मजलशींत येऊन नृत्यगायन करण्याची मनाई कोणी केली आहे ? " असें ऐकतांच एक परी हात जोडून ह्मणाली—" राजाधिराज, ती बकावली परी एका मानवावर मोहित झाली आहे व त्याजबरोबरच लग्न क-रून रात्रंदिवस त्याच्या खिदमतींत असते. हल्लीं ती परिस्थानाची वस्ती सोडून मृत्युलोकीं जाऊन राहिली आहे. "

याप्रमाणें परीच्या मुखानें बकावलीविषयीं वर्तमान ऐकतांच इंद्राला फार क्रोध आला आणि " बकावली ज्या ठिकाणीं असेल, त्या ठिकाणांतून या वेळेस धरून आणा ! " असा त्यानें कित्येक पऱ्यांला हुकूम केला. इंद्राचा हुकूम ऐकतांच कित्येक पऱ्या विमानांतून बसून निघाल्या, त्या ताजुल्मुल्काच्या बा-गांत येऊन त्यांनीं गुप्तरूपानें बकावलीला जागृत केलें आणि तिच्यावर इंद्राचा कोप झाला होता तो तिला कळवून " या वेळेस अशीच तिकडे चल. " असें ह्मणूं लागल्या. तेव्हां निरुपायास्तव बकावली त्या पऱ्यांच्या बरोबर तशीच वि-मानांत बसून चालती झाली. तिला वाटलें कीं, " जर मी या वेळेस न गेलें, तर इंद्र राजा माझ्या प्रियकरावरही कांहीं संकटें आणून त्याचा व माझा पूर्ण वियोग करील. त्यापेक्षां आपणच जाऊन जें दैवीं लिहिलें असेल तें दुःख भो-गून आपल्या प्रियकराला भेटण्यासाठीं परत यावें. " असा विचार करीत ती इंद्रसभेपर्यंत पोंचतांच मोठ्या नम्रतेनें हात बांधून इंद्रा समोर जाऊन उभी रा-हिली. तिला पाहतांच इंद्र क्रोधानें लाल झाला आणि त्यानें पऱ्यांस हुकूम केला कीं, या अपराधी स्त्रीला अग्नींत टाका, ह्मणजे हिच्या अंगाला जी मानवीदु-र्गंधी लागली आहे, ती नाहींशी होऊन ही शुद्धपणा पावेल. असें ऐकतांच कित्येक पऱ्यांनीं त्या बकावलीला बांधून उचललें आणि भयंकर अग्निकुंडांत नेऊन टा-कलें. कांहीं वेळानें जळून तिचें अगदीं भस्म झाल्यावर इंद्रानें कांहीं मंत्र ह्मणून थोडेंसें पाणी त्या राखेवर शिंपडलें आणि तिला पुनः पहिल्याप्रमाणें सजीव केलें आणि मग आनंदानें नृत्य व गायन करण्याची आज्ञा दिली. जेव्हां बकावली अनेक प्रकारें नृत्य करून कोकिलेप्रमाणें पंचम स्वर आलापून गायन करूं लागली; तेव्हां सर्व सभाजन नागाप्रमाणें डोलूं लागले आणि अत्यानंदानें "वा-हवा ! वाहवा ! " ह्मणूं लागले. राजा इंद्रानें खुष होऊन तिला अनेक बक्षिसें दिलीं आणि नित्य नियमित वेळीं रात्रीं येऊन नृत्यगायन करण्यास न चुक-

ण्याबद्दल सक्त ताकीद देऊन त्यानें तिला निरोप दिला. तेव्हां ती आपल्या विमानांत बसली आणि रात्रींतल्यारात्रीं ताजुल्मुल्काच्या बागांत येऊन, विमान गुप्त करून ठेवून तिनें गुलाबाच्या हौदांत स्नान केलें आणि प्रिय वियोगाग्नीनें जी अंगाची आग झाली होती; ती जाण्यासाठीं ताजुल्मुल्क स्वस्थ निजला होता, त्याला येऊन प्रेमानें आलिंगन दिलें.

त्या दिवसापासून नित्य रात्रीं तिनें ताजुल्मुल्क निजल्यावर इंद्रसभेंत जावें, अग्नींत जळून ज्यावें आणि पुनः जिवंत होऊन नृत्य गायन करून इंद्राला संतोषित करावें आणि मग ताजुल्मुल्काजवळ येऊन आनंदानें कालक्रमण करावा. असें चाललें असतां एके रात्रीं बकावली निघून गेल्यावर ताजुल्मुल्क जागृत झाला आणि " दोन्हीं स्त्रिया आहेत व बकावली जवळ नाहीं " असें पाहतांच घाबरला. नंतर कांहीं वेळानें " ती बागेंत गेली असेल, " असें मानून तो बागेंत आला आणि चोहोंकडे फिरून तिचा शोध करूं लागला; परंतु जी इंद्रसभेंत गेलेली, ती भूलोकीं कोठून सांपडणार ? शेवटीं तो थकला आणि डोळे ताठून येततोंपर्यंत तिची वाट पहात बिछान्यावर जाऊन बसला आणि अनेक प्रकारचे विचार मनांत उद्भवतां उद्भवतां त्याला निद्रा लागली. कांहीं वेळानें बकावली इंद्रसभेंतील नृत्यगायन आटपून आली व गुलाबपाण्यांत स्नान करून ताजुल्मुल्काला कवळून निजून राहिल्यावर तो पुनः जागृत झाला व ती आपल्याजवळच आहे असें पाहून फारच आश्चर्यांत पडला. तरी विचार करून तो कांहींएक न बोलतां स्वस्थ राहिला आणि सगळा दिवस हंसून खेळून काढल्यावर रात्र होतांच त्यानें बकावली कोठें जाते ? हें पाहण्यासाठीं जागृत राहण्याचा निश्चय केला. शयनस्थानीं जाण्याची वेळ होतांच तो तेथें जाऊन तोंडावर वस्त्र घेऊन निजला आणि गाढ निद्रा लागली आहे असें दाखविण्यासाठीं घोरूंही लागला.

जेव्हां मध्यानरात्र झाली आणि बकावलीची इंद्रसभेस जाण्याची वेळ आली; तेव्हां ती ताजुल्मुल्काजवळून उठली आणि आपल्या इच्छेप्रमाणें शृंगार करूं लागली. ताजुल्मुल्क तो सर्व प्रकार पहात होतांच; ती महालांतून बाहेर पडतांच तोही तिच्या मागून बाहेर आला. तिनें बाहेर येऊन आकाशाकडे पाहिलें व दोन्ही हातांची टाळी वाजविली. इतक्यांत एक विमान आकाशांतून उतरलें व बकावली पुढें स्थीर झालें. विमान येतांच बकावली त्यांत बसली आणि निघाली, तेव्हां शहाज्याद्यानें तिच्या विमानाचे खूर धरले आणि दैवावर भरंवसा ठेवून तिच्या बरोबर लटकत निघाला. कांहीं वेळानें त्यालाही जमीन अगदीं दिसेनाशी झाली; तरी त्यानें धीर सोडला नाहीं. विमान आकाशमार्गांतून वेगानें जें चाललें होतें, तें कांहीं वेळानें इंद्रसभेच्या दारांत येऊन स्थिर झालें. तेव्हां बकावली त्यांतून उतरली व एका बाजूला उभी राहिली; त्याचप्रमाणें शहाज्यादाही त्याचे खूर सोडून एका बाजूला लपून उभा राहिला आणि ईश्वराच्या अगाध करणीचा चमत्कार अनुभवूं लागला. त्याठिकाणीं जिकडे तिकडे रूपवान् पऱ्या फिरत होत्या आणि गायनाचे व वाद्यांचे मंजुळ स्वर

चोहोंकडून ऐकूं येत होते. ताजुल्मुल्क तेथील नादब्रह्माविषयीं विचार करीत आहे, तों अकस्मात् कित्येक पऱ्या आल्या व त्यांनीं बकावलीचे हातपाय बांधून तिला पेटलेल्या अग्निकुंडांत टाकून दिलें आणि सर्व त्या कुंडासभोंवतीं हंसत उभ्या राहिल्या. हा प्रकार पाहतांच ताजुल्मुल्क शोकानें आपले मस्तक बडवून आक्रोश करूं लागला; पण इतक्यांत बकावलीची राख होतांच एका परीनें थोडेसें पाणी शिंपडून तिला जिवंत केलें आणि ती इंद्राच्या सभेंत जाऊन आनंदानें नृत्यगायन करूं लागली. शहाज्यादाही तिच्या मागून सभेंत गेला आणि भव्य इंद्रसभा पाहतांच थक्क झाला. त्या सभेंत कित्येक देव, पऱ्या आणि स्वर्गवास करीत असलेले मानवही होते, ह्मणून शहाज्याद्याला कांहीं कोणी ओळखलें नाहीं.

बकावलीचें नृत्य व गायन चाललें आहे व जिकडून तिकडून तिला शाबासकी मिळत आहे, सर्वलोक गायनाला व तिच्या हावभावांला अगदीं लुब्ध झालेले आहेत व एकाग्रवृत्तीनें त्या लावण्यलतिकेकडे पहात आहेत. तों बकावलीचा तबलजी फारच वृद्ध झालेला होता व त्याच्या हातानें वाजविण्यांत थोडासा रंग कमी पडत होता, हें जाणून ताजुल्मुल्क त्याला हळूच ह्मणाला—"जर तुला फार श्रम झाल्यामुळें तूं थकला असलास, तर तबला माझ्या हवालीं कर. मी मजलशीच्या रंगाचा भंग होऊं देणार नाहीं." असें ऐकतांच त्या तबलजीनें तबला ताजुल्मुल्काच्या हवालीं केला. शहाज्यादा वादनविद्येंत फार प्रवीण होता. त्यानें तबल्यावर थाप देतांच बकावलीच्या नृत्य गायनाला अधिक रंग आला व ती आनंदानें अशी नाचली कीं, इंद्रानें खुश होऊन आपल्या गळ्यांतील अमूल्य रत्नहार काढून तिच्या गळ्यांत घातला. तेव्हां तीही नाचतां नाचतां आनंदानें मागें हटत आली व "आपला तबलजी आज कमाल करतो" असें मानून तोच हार शहाज्याद्याच्या गळ्यांत घालून पुढें झाली. नंतर कांहीं वेळानें नृत्यगायन पूर्ण झालें व बकावली अनेक बक्षिसें मिळवून पुनः विमानांत येऊन बसली. तेव्हां शहाज्यादाही जसा गेला होता; तसाच आपल्या बागेंत परत आला. बकावली जेव्हां स्नान करण्यासाठीं, गुलाब पाण्याच्या हौदाकडे गेली; तेव्हां ताजुल्मुल्क आपल्या बिछान्यावर जाऊन निजला आणि प्रातःकाल होतांच उठून बकावलीकडे पाहून हंसूं लागला. तेव्हां बकावली विचारूं लागली "प्राणनाथ, आज आपण विनाकारण हंसतां हें काय?" ताजुल्मुल्क ह्मणाला—"प्रिये, कालच्या रात्रीं मी एक चमत्कारिक स्वप्न पाहिलें. त्याची आठवण झाली ह्मणजे हंसूं आल्यावांचून रहात नाहीं." असें ऐकतांच बकावली पुनः विचारूं लागली—"प्राणनाथ, स्वप्नपाहणें हा या जगांतील एक ईश्वरी चमत्कार आहे. आपण जें हंसण्यासारखें स्वप्न पाहिलें असेल, तें मला सांगावें, ह्मणजे मलाही आनंद होईल." असें ऐकतांच ताजुल्मुल्क ह्मणाला—"प्रिये, मी असें पाहिलें कीं, मध्यरात्रीच्या सुमारास तूं मला टाकून कोठें तरी निघून जातेस." हे शब्द ऐकतांच बकावली आपल्या मनांत चपापली आणि "याला

आपलें कृत्य समजलें आहे, तरी तें कोठवर समजलें असावें? " याचा आदमास घेण्यासाठीं ती पुनः त्याला ह्मणाली—"बरें, आणखीं कांहीं पाहिलें आहे ? " शहाज्यादा ह्मणाला—" गेल्या रात्रीं मी तुझ्या विमानाचे खूर धरून तुझ्याबरोबर इंद्रसभेस गेलों होतों. तेथें पोंचतांच पऱ्यांनीं तुला बांधून अग्निकुंडांत टाकलें व जाळलें. त्यावेळेस मला फार वाईट वाटलें; पण इतक्यांत एका परीनें थोडें पाणी शिंपून तुला जिवंत केलें. नंतर तूं इंद्रसभेंत गेलीस आणि नृत्य गायन करूं लागलीस. तुझा तबलजी फारच वृद्ध होता व गायन रंगाचा भंग होऊं लागला तो माझ्यानें पाहवेना; ह्मणून तुझ्या तबलजीपासून मी तबला मागून घेतला आणि वाजवूं लागलों. तेव्हां सर्व सभाजन तुला खूप वाहवा देऊं लागले. इंद्रानें खुष होऊन काल रात्रीं तुला रत्नहार बक्षीस दिला. तो तूं आपल्या पखवाज्याला दिलास; पण स्वप्नाचा चमत्कार असा कीं, तो माझ्या गळ्यांत आहे ! " असें बोलून शहाज्याद्यानें आपल्या गळ्यांत असलेला तो इंद्रलोकचा दागिना तिला दाखविला. तेव्हां ती स्तब्ध झाली आणि हाच मजबरोबर आला होता असें निश्चयात्मक ठरवून अतिशय दुःखित होत्साती शहाज्याद्यास ह्मणाली:—

" प्रियकरा, कसें हें तुझें धाडसाचें कृत्य ? या योगानें तूं आपला वैरी आपणच होऊन बसलास ! मी तुझ्यासाठीं आपल्या आईबापांचा वियोग सोसला आणि येथें आलें. तरी आमची जात इंद्राची ताबेदार पडली, जेव्हां त्यानें माझी आठवण काढून कोप केला, तेव्हां मला मुकाट्यानें जावें लागलें. तेथें गेल्यानंतर जें कांहीं दुःख आहे तें तर तूं आपल्या डोळ्यांनीं पाहिलेंस; ह्मणून अधिक सांगण्याची कांहीं गरज दिसत नाहीं. तर तुझ्या संयोगासाठीं मी नित्य अग्नींत जळून जाण्यासही राजी झालें. त्याप्रमाणें तूंही जर माझा वियोग नित्य चार चार घटका अनुभवीत राहतास तर कांहीं चिंता नवती. आतां या गोष्टीचा परिणाम मला नीट दिसत नाहीं. आतां मला असें संकट पडलें आहे कीं, तुला जर तेथें न न्यावें तर चालत नाहीं आणि न्यावें तर कोठवर चोरून ठेवावें ! असो. आतां जें दैवीं लिहिलें असेल तें कांहीं चुकत नाहीं. यासाठीं आज केवळ मी आपल्या दैवाची परीक्षाच घेणार आहें. पुढें ईश्वराची मर्जी असेल तसें होईल. " याचप्रमाणें भाषण करून जेव्हां तिची इंद्रसभेस जाण्याची वेळ आली; तेव्हां ती ताजुल्मुल्काला आपल्या बरोबर इंद्रसभेस घेऊन गेली. तेथें जाऊन तिचा नित्य विधि आटोपेपर्यंत शहाज्यादा लपूनच उभा होता. जेव्हां ती इंद्रासमोर जाऊन उभी राहिली तेव्हां हात जोडून ह्मणाली:—"महाराज,आज मी आपल्या बरोबर एक चांगला पखवाजी आणला आहे. जर आपली आज्ञा असेल, तर वाजविण्यासाठीं हजर होईल. " असें ऐकतांच इंद्रराजानें सांगितलें कीं, " फार चांगली गोष्ट आहे; त्याला घेऊनये. "

शेवटीं शहाज्यादा इंद्रसभेंत जाऊन तबला वाजवूं लागला आणि बकावली नाचूं व गाऊं लागली. त्यादिवशीं असा कांहीं चमत्कार झाला कीं, बकावली

त्या नृत्य गायनांत निमग्न झाल्यामुळें सगळी सभा बेहोष होऊन गेली. इंद्रराजा तर फारच खुष झाला आणि अत्यानंदानें बकावलीला ह्मणाला—"हे बकावली, जी तुझी इच्छा असेल ती मी आज पूर्ण करतों. तुला काय पाहिजे तें माग." असें ऐकतांच बकावली हात जोडून उभी राहिली आणि ह्मणाली— "महाराज, आपल्या चरणकृपेंकरून मला कोणत्याही पदार्थाची न्यूनता नाहीं. सर्व गोष्टी अनुकूल आहेत. तरी महाराज प्रसन्न होत आहेत, तर हा पखवाज वाजविणारा मला बक्षीस करावा. मी याच्या प्रीतिपाशांत बद्ध आहे."

याप्रमाणें बकावलीचीं भाषणें ऐकतांच इंद्रराजा अति क्रोधानें शहाज्याद्याकडे पाहूं लागला. आणि ह्मणाला–"मानवा, तूंही या बकावलीवर फिदा असशील नव्हे! चिंता नाहीं. तुह्मीं दोघेंही आपल्या प्रीतीचीं फळें चाखा. तूं अशी इच्छा करीत असशील कीं, बकावली सारख्या परीला मेहनती शिवाय येथून घेऊन जाईन व आपली बगल गरम करीन; परंतु मूर्खा, तसें कधींही घडणार नाहीं." इतकें बोलून त्यानें बकावलीकडे तोंड फिरविलें आणि ह्मणाला--"हे दुष्ट स्त्रिये, काय करावें? मी तुला वचन देऊन फसलों, यासाठीं हा पखवाजी तुला मिळेल. परंतु बारा वर्षें पर्यंत तुझें कंबरे खालीं धड पाषाणाचें होईल." याप्रमाणें त्याच्या तोंडांतून शब्द निघतांच ती बकावली अर्धी दगडाची होऊन तेथून गुप्त झाली. बकावली इंद्रसभेंतून गुप्त होतांच शहाज्यादा अत्यंत दुःखित होत्साता शोक करूं लागला. तेव्हां इंद्रानें हुकूम करून पऱ्यांकडन त्यालाही पृथ्वीवर फेंकून देवविलें.

### भाग २१ वा.

पऱ्यांनीं ताजुल्मुल्कास जो फेंकला, तो एका भयंकर जंगलांत जाऊन पडला. तीन दिवस पर्यंत तो बेशुद्धच होता. चौथ्या दिवशीं शुद्धीवर आला आणि चोहोंकडे पाहून आपल्या प्रियेला आठवून शोक करूं लागला. प्रत्येक वृक्षाला व पाषाणाला तो आपल्या प्रियेचा शोध विचारूं लागला. एके दिवशीं तो शाहाज्यादा अरण्यांतून फिरत असतां एक संगमरवरी दगडांनीं बांधलेला तलाव त्याच्या दृष्टीस पडला. त्यांतील उदक गुलाबपाण्याप्रमाणें सुवासिक होतें. त्या तलावाच्या आसपास सर्व फलवृक्ष फलभारानें नम्र झालेले होते. शाहाज्याद्यानें तेथें जाऊन क्षणभर विश्रांति घेतली आणि स्नान करण्याची इच्छा झाल्यावरून त्यानें त्या सुशोभित तलावांत स्नान केलें. नंतर एक छाया वृक्ष पाहून तो त्या खालीं जाऊन स्वस्थ निजून राहिला. तरी त्याच्या प्रियेचा ध्यास नाहींसा झाला नवता.

नंतर त्याच ठिकाणीं कित्येक पऱ्या येऊन इतस्ततः संचार करूं लागल्या; ज्या बकावली आणि ताजुल्मुल्क यांची हकीकत पूर्ण जाणत होत्या. कांहीं वेळानें त्या पऱ्यांनीं त्याच तलावांत स्नानें केलीं आणि केंस सुकविण्यासाठीं त्या–ताजुल्मुल्क ज्या वृक्षाखालीं निजला होता–त्याच वृक्षाखालीं येऊन व

सल्या. इतक्यांत एका परीची दृष्टि शहाज्याद्यावर गेली आणि ती आपल्या सोबतिणींस सांगूं लागली—"बायांनों, बकावलीचा तबलजी हा याठिकाणीं निजला आहे." हे शब्द ताजुल्मुल्काच्या कानीं पडतांच त्यानें आपले दोन्ही नेत्र उघडले आणि तो दीनमुद्रेनें त्यांजकडे पाहूं लागला. त्याही जेव्हां त्याजकडे कृपादृष्टीनें पाहूं लागल्या, तेव्हां ताजुल्मुल्क त्यांना विचारूं लागला. "बायानों, बकावली कोठें आहे? याविषयीं तुह्मांला कांहीं माहिती आहे काय?" असें विचारीत असतां जेव्हां त्याच्या नेत्रांतून अश्रुप्रवाह चालूं लागला; तेव्हां त्या सर्व पऱ्यांस त्याची फार दया आली आणि त्या त्याला सांगूं लागल्या—"हे तरुणा, आह्मीं आपल्या नेत्रांनीं तर तिला पाहिलें नाहींच; पण असें ऐकलें आहेकीं, सिंहलद्वीपांत एक ओसाड देवालय आहे, त्या देवालयांत ती अर्धी नाभीपर्यंत दगडाची होऊन राहिलेली आहे. त्या देवालयाचें द्वार नित्य प्रहररात्रीं मोकळें होतें. व प्रातःकाळ होतांच आपोआप बंद होतें." असें ऐकतांच शहाज्याद्यानें विचारिलें—"तो देश कोणत्या प्रकारचा आहे बरें? आणि तो मुलूख कितीसा दूर आहे?" पऱ्या ह्मणाल्या—"बाबारे, तें कांहीं तूं विचारूं नको. त्या मुलखाच्या मार्गानें मनुष्य जरी सगळया जन्मभर चालत राहिलें; तरी तेथें पोंचणार नाहीं" असें ऐकल्या बरोबर ताजुल्मुल्क पूर्ण निराश झाला आणि आक्रोश करीत जमिनीवर शिर आपटूंलागला. सर्व पऱ्यांनीं जेव्हां त्याची दीनवाणी स्थिति पाहिली; तेव्हां त्यांस त्याची दया आली आणि "या मानवाला बकावलीच्या स्थानापर्यंत पोंचवावें, मग दोघांच्याही नशिबांत जें लिहिलें असेल तें होईल." असा त्यांनीं आपसांत ठराव केला व तो त्याला कळविला. तेव्हां शहाज्यादा त्यांचे अनंत उपकार मानूं लागला आणि वारंवार त्यांच्या पाया पडून "तुह्मी मला जीवदान देणाऱ्या आहां!" असें ह्मणूं लागला. नंतर त्या सर्व पऱ्यांनीं त्याला घेऊन उड्डाण केलें आणि एका क्षणांत सिंहलद्वीपांत आणून टाकलें व त्या आपल्या ठिकाणीं चालत्या झाल्या.

सिंहलद्वीपांत पोंचल्यावर कांहीं वेळानें शहाज्यादा सावध झाला आणि त्यानें आपले नेत्र उघडून पाहिलें, तों एका अफाट, भव्य आणि सुशोभित नगराजवळ झाडाखालीं आपण आहों, असें त्याला वाटलें. शहराच्या आसपास असंख्यात् मनुष्यें फिरत होतीं; त्यांपैकीं एकही कुरूप नव्हतें. फार काय सांगावें? तेथील वृक्ष, वल्ली आणि इतर सर्व प्रकार फारच सुशोभित दिसत असत. शहाज्याद्याला तो देखावा पाहिल्याबरोबर एका प्रकारें संतोष वाटला. "आपण भयंकर अरण्यांतून निघून मनुष्य वस्तींत येऊन पडलों आहों" हें त्याच्या मनाला पूर्ण बिंबल्यावरून कांहीं वेळानें तो बसलेल्या जाग्यावरून उठला आणि हळू हळू शहराकडे चालूं लागला. कांहीं वेळानें जेव्हां तो त्या शहराच्या वेशीजवळ दाखल झाला; तेव्हां त्याला त्या नगरद्वाराची रचना फारच अपूर्व दिसली. जरी तो राजपुत्र असून स्वर्गोपासून शोभा पहात पहातच

आला होता; तरी त्या द्वारावरील चमत्कारिक कुशलता पाहून तो थक्क झाला. क्षणभर उभा राहून त्यानें त्या नगरांत प्रवेश केला. पहिल्यानेंच त्याला सुशोभित बाजार दिसला. त्यांत कोट्यावधींची घडामोड चालली होती. सर्व उदमी लोक आपापल्या व्यापारांत निमग्न झालेले होते. ताजुल्मुल्क प्रत्येक दुकानाची शोभा व टापटीप पहात पुढें जात असतां एक ब्राह्मण हातांत पूजासाहित्य भरलेलें तबक घेऊन जात असलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्याला पाहतांच ताजुल्मुल्कानें जमीनीपर्यंत लवून सलाम केला आणि हात जोडून त्याच्यापुढें तो अतिलीनपणानें उभा राहिला. तेव्हां ब्राह्मणानें खोळंबून त्याला विचारिलें—"हे तरुणा, तूं प्रवासी दिसतोस व या मुलखांत पहिल्यानेंच आला आहेस असें वाटतें. तर सांग, तुझी काय इच्छा आहे ? तूं मला काय विचारतोस." याप्रमाणें त्या ब्राह्मणाचें सौजन्य पाहून ताजुल्मुल्क त्याला विचारूं लागला— महाराज, आपण पुजारी आहां असें वाटतें; तर कोणत्या देवालयांत जाऊन पूजा करित असता, हें जर कृपाकरून सांगाल तर मजवर फार उपकार होतील. आणखीं या तुमच्या शहरांत किती देवालयें आहेत ? या गोष्टीचीही माहिती जर आपण सांगाल, तर मी आपला फार अभारी होईन." असें ऐकतांच तो ब्राह्मण ह्मणाला मी येथील एका शिवालयांत जाऊन तेथें सांबाची पूजा करीत असतों. येथें अनेक देवतांचीं देवालयें आहेत. तीं सर्व तुला दाखविण्यासाठीं तुजबरोबर फिरण्याला मला वेळ नाहीं. याच मार्गानें पुढें जाशील तर तुला दोन तीन देवालयें दिसतील. त्यांशिवाय समुद्र किनाऱ्यावर थोड्याच दिवसांत एक नवीन देवालय उत्पन्न झालें आहे. तें कोणत्या देवाचें आहे हें कांहीं कळत नाहीं. कारण सगळा दिवस त्याचें द्वार बंद केलेलें असतें." असें बोलून तो ब्राह्मण निघून गेला. तरी ताजुल्मुल्काला त्याच्या सांगण्यानें जरासा धीर आला आणि तो शहरांतून मागें फिरून समुद्रकिनाऱ्यावर आला. तेथें त्याला एक देवालय फारच विचित्रघाटानें बांधलेलें दिसलें आणि अत्यानंद झाला, "याच देवालयांत माझी प्रिया आहे." अशी त्याच्या जिवाची पूर्ण खात्री झाली आणि तो अतित्वरेनें त्या मंदिराजवळ गेला; पण त्याचा दरवाजा बंद होता. त्याही गोष्टीचा त्याला संतोषच वाटला आणि तो तेथें सूर्यास्त होऊन प्रहर रात्र निघून जाईपर्यंत आपल्या प्रियेचें चिंतन करीत स्वस्थ बसून राहिला.

शेवटीं प्रहर रात्र होऊन गेली आणि त्या मंदिराचा दरवाजा अकस्मात् उघडला. तेव्हां ताजुल्मुल्क निर्भय चित्तानें आंत गेला आणि पाहूं लागला, तों जिकडे तिकडे अपूर्व प्रकाश असून बकावली एका सिंहासनावर नेत्र झांकून बसलेली आहे. शहाज्यादा तिला पाहतांच जवळ गेला आणि पाहूं लागला; तों तिचें नाभीपासन खालीं सर्व शरीर दगडाचें आहे आणि वर मात्र ती पूर्व रूपानें जशीच्यातशीच आहे. तिची ती कष्टतर स्थिति ताजुल्मुल्काला फार दुःखदायक झाली आणि तो लांबलांब सुस्कारे टाकून शोक करूं लागला. त्याचा शोकस्वर ऐकतांच बकावलीनें नेत्र उघडले आणि आपल्या प्रियकरास पा-

इतांच आश्चर्यचकित होत्साती त्याला विचारूं लागली-" प्रियकरा, शेवटीं तूं माझा शोध करीत येथपर्यंतही आलास ऑं? धन्य आहे तुझ्या प्रीतीची! आणि तुलाच वरलें ह्मणून अशा संकटांत असतांही मी आपल्याला धन्य ह्मणून घेतें." इतकें बोलून तिनें त्याला त्याची हकीकत विचारितांच त्यानें इंद्रसभे- तून पऱ्यांनीं टाकून दिलें, येथपासून आरंभ करून तिची व त्याची भेट हो- ईपर्यंतची सर्व कथा तिला सांगितली. नंतर दोघेंही रात्रभर आपापल्या सुख- दुःखाच्या गोष्टी सांगत बसलीं.

नंतर जेव्हां प्रातःकाल होण्याचा वेळ जवळ आला; तेव्हां बकावली ताजु- ल्मुल्काला ह्मणाली-प्रियकरा, आतां तूं या मंदिरांतून बाहेर निघून जा. ना- हींतर सूर्योदय होतांच तूंही माझ्याप्रमाणें अर्धा दगडाचा होशील. असें बो- लून तिनें आपल्या गळ्यांतील एक अमूल्य रत्नहार काढून त्याच्या हवालीं केला आणि सांगितलें-" आतां हा दागिना विकून तूं आपल्या स्थितीची सु- धारणा कर आणि व्यवस्थेनें या शहरांत राहून मला नित्य भेटत जा. ह्मणजे जरी मी दुःखांत आहें, तरी कांहीं सुख वाटेल." असें ऐकतांच शहाज्यादा तिला आलिंगन देऊन व तो दागिना घेऊन बाहेर पडला. त्यानें बाजारांत जाऊन तो दागिना विकला आणि एक हवेली खरेदी करून दासदासींसह सर्व सामान सुमानाची व्यवस्था केली व त्या वाड्यांत नित्य प्रहररात्र होईपर्यंत आनंदानें राहूं लागला. नियमित वेळीं त्यानें बकावलीच्या मंदिरांत जाऊन तिला भेटावें आणि सगळी रात्र तिच्या जवळ बसून घालवावी व प्रातःकालच्या सुमारास आपल्या वाड्यांत येऊन रहावें.

ताजुल्मुल्क त्या शहरचा रहिवासी झाल्यावर त्याच्या सौजन्यामुळें त्याचे शेजारी पाजारी त्याचे मित्र झाले आणि नित्य त्याला सहल करण्यासाठीं घे- ऊन जाऊं लागले. एके दिवशीं ताजुल्मुल्क आपल्या त्या मित्रांबरोबर फिरत असतां सहज बाजारांत जाऊन पाहूं लागला, तों कित्येक लोक फकिराच्या वेषानें असून अतिशय शोकाक्रोश करीत बसलेले आहेत. त्यांस पाहतांच शहा- ज्यादा आपल्या मित्रांजवळ त्यांची चौकशी करीत असतां ह्मणाला-" हे सर्व दुःखित लोक मला जरी उघडपणानें फकीर दिसतात तरी कोणी राजपुत्र असावेत असें वाटतें. हे सर्व अशा स्थितींत आहेत, याचें कारण काय बरें?" असें ऐकतांच त्यांतील एक मित्र ह्मणाला-" मित्रा ताजुल्मुल्का, तुझ्या अज- मासाप्रमाणें हे सर्व शहाज्यादे व कोणी अमीरज्यादे आहेत; परंतु सगळे प्री- तिरूप प्रचंड अग्नींत जळत राहिलेले आहेत. यांची कथा तुला सांगतों ऐक—

या नगरीच्या "चित्रसेन" नामक राजाची कन्या "महापारा" अतिरूप- वती आहे. तिच्या सारखी लावण्यसंपन्न स्त्री या जगांत शोधूं गेल्यास एकही सांपडणार नाहीं. सूर्यचंद्रही तिच्या तेजापुढें दिपून जातात. त्या राजकन्ये प्र- माणेंच रूपगुणसंपन्न तिच्या दोन सख्या आहेत, त्यांतील एक तांबोळ्याची मु- लगी आहे, तिचें नांव "नरमला" आणि दुसरी माळ्याची मुलगी आहे तिचें

नांव " चीला " ह्या तिघीही तरुणी लावण्याच्याखाणी असून एकमेकींत सख्यत्व राखून राहणाऱ्या असल्याकारणानें त्यांचें खाणें, पिणें, निजणें, बसणें, उठणें, आणि हास्यविनोदादि क्रीडा करणें, हीं सर्व कर्मे एकत्र होत असतात. त्या तीघींचाही असा निश्चय आहे कीं, जिच्या मनाला जो पुरुष योग्य वाटेल, तो तिनें वरावा. आजपर्यंत सहस्रावधि तरुण त्यांची लावण्यगुणकीर्ती ऐकून त्यांस वरण्यासाठीं आले, पण ते त्यांस न आवडल्यामुळें वैराग्य घेऊन रात्रंदिवस त्यांच्या ध्यासांत राहिलेले आहेत; परंतु अद्याप एकही तरुण पुरुष त्या तिघींच्या पसंतीस येत नाहीं. " याप्रमाणें वृत्तांत ऐकून ताजुल्मुल्क उगाच राहिला.

एकेदिवशीं ताजुल्मुल्क बकावलीकडून आल्यावर सहज फिरत फिरत त्या महापारा नामक राजकन्येच्या महालाखालून जात असतां शहरवासी त्या शहाज्याद्याच्या मोहक लावण्याकडे पाहून आपसांत त्याची तारीफ करूं लागले. ती महापाराही त्या लावण्यपूर्णचंद्राकडे पाहून आश्चर्यचकित होत्साती चित्राप्रमाणें स्तब्ध झाली होती. तों ताजुल्मुल्क तिच्या महालापासून दूर गेला आणि तिच्या हृदयांत त्याच्या दर्शनामुळें सहज उत्पन्न झालेला प्रीतिविषयक बाण एकाएकीं सलूं लागला; त्यामुळें जरी ती चातुर्यगुणसंपन्न होती तरी क्षणभर विव्हळ झाली आणि एकाएकीं मूर्छित होऊन भूमीवर पडली. तेव्हां तिच्या प्रियसख्या नरमला आणि चीला ह्या जवळच होत्या, त्यांनीं धांवत जाऊन तिला उठविलें आणि सावध करण्याचा प्रयत्न आरंभिला. कोणी दासी तिच्या नेत्रांस व मस्तकावर पाणी लावूं लागल्या. कोणी वाळ्याचे पंखे घेऊन वारा घालूं लागल्या आणि कोणीकोणी उगीच घाबरून विनाकारण धांवाधांव करूं लागल्या. कांहींवेळानें ती महापारा सावध झाली. तेव्हां तिच्या सख्या तिला " एकाएकीं मूर्छना कां आली ? " असें विचारूं लागल्या; पण तिनें मुळींच जबाब दिला नाहीं. तेव्हां नरमला खिडकी उघडून मार्गाकडे पाहूं लागली. तों शहाजादा जात असलेला तिच्या दृष्टीस पडला आणि राजकन्या एकाएकीं बेहोष होण्याचें कारणही तिच्या ध्यानांत आलें. नंतर ती राजकन्येजवळ येऊन तिला ह्मणाली—" सखे काय हा तुझा बेहोषपणा ! तुझी एकाएकीं अशी विलक्षण स्थिति झालेली पाहतांच बाई आमच्या तोंडचें पाणी पळालें ! तूं अशी घाबरी कां होतेस, तुझ्या मनांत काय आलें आहे ? सांगतरी. ज्याला तूं पसंत करशील, त्याजबरोबर लग्न करून देण्याचा तुझ्या बापाचा निश्चय असतां तुला असें करणें शोभत नाहीं. ज्या पुरुषाला पाहून तुझी अशी अवस्था झाली आहे, तो कोणीही असो. देव, यक्ष, गंधर्व, यांपैकीं जरी असला, तरी तुझा बाप त्याला आणून त्याजबरोबरच तुझें लग्न करील; कांहीं चिंता करूं नको. ईश्वराच्या कृपेनें आह्मी तुझ्या सख्याही पराक्रमी आहों. तो अमका पुरुष, असें आह्मांला दुरून दाखीव मात्र. आह्मी आपल्याबलानें त्याला कैद करून तुझ्या पुढें आणूं " याप्रमाणें भाषण करून त्या नरमला नामक राजकन्येच्या सखीनें एका कुंटिणीला बोलावून शहाज्याद्याच्या मागें त्याचा शोध काढण्यासाठीं पाठविलें.

शहाज्यादा घोड्याला तुर्की चाल देऊन शहराची रचना पहात पहात साव-कास चालला होता. नरमलेनें पाठविलेली कुंटीण जी त्वरेनें निघाली ती ताजु-ल्मुल्काजवळ आली आणि येतांक्षणीं तिनें त्याच्या घोड्याचा लगाम धरून उभा केला व त्या शहाज्याद्याला ह्मणूं लागली—" हे तरुणा, येथें येणारा आषक माषुक स्त्रीला पहतांच आपला आत्मा तिला वाहून सुखी जात असतो. तो कसा ही असो, येथील तरुणी त्याला मोहपाशांत बांधून त्याचा आत्मा हिरावून घे-तल्या शिवाय त्याला सोडीत नाहींत. असें असतां तूं मुद्दाम राजकीय महाला-वरून मोठ्या थाटमाटानें फिरतोस, याची तुला मुळींच भीति वाटत नाहीं ? असो. तुझ्या एकंदर चालीवरून तूं कोणी परदेशी आहेस असें दिसतें. तर तूं राहणार कोणत्या देशचा ? व येथें कोणीकडून आला आहेस ? हें मेहेरबानी क-रून मला सांग. " ताजुल्मुल्कही चतुर होता. तिचीं भाषणें ऐकतांच " हिला कोणी तरी मुद्दाम मजकडे पाठविलें आहे. " ही गोष्ट त्याच्या ध्यानांत आली आणि तो स्मितवदनानें मधुर भाषण करीत असतां तिला ह्मणाला—" हे चट-कचांदणी, तूं यापेक्षांही अधिक गोष्टी जरी सांगितल्यास; तरी मी कधींही वि-रघळणार नाहीं. जळत्या जिवाला अधिक जाळणें हा मापुकांचा धर्म नव्हे, तर तूं आल्या मार्गानें चालती हो. मला पाहून जर कोणाला प्रीतिबाण लागले अ-सतील व त्यामुळें जखमा झाल्या असतील, तर दुसरा कोणी मलम लावणारा शोधून त्या जखमा बऱ्या करा. मी पूर्वेकडील राहणारा एक दुःखी प्रवासी आहें. तूं जिच्याकडून आलेली आहेस, तिला असें सांगकीं, त्या प्रवाशाकडे न पाहतां तूं आपल्या योग्यतेचाच प्रियकर शोधून काढ व आनंदानुभव घे. "

याप्रमाणें ताजुल्मुल्काचीं भाषणें ऐकतांच त्या कपटी कुंटिणीनें ताडलें कीं, हा तरुण कोणी तरुणीच्या पाशांत सांपडून तळमळत आहे. " तिनें नरमलेकडे जाऊन तिला शहाज्याद्याची सर्व हकीकत सांगितली आणि तो हस्तगत होण्या-चा रंग दिसत नाहीं; " असेंही कळविलें. महापारेचा विरह दिवसेंदिवस अति-शय वाढूं लागला. शहाज्याद्याची हवा घेण्यासाठीं निघण्याची वेळ केव्हां येते ? ह्मणून वाट पहात तिनें त्याच्या दर्शनासाठीं आपल्या खिडकी जवळ टपून बसावें आणि तो घोड्यावर बसून महालाखालून जाऊं लागला, ह्मणजे अधीर होऊन त्याजकडे पहावें व अश्रुपात करावा. शहाज्यादा नित्य नवा पोषाख करून ऐ-टीनें हवा घेण्यासाठीं निघत असे. त्यावेळेस त्याच्या थाटावर त्या नगरांतील सर्व स्त्रिया लुब्ध होत असत. त्यांतही महापारा चातकीप्रमाणें त्यालाच इच्छि-णारी होऊन बसली. त्याच्या चिंतनामुळें दिवसेंदिवस तिचें अन्न तुटलें; वि-नोद व्यवहारांचा कंटाळा आला, मैत्रिणींच्या जवळ बसून आनंदानें गोष्टी सां-गण्याचा तिला तिटकारा वाटूं लागला आणि अहोरात्र ती ताजुल्मुल्काचेंच चिंतन करीत मोठ्यानें सुस्कारे टाकून आपला वेळ विरहदुःखांत दवडूं लाग-ली. ही बातमी कांहीं दिवसांनीं तिचा पिता जो चित्रसेन राजा त्याला कळली आणि तोही ताजुल्मुल्काला पाहतांच हा जामात आपणांस योग्य आहे असें मानूं

लाग

...नें तत्काळ आपल्या कन्येच्या दाईला आपल्या जवळ बोलाविलें आणि "ताजुल्मुल्काकडे जाऊन आपल्या कन्येचें लग्न जमविण्याविषयीं प्रयत्न कर, ह्मणून आज्ञा केली. त्याप्रमाणें ती वृद्ध दाई वेळ साधून ताजुल्मुल्काजवळ आली आणि राजकन्येच्या रूपगुणांची तारीफ करून तिनें शेवटीं चित्रसेन राजाचा निरोप त्या शहाज्याद्यास सांगितला. तिचें सर्व भाषण ऐकल्यावर ताजुल्मुल्क तिला ह्मणाला—" बाई, आपल्या राजाकडे जाऊन त्याला मी फार फार सलाम केले आहेत असें सांग आणि असा उपदेश कर कीं, प्रवासी मनुष्यावर प्रीति ठेवली तर ती पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणभर मात्र टिकते आणि पुढें अगदीं नाहींशी होते. याचा विचार मनांत आणूनच आजपर्यंत लग्में ठरविणारांनीं विशेष चौकशी करण्याची चाल पाडून ठेवलेली आहे. तशी जर आपण माझी चौकशी कराल, तर माझा आपल्या देशाजवळ अगदीं संबंध नाहीं. केवळ ईश्वरी सृष्टींतील चमत्कार अवलोकन करीत हिंडणारा मी एक फकीर आहें. मला लग्नसंबंध करण्याची मनापासून इच्छा नाहीं. "

याप्रमाणें ताजुल्मुल्काकडून स्पष्ट जबाब मिळतांच ती दाई निरुत्तर झाली आणि तिनें आपल्या राजाकडे येऊन ताजुल्मुल्काची सगळी हकीकत सांगितली. ती ऐकतांच तो राजाही चिंताक्रांत झाला आणि आपले प्रधानादि सर्व मंत्रि जमवून विचार करीत बसला. तेव्हां त्याचा प्रधान ह्मणाला—" महाराज, एकाद्या फकीराला बादशहा जर बादशाही देण्याची इच्छा करील, तर ती त्याची इच्छा अगदीं श्रमाशिवाय पूर्ण होणारी आहे. आपण ज्याला कन्या देण्याचा इरादा केला आहे, तो जरी निरिच्छ फकीर आहे, तरी त्याला फसवून गोत्यांत घालण्याला या आपल्या दासाला वेळ लागणार नाहीं. " असें ऐकतांच तो ह्मणाला—" प्रधानजी, आपल्या राज्यांत जे फकीर दृष्टीस पडतात, ते सर्व माझ्या कन्येसाठींच फकीर झालेले आहेत,· ह्मणून तुह्मांला फकीराला फसविण्याला वेळ नाहीं असें वाटतें; परंतु जो खरा वैराग्यशाली आहे, तो कधींही फसून विषयांच्या गोत्यांत पडणार नाहीं. आतां आपण मजपाशीं प्रतिज्ञा करीत आहां, तर जो तरुण फकीर माझ्या कन्येच्या मनाला आवडला आहे, त्याला वश करा. तुह्मांला माझी आज्ञा आहे. " असें ऐकल्यापासून ताजुल्मुल्काला आपल्या सपाट्यांत आणण्याविषयीं तो प्रधान प्रयत्न करूं लागला. शेवटीं त्यानें आपल्या मनाजवळ असें ठरविलें कीं, " शहाज्याद्यावर चोरीचा आरोप आणावा आणि तशा प्रसंगांत गांठून त्याजकडून आपलें इच्छित कबूल करवावें. " जरी तो प्रधान चतुर होता, तरी शहाज्यादा फार दिवस त्याच्या सपाट्यांत आला नाहीं.

एके दिवशीं शहाज्याद्याला खर्चाची ओढ आली. त्या वेळेस वकावलीजवळचा एकादा दागिना मागून आणावा असें त्याच्या मनांत आलें. इतक्यांत " आपल्या मांडींत आपण सर्पाचा मणि ठेवला आहे. " या गोष्टीचें त्याला स्मरण झालें व त्यानें तावडतोब आपली मांडी चिरून तींतून तो तेजस्वी मणि बाहेर काढला. नंतर त्या जखमेवर मलम लावून ती बरी होतांच तो मणि घे-

ऊन बाजारांत आला आणि विकण्यासाठीं त्यानें जवाहीरवाल्यांस दाखविला. त्या मण्याचें तेज पाहतांच बाजारांतील सर्व जवाहिरी चकित झाले. कोणाच्यानेंही त्याची किंमत करवेना. तेव्हां एकानें जाऊन वजीराला कळविलें कीं, "बाजारांत एका मनुष्यानें एक मोहोरा विकण्यासाठीं आणला आहे; त्याची किंमत राजांशिवाय इतरांच्यानें तर कधींच देववणार नाहीं." असें ऐकतांच तो कपटी वजीर बाजारांत आला आणि शहाज्याद्यास पाहतांच तो मणि घेऊन "हा बादशाही खजिन्यांतून चोरीस गेलेला मणि!" असें ह्मणून त्यानें शहाज्याद्याला कैद केलें आणि मोठ्या संतोषानें राजाकडे सांगून पाठविलें कीं, "जो पक्षि पिंजराफोडून पळाला होता; तो अनायासें हातीं लागला आहे. आतां तो आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास कबूल झालाच पाहिजे, अशा प्रसंगांत त्याला गांठलें आहे."

## भाग २२ वा.

चित्रसेनाच्या वजीरानें ताजुल्मुल्काला राजाचा भावी जांवई जाणून राजकीय कैदेंत ठेविलें होतें, आणि नित्य कोणीतरी 'त्यानें राजकन्येस वरावें' ह्मणून त्याला उपदेश करण्यासाठीं जात असे. पण शहाज्यादा बकावलीच्या विरहांत झुरत असल्यामुळें कोणाचेंही बोलणें कबूल करीत नसे. एके दिवशीं तुरुंगावरील दरोग्यानें राजाकडे जाऊन विनंती केली कीं, "जो नवा कैदी राजकीय कैदेंत आज कित्येक दिवस आहे, तो रात्रंदिवस उदकाबाहेर काढलेल्या मत्स्याप्रमाणें तडफडत असतो. त्याला जर त्याच्या प्रियेचें दर्शन लौकर न होईल तर तो थोड्याच मुदतींत मरण पावेल." राजानें दरोग्याचें हें भाषण फक्त ऐकून मान घेतलें आणि त्याला जबाब न देतां कन्येकडे जाऊन सांगितलें कीं, "आतां तूंच आपल्या प्रियकराकडे जाऊन त्याला वश करण्यासाठीं तुला योग्य वाटेल तो उपाय कर. तो तरी कोणाच्या प्रीतिशरानें विद्ध झालेला आहे असें मला वाटतें. जर तो तुला पाहील, तर मनांत जिचें चिंतन करीत असेल, तिला खचित विसरेल आणि सर्वस्वी तुझा होऊन राहील. अशी सर्वांची खात्री आहे." असें ऐकतांच राजकन्या मनांत आनंद पावली आणि हौशीप्रमाणें उत्तम प्रकारचा शृंगार करून तिनें आपल्या दोनी सख्या नरमला व चीला यांस बरोबर घेतलें आणि गजगतीनें चमकतचमकत तुरुंगांत ज्या ठिकाणीं ताजुल्मुल्क रात्र झालेली असल्यामुळें एकांतीं बकावलीला आठवून हाय हाय करीत बसला होता, त्या ठिकाणीं येऊन ती एकाएकीं उभी राहिली.

जरी त्या तिघी लावण्यलतिका ताजुल्मुल्कापुढें येऊन अनेक प्रकारचे मोहक हावभाव करीत होत्या; तरी त्यानें त्यांच्याकडे पाहिलेंही नाहीं; त्याबद्दल महारेला फारच वाईट वाटलें. आपल्या नेत्रकटाक्षांनीं व हावभावांनीं कांहीं होत नाहीं, असें पाहतांच तिला अगदीं धीर निघेनासा झाला. तिला एकाएकीं विलक्षण प्रकारची मूर्च्छना आली आणि ती शहाज्याद्याच्या पायांवर पडून तडफडूं लागली. तिची जेव्हां अति दीनवाणी स्थिति ताजुल्मुल्काच्या प्रत्यक्ष दृष्टीस पडली, तेव्हां त्यालाही तिची फार कींव आली आणि त्यानें उठून तिला उच-

लले, सावध केलें, आणि आपल्या वामांकावर बसवून तिचें सर्व भाषण शांतपणानें ऐकून घेतलें. नंतर त्यानें मनांत आणलें कीं, "आपण जर हिच्या इच्छेप्रमाणें वागलों नाहीं; तर आपली मुक्तता होत नाहीं आणि मरण येईपर्यंत कांहीं बकावलीची गांठ पडत नाहीं. यासाठीं इचें ह्मणणें कबूल करून मोकळें व्हावें आणि पूर्ववत् बकावलीची नित्य भेट घेत असावें." याप्रमाणें निश्चय करून त्यानें तिच्या इच्छेप्रमाणें तिजबरोबर लग्न करण्याचें कबूल केलें.

जेव्हां हें आनंदाचें वर्तमान राजाला समजलें, तेव्हां त्यानें मोठ्या संतोषानें स्वतः येऊन ताजुल्मुल्काची मुक्तता केली आणि प्रियवचनांनीं त्याचें शांतवन करून त्याला हमामखान्यांत पाठविलें व मंगलस्नान करवून वस्त्रालंकारांनीं मंडित केलें. नंतर त्याला राहण्यासाठीं दास, दासी व सेवकांनीं भरलेला एक महाल नेमून दिला आणि सुमुहूर्तावर त्यानें आपल्या महापारा नामक कन्येचें व ताजुल्मुल्काचें लग्न केलें. नरमला व चीला ह्या दोघी ताजुल्मुल्कापुढें येऊन त्यानें आपणांबरोबरही विवाह करावा, ह्मणून अनेकप्रकारचे मोहक हावभाव दाखवूं लागल्या, परंतु त्यानें त्यांच्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. मध्यरात्र होतांच त्याच्या मनांत बकावलीची भेट घ्यावी असें आलें आणि तो उठून तिच्या त्या देवालयाकडे चालता झाला.

तिकडे बकावलीही ताजुल्मुल्काची फार दिवस भेट नसल्याकारणानें विरहज्वरांत तळमळत होती; इतक्यांत शहाज्यादा तेथें पोंचला. त्याला पाहतांच बकावलीला अत्यानंद झाला, परंतु त्याच्या हातां पायांला मेंदी लागली होती, ती पाहतांच तिच्या अंगाची आग झाली. ती क्रोधानें लाल होऊन त्याला ह्मणाली—" वाहवा वाहवा! शहाज्याद्या; आज फारांदिवशीं माझ्या भेटीसाठीं आलास आणि बरोबर लाल सुर्ख रंगही आणलास! तूं आषकांच्या नांवाला कलंक लावलास! तूं आपलें इमान बुडविलेंस! आतां कधींही आषकीचा दम कोणाला भरूं नको आणि आपल्या इष्काची गोष्टही कोणाला सांगूं नको! हे पाषाणहृदया, तूं हें काय केलेंस? याचा न्यायदृष्टीनें थोडातरी विचार करावयाचा होतास! तुझ्या संगतीला लागल्यामुळें माझ्या साऱ्या जन्माचा बदरंग झाला आणि तूं हातां पायांला खुषीनें रंग लाऊन आलास, हें तुला आवडलेंना! मी येथें दगड होऊन दुःख भोगीत पडावें आणि तिकडे त्वां खुषीच्या किल्ल्यावर चढावें! अरेरे! प्रियकरा, तुला आतां मी कायरे ह्मणूं? आतां कृपाकरून तूं माझें नांवतरी घेऊं नको. नव्या प्रियेबरोबर ऐष आराम करीत आनंदानें रहा. माझें कांहींहि होवो; तें पाहण्यासाठीं येऊन माझा जिव विनाकारण जाळीत जाऊं नकोस! माझी प्रीति सर्व जळून खाक झाली! त्या प्रीतीवर मोटमोठाले दगड पडले! असें मानून बकावली या नावाचाही कधीं उच्चार करूं नको, हें माझें तुजपाशीं शेवटचें मागणें आहे."

याप्रमाणें त्या बकावली परीचें क्रोधयुक्त भाषण ऐकतांच शहाज्यादा अति विनयानें ह्मणाला—" प्रियसखे, असें व्यर्थ वाग्बाण मारून माझें हृदय छिन्न

विच्छिन्न करूं नको. जरी मी शहाज्यादा आहें, तरी अंतःकरणापासून तुझ्या प्रीतिपाशानीं बांधून ठेवलेला तुझा ताबेदार आहें. माझ्या शरीरांत जों पर्यंत रक्ताचा एक बिंदु आहे; तों पर्यंत तुझी प्रीति कमी होणार नाहीं. माझें अंतःकरण तुझ्या ताब्यांत आहे. तुझ्या विलक्षण प्रीतीनें वेड लागून मला माझे सर्व आप्त, इष्टमित्र अंतरविले. या परदेशांत केवळ त्या तुझ्या प्रीतिपाशानींच मला ओढून आणलें. ज्या दिवशीं या नेत्रांनीं तुला पाहिलें; त्याच दिवशीं आणि त्याच वेळेस मनानें हें हृदय तुझ्या कोमल पदांवर वाहिलें. त्या दिवसापासून कोणतीही स्त्री पुढें येऊन उभी राहिली तरी मनावर आपली छाप ठेऊं शकत नाहीं. चंद्रसुद्धां तुझ्या पदनखांची बरोबरी करूं शकत नाहीं; अशी जी लोकोत्तर लावण्यखाणी तूं, ती मजवर खरा लोभ करीत आहेस, असें असतां जर मी दुसरीवर ममता करीन, तर माझ्या सारखा कृतघ्न या जगांत एकही सांपडणार नाहीं. तुझ्याशिवाय मला जगांतील कोणतीही वस्तु प्रिय नाहीं, हें मी तुला सांगितलें पाहिजे असें नाहीं; माझें जीवित तुझ्या हातीं आहे. तूं आज्ञा करशील तर मी अग्नींत उडी टाकीन. असें असतांही इतके दिवस पर्यंत तुझ्याकडे आलों नाहीं; याला योग्य कारण आहे: पण तूं जर तें शांतपणानें ऐकून घेशील तर खरें मानशील आणि मग मला कधींही दोषी ठरविणार नाहींस, अशी माझ्या जिवाची पूर्ण खात्री आहे. काय करूं? अगदीं लाचार झालों आणि तुझ्या भेटीला अंतरलों! नाहींतर तुझ्याशिवाय दुसरी स्त्री वरून आनंदांत असावें असें माझ्या स्वप्नांतही येणार नाहीं. या नगरींतील राजाची कन्या महापारा मला मार्गांतून फिरतांना पाहून मोहित झाली आणि मी तिला वरावें, या हेतूनें तिनें अनेक प्रकारचे यत्न केले. प्रत्यक्ष राजाकडूनही मला तिनें सांगविलें; परंतु तूं जिंकून ठेवलेल्या चित्तांत तिला वरावें असा विचार उत्पन्न होईना! शेवटीं त्या राजानें आपल्या प्रधानाजवळ मसलत करून मजवर चोरी केल्याचा आरोप आणला आणि मला एकदम नेऊन तुरुंगांत कैद करून ठेविलें. त्या दिवसापासून तुझ्या भेटीला मुकलों. तिकडे कैदेंत पडून तडफडत होतों; पण तुला तें कसें कळावें? मी आपल्या जिवाची मुळींच आशा सोडली होती; परंतु त्या राजकन्येला जर न वरीन तर माझी व तुझी भेट या जन्मांत अंतरली. असें जेव्हां पूर्ण विचारांतीं मला वाटलें, तेव्हां तिला वरण्यास कबूल झालों; तरी माझी मोकळिक झाली नाहीं. आज जेव्हां तिचा व माझा विवाह झाला; तेव्हां मोकळा झालों आणि पहिल्यानें तुला येऊन भेटलों. हें कर्म तरी माझ्या भेटीशिवाय तूं जिवंत राहणार नाहींस, असें मनांत आल्यावरून केलें. हा जर मी अपराध केला असें तुला वाटत असेल, तर ही कट्यार घे आणि तूं आपल्या हातानें माझा प्राण घे. तुझ्या अप्रीतीचे शब्द ऐकून जिवंत रहावें असें मला मुळींच वाटत नाहीं."

याप्रमाणें भाषण करून त्यानें आपल्या कंबरेची कटार सोडून तिच्या पुढें ठेविली व मस्तक तिच्या चरणांवर ठेवून एकसारखा रुदन करूं लागला, पण

अशी स्थिति फारवेळपर्यंत राहिली नाहीं. त्याची हकीकत ऐकून व अंतःकरणाची निर्मलता पाहून बकावलीचें हृदय अगदीं द्रवूं लागलें. "मी आपल्या प्रियकराला अविचारानें फार टाकून बोललें." असें मनांत आल्यावरून तिच्याही नेत्रांतून मौक्तिकांप्रमाणें अश्रुबिंदु पटापट् बाहेर पडूं लागले. तिनें शहाज्याद्याला आपल्या दोन्ही हातांनीं ओढून हृदयाजवळ धरिलें आणि अनेक प्रकारांनीं त्याचें शांतवन आरंभिलें. तेव्हां शहाज्याद्याचें अंतःकरण स्थिर झालें आणि प्रातःकाल होत आला तरी त्यांच्या प्रेमाच्या गोष्टींचा शेवट होईना आणि बकावलीला सोडून परत नगरांत जावें, असें ताजुल्मुल्काच्या मनांत येईना. जेव्हां अगदीं सूर्योदयाची वेळ आली, तेव्हां बकावलीनें जुलुमानें ताजुल्मुल्काला उठविलें आणि शहरांत पाठवून दिलें. त्या दिवसापासून शहाज्याद्यानें नित्य मध्यरात्र होय तोंपावेतों महापारेच्या महालांत असावें आणि वेळ होतांच प्रातःकालपर्यंत बकावलीजवळ येऊन बसावें. असा क्रम नित्य चालू राहिल्यामुळें ती गोष्ट महापारेच्या ध्यानांत आली.

"शहाज्यादा नित्य रात्रीं कोणीकडे तरी जातो; त्याची पूर्ण प्रीति कांहीं आपल्यावर नाहीं." असें मनांत आल्या दिवसापासून ती चतुर राजकन्या ताजुल्मुल्क रात्रौ कोठें जातो? हें पाहण्यासाठीं टपत राहिली; परंतु ती स्त्रीजाति, अपरात्रीं त्याच्या मागून लपत लपत जाऊन त्याची गुह्य गोष्ट पाहण्यास तिला धीर होईना. शेवटीं तिनें ती गोष्ट आपल्या बापाला कळविली. तेव्हां त्यानें कित्येक जासूद त्याच्या शोधावर राहण्यासाठीं नेमिले. ही गोष्ट शहाज्याद्यास माहित नसल्यामुळें जेव्हां तो आपल्या नित्य नियमाप्रमाणें बकावलीच्या मंदिरांत गेला; तेव्हां त्यांनीं त्याला पाहिलें. तो आंत गेल्यावर त्या मंदिराचें दार बंद करून घेत असे; त्यामुळें त्या हेरांला त्यानें आंत जाऊन काय केलें हें पहावयास सांपडलें नाहीं. प्रातःकाल होतांच तो महापारेच्या महालांत आला आणि त्याच्या पाळथीवर असलेल्या जासुदांनीं राजाकडे जाऊन "तो अमुक देवालयांत जाऊन बसत असतो." असें कळविलें. तें ऐकतांच राजाला फार क्रोध आला आणि त्याच वेळेस त्यानें कित्येक कामगार लोकांस बोलावून तें मंदीर पाडून जमिनदोस्त करण्याबद्दल हुकूम दिला. त्याप्रमाणें त्या राजसेवकांनीं जाऊन तें देवालय पाडून जमीनींतून उकरून काढून समुद्रांत फेंकून दिलें. त्या देवालयाची त्या जागयावर त्यांनीं खूणही ठेवली नाहीं. हा प्रकार झाल्यावर ताजुल्मुल्क जेव्हां त्या मंदिराच्या जागीं गेला आणि त्याला तें मंदिर नाहींसें झालें हें समजलें; तेव्हां त्याची वेड्याप्रमाणें स्थिति झाली. त्यानें अत्यंत आक्रोश करून आपली छाती बडवून घेतली आणि त्या काळोख्या रात्रींत तशा त्या निर्जनस्थानीं तो कांहीं वेळ बेशुद्ध होऊन पडला. जेव्हां फार वेळपर्यंत समुद्राच्या गार वाऱ्याची झुळुक त्याला लागली, तेव्हां थोडीशी शुद्धि आली आणि "हे प्रिये, आतां मी तुला कोठें शोधूं? हे प्राणसंजीवने, कोणाला तुझा पत्ता विचारूं? हाय! हाय!! माझा दुर्दैवानें सर्वस्वी

घात केला. " असा विलाप करीत तो प्रातःकाळपर्यंत समुद्र किनाऱ्यानें हिंडला आणि तिच्या भेटीची पूर्ण निराशा होतांच खिन्न होत्साता महापारेच्या मंदिरांत आला. तरी फार दिवसपर्यंत तो तिच्या स्मरणानें झुरत असे. शेवटीं तिच्या भेटीची आशा अगदीं नाहींशी झाली, असें जेव्हां त्याच्या मनाला वाटूं लागलें; तेव्हां नाइलाजास्तव तो वर वर मात्र महापारेच्या प्रेमपाशांत बद्ध होऊन राहिला.

भाग २३ वा.

नंतर कित्येक दिवसांनीं व कावलीच्या देवालयाची जमीन एका शेतकऱ्यानें नांगर फिरवून सारखी केली आणि त्या जमीनींत सरस पेरले. त्या शेतांत सरसाचें रोप तर उत्पन्न झालेंच; पण त्याच्या बरोबर सुवासिक सब्ज्याही उत्पन्न झाला. देवालय जरी अगदीं नाहींसें झालें होतें; तरी शहाज्यादा नित्य सहल करीत करीत त्या जाग्यावर जाऊन बकावलीच्या स्मरणानें अश्रुपात करीत असे. कांहीं दिवसांनीं तें शेत फुललें आणि त्याचा फारच सुगंध येऊं लागला आणि त्याची शोभाही अवर्णनीय दिसूं लागली. तेव्हां तर शहाज्यादा तें स्थल अष्टौप्रहर सोडीनासा झाला. त्यानें त्या शेताकडे पाहून वारंवार ह्मणावें— "प्रिये बकावली! या तुझ्या स्थानावर जो सब्जा आणि जीं फुलें उगवलीं आहेत, त्यांच्या सुवासाबरोबर मला तुझ्या निष्कपट प्रेमाचा गंध येतो. प्रियसखे, कोणत्या दुष्टानें दावा साधून तुझें मंदिर नाहींसें केलें हें समजत नाहीं. हाय हाय! आतां या ताजुल्मुल्काला बकावली स्मृतिशेष मात्र झाली!"

जेव्हां तें शेत पिकास आलें; तेव्हां त्या शेतकऱ्यानें त्यांतील सर्व सरस जमा करून त्याचें तेल काढलें. शेतकरी लोकांची अशी चाल आहे कीं, त्यांच्या शेतांत जें पीक येईल, त्याचा पहिल्यानें एक दिवस तरी ते उपयोग करतील. या नियमाप्रमाणें नवीन सरसांचें तेल होऊन तें त्या शेतकऱ्याच्या घरांत येतांच त्याच्या बायकोच्या व त्याच्या खाण्यांत आलें. शेतकऱ्याची स्त्री वांझ आहे असें सगळ्या शहराला ठाऊक होतें आणि तो शेतकरीही संतति नाहीं ह्मणून सदोदित खंती करीत असे; परंतु त्या सरसांचें तेल त्या जोडप्याच्या खाण्यांत आल्या दिवसापासून ती स्त्री जरी रूपानें दहा बायकांसारखी होती; तरी अप्सरेप्रमाणें दिसूं लागली. तिच्या व त्या वृद्ध शेतकऱ्याच्या तोंडावर कांहीं विलक्षण प्रकारचें तेज आलें आणि थोड्याच मुदतींत त्या शेतकऱ्याच्या स्त्रीला गर्भ राहिला. तेव्हां त्या शेतकऱ्यानें संतोषित होऊन आपल्या शक्तीप्रमाणें दान धर्म केला. तो गर्भ दिवसेंदिवस जसजसा वाढत चालला, तसतशी त्या शेतकऱ्याची स्त्री अधिकाधिक खुलत चालली. तिच्या तेजानें त्या शहरांतील सर्व स्त्रिया दिपून जाऊं लागल्या.

जेव्हां त्या गर्भाला नवमास पूर्ण झाले, तेव्हां त्या शेतकऱ्याची स्त्री प्रसूत झाली, आणि तिच्या पोटीं एक रूपवान् हास्यमुखाची कन्या उत्पन्न झाली. तिच्या रूपाचें वर्णन तर कोणाच्यानेंच करवत नसे. जसजशी ती शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढूं लागली, तसतशी अधिकाधिक खुलूं लागली आणि तिचे स्वा-

भाविक गुण लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. सर्व शहरांत ज्याच्या त्याच्या तोंडीं शेतकऱ्याच्या कन्येचे गुण व रूप अगदीं बसून गेले. उपमा देण्याची वेळ आली ह्मणजे ज्यानें त्यानें शेतकऱ्याच्या कन्येचें नांव पुढें आणावें. कांहीं दिवसांनीं ही गोष्ट शहाज्याद्याच्या कानावर आली आणि "ती कन्या स्वतः जाऊन पहावी." अशी उत्कट इच्छा मनांत उद्भवली. त्या इच्छेप्रमाणें तिला पहावें ह्मणून त्यानें त्या कन्येसह शेतकऱ्याला बोलावून आणलें आणि ती कन्या पाहतांच "ही बकावलीची प्रतिमा आहे आणि हा गुण तिच्या जाग्यावर उत्पन्न झालेल्या सरसांचा आहे." ही गोष्टही त्याच्या ध्यानांत आली. बकावली शेतकऱ्याच्या घरीं अवतरली या गोष्टीबद्दलचा अत्यंत संतोष त्यानें आपल्या मनांतच राखून ठेवला आणि त्या शेतकऱ्याला अनेक मूल्यवान् बक्षिसें देऊन कन्येचें उत्तम प्रकारेंकरून पालन करण्याची आज्ञा केली व निरोप दिला.

नंतर जेव्हां ती शेतकऱ्याची कन्या सात वर्षांची झाली, तेव्हां थोरथोर लोकांकडून तिला मागण्या आल्या, परंतु शेतकरी शाहाज्याद्याच्या धाकानें कोणाचीही मागणी कबूल करीत नसे. त्याला असें वाटे कीं, "प्रत्यक्ष राजाचा जांवई जर हिचा सर्व खर्च चालवितो आणि वारंवार चांगल्या प्रकारें रक्षण करण्याविषयीं ताकीदही करतो, तर त्याच्या मनांत काय आहे हें कोणी समजावें ? माझ्या जिवावर प्रसंग न येवो." अशा अनेक विचारांनीं तो मागणी करणारांस असा जबाब देत असे कीं, "जेव्हां ही माझी कन्या चांगल्या समजुतींत व वयांत येईल आणि आपल्या मनायोग्य वर पसंत करील; तेव्हांच मी हिचें लग्न करीन." पुढें जेव्हां ती बारा तेरा वर्षांची होऊन आपल्या लावण्याच्या भरास येत चालली; तेव्हां हुबेहुब बकावलीप्रमाणें दिसूं लागली शहाज्यादा वरचेवर तिला पाहण्यासाठीं उत्सुक होऊन त्या शेतकऱ्यासह तिला आपल्या महालांत बोलावीत असे. एके दिवशीं त्यानें त्या शेतकऱ्याला स्वतः बोलावून सांगितलें कीं, "तुझ्या कन्येबरोबर मी स्वतः लग्न करणार." हे शब्द ऐकतांच त्या बिचाऱ्या गरीब शेतकऱ्याच्या मनांत अनेक प्रकारचे विचार उद्भवले. त्यानें "मी विचार करून जबाब देतों." असें सांगून मुकाट्यानें आपल्या घराचा रस्ता धरिला आणि घरीं आल्यावर कन्येला हृदयाजवळ धरून अपार शोक करीत असतां ह्मणूं लागला—"हाय हाय ! म्यां गरीब मनुष्यानें राजाच्या जामाता बरोबर सोयरीक करून काय जन्मभर दुःखांत पडावें ? माझ्या लावण्यगुणसंपन्न कोमल कन्येला राजकन्येची दासी करून ठेवावें असें माझ्या मनांत कधींही येणार नाहीं. ईश्वरा ! मजवर कसा हा प्रसंग आणलास ?" याप्रमाणें आपल्या बापाचा विलाप ऐकून ती कन्या त्याला ह्मणाली—"बाबा, तुला माझ्यासाठीं शोक करीत बसण्याचें कारण नाहीं. जें फूल आहे, तें सदोदित मस्तकावरच राहणार; त्याला कोणीही पायांखालीं घालून तुडविणार नाहीं. मी पूर्वजन्मीं परी होतें; पण कांहीं विलक्षण प्रकारानें मला तुझ्या घरीं जन्म घ्यावा लागला. मी त्या शहाज्याद्या-

चीच स्त्री आहे. तूं न भितां जाऊन असें सांग कीं, माझी कन्या, त्र्यांत आ-ल्यावर तुलाच वरणार आहे. " याप्रमाणें कन्येचे शब्द ऐकतांच शेतकऱ्याला थोडासा धीर आला आणि कन्येनें शिकविल्याप्रमाणेंच तो शहाज्याद्याजवळ जाऊन बोलला. त्याचें तें अनुकूल भाषण ऐकतांच ताजुल्मुल्काला अत्यानंद झाला व त्या दिवशीं तर त्यानें त्या शेतकऱ्याला अपरंपार बक्षीस दिलें.

जेव्हां त्या बकावलीचे खोटे दिवस संपले व नष्टचर्य अस्तास गेलें, तेव्हां त्या सिंहलद्वीपावर एकाएकीं लक्षावधि पऱ्या उतरल्या. त्यांची गर्दी पहिल्यानें शेतकऱ्याच्या घराजवळ झाली. तरी त्या सर्व अदृश्य असल्यामुळें त्यावेळेस कोणाला कांहीं वाटलें नाहीं. त्या सर्व पऱ्यांत समनरूपरी मुख्य होती व ती उत्तम प्रकारचा पोषाख करून बकावलीसाठीं तख्त आणि अमूल्य वस्त्रालंकार घेऊन आली होती. ती मात्र लोकांला दिसली आणि खालीं उतरतांच शेतकऱ्याच्या घरांत बेधडक घुसली. तिला पाहतांच बकावलीनें प्रेमालिंगन दिलें आणि पहिल्यानें आपला पोषाख बदलून बापाजवळ जाऊन सांगितलें कीं, " बाबा, आजपर्यंत मी तुमच्या घरीं एखाद्या पाहुण्याप्रमाणें येऊन राहिलें होतें. तुमच्या पूर्ण प्रेमाचा अनुभव घेत असतां आजपर्यंत मी सुख भोगलें आणि पुढेंही भोगीन; परंतु आतां मला माझ्या पूर्वींच्या ठिकाणीं जाण्याची फारच अवश्यकता आहे, ह्मणून मोठ्या दुःखानें मी तुमच्याजवळ निरोप मागतें. कन्या हें मुळापासूनच परक्याचें धन, हा विवेक मनांत आणून तुह्मी कोणीही दुःख करूं नये. आजपर्यंत शहाज्याद्यानें जो माझ्यासाठीं खर्च केला; तो त्याला करणं भागच होता, आणि तें त्याचें कर्तव्यच होतें; ह्मणून त्याविषयीं तुमच्यावर अपवाद येणार नाहीं. मी जातांना त्यालाही बरोबर घेऊन जाईन. " असें सांगून तिनें आपल्या बापाचा हात धरून त्याला घराच्या मागिलदारीं आणलें आणि जमीनींत मोहरांनीं भरलेला एक मोठा हंडा होता, तो त्याला काढून देऊन "हा माझ्या मागें तुमच्या खर्चासाठीं ऐवज तुमच्याजवळ असूंद्या" असें सांगितलें. तें अपरंपार चकचकीत सुवर्ण पाहतांच त्या गरीब शेतकऱ्याचे डोळे फिरले व " आपली कन्या खरोखरच कोणी विजातीय आहे." असें मानून त्यानें तिला तिच्या इच्छेप्रमाणें जाण्यासाठीं निरोप दिला. तेव्हां समनरूपरीनें तिला बरोबर आणलेल्या तख्तावर ( विमानांत ) बसविलें आणि सर्व पऱ्यांसह अत्यानंदानें तें तख्त घेऊन आकाशांत उड्डाण केलें.

शहाज्यादा महापारेच्या मंदिरांत बसून तिच्यासह नरमला आणि चीला यांजबरोबर कांहीं विनोदार्थ भाषणें करीत सायंकाळच्या वेळीं गच्चीवर हवा घेत बसला होता; तों अकस्मात् तख्तावर बसलेली बकावली परी त्याच गच्चीवर उतरली. तिचें लावण्य पाहतांच महापारा, नरमला आणि चीला, ह्या तिघीही अगदीं थिजून गेल्या. तरी बकावलीनें कोणाकडेही न पाहतां एकदम जाऊन महापारेला प्रेमालिंगन दिलें आणि तिला आपलें सर्व वर्तमान सांगून ह्मणाली—" जर तुला हा शहाज्यादा प्रिय असेल तर आई, बाप, घर, दार, आप्त, इष्ट, मित्र इत्यादिकांची आशा सोडून यावेळेस मजबरोबर निघालें पाहिजे."

असें ऐकतांच ती महापारा ह्मणाली—"सखे बकावली, ज्यादिवशीं मी ह्या तुझ्या प्रियकराला पाहिलें; त्याचदिवशीं सर्वांवरील ममता सोडून हा देह याच्या चरणांवर वाहिला आहे. नंतर त्यानें मला वश व्हावें, ह्मणून मी अनेक प्रकार केले, परंतु याचें अंतःकरण कांहीं आजपर्यंत माझ्या ताब्यांत आलें नाहीं. त्याचें कारण आज माझ्या ध्यानांत आलें. ज्याठिकाणीं तूं लोकोत्तर लावण्यवती वास करीत होतीस; तें ठिकाण तुला नविचारतां मी बळजोरीनें घेण्यास पहात होतें, तें कांहीं घडलें नाहीं. तर आतां मी तुझी दासी आहें. ह्या शहाज्याद्याशिवाय जगांतील सर्व पुरुष मला बापा भावांप्रमाणें आहेत, आणि याच्यावर तर अनादिकालापासून तुझीच सत्ता आहे. तर तुझ्या मनास वाटेल तशी तूं माझी व्यवस्था कर. याच्यासाठीं सर्व सोडून तूं सांगशील तिकडे येण्यास मी तयार आहें." असें ऐकतांच बकावलीला अत्यानंद झाला व तिनें सर्व पऱ्यांस प्रगट होण्याचा हुकूम दिला. त्यावेळेस त्या सिंहलद्वीपावर पऱ्यांची गर्दी लोकांना इतकी दिसूं लागली कीं, सर्व शहरवासी लोक "हें काय विघ्न आलें ?" असें ह्मणून अगदीं घाबरून गेले.

चित्रसेन राजा आपल्या महालांत बसला होता. त्यानें जेव्हां आपल्या कन्येच्या मंदिरावर हजारों पऱ्या उडताहेत असें पाहिलें, तेव्हां फारच आश्चर्य मानलें आणि घाबरून "काय प्रसंग आहे कोण जाणे !" असें ह्मणत तो आपल्या कन्येच्या मंदिरांत आला. त्याला पाहतांच ताजुल्मुल्कानें पुढें होऊन आदरसत्कारानें आंत आणलें आणि आपल्या बैठकीवर बसविलें. नंतर "हा काय प्रकार आहे ?" असा त्यानें प्रश्न करितांच शहाज्याद्यानें त्याला आपली व बकावलीची कथा अथपासून इतिपर्यंत सांगितली. तेव्हां त्या राजानें उठून आपल्या कन्येचा हात बकावलीच्या हातीं दिला आणि नेत्रांत अश्रु आणून सांगितलें कीं, "ही माझी कन्या, पण तुझी दासी आहे, असें ह्मणून मी तुझ्या हवालीं करतों. हिच्यावर बहिणीप्रमाणें लोभ ठेवून हिला सुखी करणें तुझ्या अधिकारांत आहे." याप्रमाणें राजाचें नम्र भाषण ऐकतांच बकावलीनें त्याचें योग्य शब्दांनीं शांतवन केलें आणि त्याजपाशीं निरोप मागितला. त्या वेळेस चित्रसेनानें नरमला व चीला ह्या आपल्या कन्येच्या दोन्हीं सख्यांबरोबर देऊन कन्येसह ताजुल्मुल्क आणि बकावली यांस मोठ्या कष्टानें निरोप दिला.

राजाचा निरोप घेऊन जेव्हां ताजुल्मुल्क बकावली व महापारा यांसह तख्तावर बसला, तेव्हां नरमला आणि चीला ह्या दोघी त्यांच्या पुढें मोठ्या आदबीनें उभ्या राहिल्या. नंतर त्या सर्वांस घेऊन तख्तासह सर्व पऱ्या ज्या आकाशमार्गानें निघाल्या, त्या सिर्केस्थानाजवळ असलेल्या ताजुल्मुल्काच्या बागांत येऊन उतरल्या. बकावली व ताजुल्मुल्क यांस पहातांच बागाच्या रक्षणासाठीं ठेवलेला वजीरचा पुत्र बेहेराम पुढें आला व ताजुल्मुल्काच्या चरणीं लीन झाला. मेहमुदा व दिलबर ह्या दोघीही ताजुल्मुल्क व बकावली एकाएकीं नाहींशीं झाल्यामुळें कंठीं प्राण धारणकरून राहिल्या होत्या. त्यांनीं बकावली व ताजुल्मुल्कास पाहतांच धांवत जाऊन त्यांच्या गळ्याला मिठ्या मारल्या.

नंतर बकावलीनें महापारेची व त्यांची ओळख करून दिली आणि सर्व आनंद-विलासोपभोग घेत सुखानें राहिलीं.

### भाग २४ वा.

ही गोष्ट मूळ लिहिणारा असें लिहितो कीं, ताजुल्मुल्कानें आपल्या बागांत आल्यानंतर फिरोजशहा, मुजफ्फरशहा आणि जैनुल्मुल्क यांच्या नांवानें आपण खुशाल आल्याबद्दलचीं पत्रें लिहून जासुदाबरोबर त्यांच्याकडे रवाना केलीं. तीं वाचून पाहतांच त्या तिघांसही अत्यानंद झाला. फिरोजशहानें जमीलाखातुनला बरोबर घेतलें व तो सर्वांच्या आधीं ताजुल्मुल्काच्या बागांत येऊन त्याला भेटला. इतक्यांत मुजफ्फरशहा हुस्नआरा आणि रुहआफ्जेला बरोबर घेऊन तेथें आला. त्या सर्वांस पहातांच बकावलीला अत्यानंद झाला. मातापित्यांस पाहून तिला फार सुख वाटलें. इतक्यांत जैनुल्मुल्कही तेथें आला. त्यास पाहतांच ताजुल्मुल्काला अत्यानंद झाला. त्या बागांत कित्येक दिवसपर्यंत अहोरात्र मेजवान्या आणि नाच गाण्याचा रंग चालला होता. नंतर सर्व बकावली आणि ताजुल्मुल्क यांचा निरोप घेऊन आपापल्या ठिकाणीं गेलीं. त्यांत बकावलीनें रुहआफ्जेला मात्र जाऊं दिलें नाहीं. तिला राहण्यासाठीं अकीकाचा महाल खालीं करून दिला. त्या दिवसापासून रुहआफ्जा नित्य मध्यानरात्र होय तोंपावेतों बकावलीजवळ गोष्टी सांगत बसे आणि मग महालांत येऊन आराम करीत असे.

एके दिवशीं रुहआफ्जा महालांत निजली असतां तिचे केश सुटून खिडकीच्या बाहेर आले होते. त्या केशांत एक लाल जो गुंफलेला होता; तो त्या केशांच्या अग्रांवर येऊन मंगळाच्या चांदणीप्रमाणें चमकत होता. मध्यरात्र उलटून गेल्यावर वजीरज्यादा बेहेराम जागृत झाला आणि चांदण्याची सहल करण्यासाठीं फिरत फिरत रुहआफ्जेच्या महाला खालीं आला. त्यानें सहज खिडकीकडे पाहिलें, तों त्याला असें वाटलें कीं, काळा नाग आपला मणी तोंडांत धरून चालला आहे. त्यानें पुनः लक्षपूर्वक पाहिलें, तेव्हां केश सुटलेले आहेत व त्यांतील मणी चमकत आहे, हें त्याच्या ध्यानांत आलें आणि त्याला असें वाटलें कीं, कदाचित् बकावली येथें निजली असेल. तो आपल्या शयनस्थानीं जाऊन निजला; पण वारंवार त्याला त्या सुटलेल्या केशांचें व त्यांतील मण्याचें स्मरण होऊं लागलें व चैन पडेना. तेव्हां तो पुनः उठला आणि समनरूपरीकडे जाऊन "अकीकाच्या महालांत कोण निजलें आहे ?" असें विचारूं लागला. तेव्हां तिनें त्याला सांगितलें कीं, "तेथें रुहआफ्जा निजत असते; तेव्हां मात्र त्याच्या हृदयाला विषयाचा बाण लागला आणि त्यामुळें तो घायाळ झाला. दुसरे दिवशीं मध्यरात्र होऊन गेल्यावर जेव्हां रुहआफ्जा आपल्या महालांत जाऊन निजली असें वजीरज्याद्याला समजलें; तेव्हां तो तिच्या प्रीतीनें वेडा झालेला बेहेराम दोरी टाकून त्या महालावर चढला आणि बेधडक खिडकीवाटें आंत शिरला. बिचारी रुहआफ्जा बकावलीपासून गोष्टी सांगून येऊन गाढ निद्रेंत पडली होती. तिचें लोकोत्तर लावण्य पाहतांच त्याला त्याचा अंमल चढला आणि धुंद होऊन त्यानें निर्भयचित्तानें पलंगा-

वर जाऊन रुहआफ्जेचें चुंबन घेतलें. ती जरी सौंदर्यसंपन्न होती, तरी तिला आजपर्यंत कांहीं विषयाची गोडी नवती; परंतु बेहरामानें आलिंगन व चुंबन करितांच तिला विलक्षण सुख वाटलें आणि त्याच्या बेआदब वागणुकीचा रागही आला. त्यांतच लज्जेनें आपलें प्राबल्य करून तिचा क्रोध वाढविला. इतकें झाल्यावर जरी तो बेहराम रुहआफ्जेच्या मनाला आवडला होता; तरी तिनें त्या रागाच्या सपाट्यांत त्याच्या दहा वीस थोबाडींत मारल्या आणि त्याला खिडकी खालीं लोटून दिलें. तेव्हां त्याला पडण्यापेक्षां तिनें अप्रीति केल्याबद्दलचें फार वाईट वाटलें आणि तो हाय हाय करीत आपल्या शयनस्थानीं गेला; परंतु त्याच वेळेपासून निद्रेनेंही त्याला सोडलें.

रुहआफ्जेनें बेहेरामाच्या थोबाडींत मारून जरी त्याला खिडकी खालीं लोटून दिलें होतें; तरी तें रागाच्या झटक्यांत। तो तेथून गेल्यावर कांहीं वेळानें तिच्या मनाला त्याचा विरह वाटूं लागला. तरी स्त्रीजातीची स्वभाविक लज्जा पुढें झाली आणि " यावर येथें राहणें नीट नव्हे. " असें ।तच्या मनाला वाटूं लागलें. प्रातःकाल होतांच ती बकावलीकडे गेली आणि तिच्याजवळ निरोप मागूं लागली. तिच्या त्या एकदम फिरलेल्या बेताचें बकावलीला फारच आश्चर्य वाटलें व तिनें आणखीं कांहीं दिवस रहावें ह्मणून बकावलीनें तिला अनेक प्रकारांनीं सांगितलें आणि पराकाष्ठेचा आग्रह केला; परंतु रुहआफ्जा कांहीं केल्या ऐकेना. तिला वाटे कीं, " रात्रीची गोष्ट जर बकावलीला कळली, तर ती मला हंसेल. " शेवटीं निरुपाय जाणून बकावलीनें तिला निरोप दिला. तेव्हां ती जंजिरेफिर्दौस येथें निघून गेली; परंतु बेहेरामाच्या विरहानें अहोरात्र विरहात जळून हाय हाय करीत राहिली. कधीं कधीं तिनें एकांतीं बसावें आणि बेहेरामाला आठवून रडावें.

## भाग २५ वा.

असें सांगतात कीं, बेहराम रुहआफ्जेच्या विरहानें इतका बेजार झाला कीं, त्याचे डोळे खोल गेले, आणि अंगावरील सर्व मांस नाहींसें झाल्यामुळें त्याचा केवळ अस्थिपंजर मात्र राहिला; परंतु या गोष्टीचें खरें कारण समनरूपरी शिवाय दुसऱ्या कोणालाही ठाऊक नव्हतें. ती त्याला वारंवार उपदेश करीत असे कीं, " बेहेराम, तूं अशा भलत्याच गोष्टी मनांत ठेवून झुरत राहूं नको. कारण ती परी आणि तूं मनुष्य, तुझा आणि तिचा शरीरसंबंध होणें फार दुर्घट आहे. या कृत्यांत पडशील तर तुझ्या वांट्यास दुःखाशिवाय कांहीं येणार नाहीं. अरे, जळो ती प्रीति! जी तुझ्या जिवावरचा प्रसंग आणणारी ती तुझ्या काय कामाची? तूं ताजुलमुल्काला एका परीनें वरलें तसें दुसरी मला वरील असें मनांत आणून त्या भरंवशावर राहूं नको. तो प्रकार अवचित घडून आला. नाहींतर मनुष्य आणि परी यांत जमीनअस्मानाचें अंतर. तूं असा वेडेपणा करून व्यर्थ आपल्या जिवाची खराबी करून घेऊं नको. " याप्रमाणें जेव्हां जेव्हां समनरूपरी उपदेश करी; तेव्हां तेव्हां तो निमूटपणें ऐकून घेत असे.

जेव्हां समनरूपरीला वाटलें कीं, विषयाचा बाण बेहेरामाच्या हृदयाला ला-

गल्यामुळें तें अगदीं विदारण होऊन गेलें आहे आणि तिच्या प्राप्तीशिवाय कांहीं हा जिवंत राहणार नाहीं.; तेव्हां ती त्याला म्हणाली—“ हे वजीरज्याद्या, तुला मी जितका उपदेश करावा तितका केला; तरी तुझ्या मनाला बोध होत नाहीं व आतां माझा कांहीं इलाज राहिला नाहीं. तुझ्यासाठीं मला या कामांत अधिक कांहीं करवत नाहीं, असें असतांही जर तुझी इच्छा असेल तर मी तुला जंजीरेफिर्दोस येथें पोंचवितें मग पुढें तुझें दैव आणि तूं ” बेहेराम या गोष्टीला कबूल झाला; तेव्हां समनरूपरीनें त्याला पोषाख दिला, त्याच्या अंगावर स्त्रियांचे सर्व अलंकार घातले आणि पूर्णपणें नटवून त्याच्या निघण्याची तयारी केली. स्त्रीवेषांत तो बेहेराम फारच खुपसुरत दिसूं लागला आणि समनरूपरीच्या मदतीनें एका क्षणांत जंजीरेफिर्दोस येथें जाऊन पोंचला. त्या ठिकाणीं समनरूची मानलेली बहिण “ वनफशा ” नांवाची होती. ती रुहआफ्जेची फारच आवडती सोबतीण होती. समनरूपरीला पाहतांच ती आनंदित झाली आणि विचारूं लागली कीं, “ ही सुंदर तरुणी तुझ्या बरोबर आली आहे ही कोण ? ” समनरू म्हणाली—“ ही माझी मानलेली बहीण आहे. हिची इच्छा झाली कीं, जंजिरेफिर्दोस येथें जाऊन चार दिवस तेथील शोभा पाहून यावें, म्हणून मी हिला आपल्या बरोबर आणून तुझ्या हवालीं करीत आहें. हिला सर्व शहर चांगल्या रीतीनें दाखीव आणि तूंही आपल्या बहिणीप्रमाणें मान. ” असें ऐकतांच वनफशानें ती गोष्ट आनंदानें कबूल केली.

बेहरामाला पोंचवून समनरूपरी बकावलीकडे आली आणि वनफशा बेहरामाला पूर्ण प्रेमानें नेहून नेऊन तिला पुष्प होण्यासाठीं नानाप्रकार करूं लागली. तिनें त्याला नित्य नवीं नवीं चमत्कारिक ठिकाणें दाखवावीं आणि रोज हवा घेण्यासाठीं बागेंत न्यावें. एके दिवशीं वनफशा रुहआफ्जेकडे गेली असतां बेहराम घरांत एकटाच होता. त्याच्या मनांत रुहआफ्जेच्या प्राप्तीविषयींचे विचार सदोदित घोळतच असत. एकांत सांपडतांच त्यानें वनफशेचा एक आरसा घेतला आणि त्यावर आपल्या मनांत आलेलीं वाक्यें लिहिलीं.

“ हायहाय ! तेजावर लुब्ध होऊन पतंगाची जी स्थिति होते, तीच माझी आहे. आरशांत रूप पाहिल्याप्रमाणें जें रूप मी एकवेळ पाहिलें, तें माझ्या हृदयांत कोरलें आहे; परंतु आतां तें त्यांत दिसत नाहीं व प्रत्यक्ष अनुभवासही येत नाहीं. हें त्या रूपाच्या ध्यानांत जर असेल आणि त्याच्या रक्तांत जर प्रीतीचा एक बिंदु असेल तर माझें दुःख दूर होईल. ”

नंतर कांहीं दिवसांनीं वनफशा तोच आरसा घेऊन विसरतांना बोलत बोलत रुहआफ्जेच्या घरीं गेली आणि त्या आरशाची पाठ अकस्मात् रुहआफ्जेच्या दृष्टीस पडली. जेव्हां तीं त्यावरील अक्षरें तिनें लक्ष्यपूर्वक पाहिलीं, तेव्हां “ हा लेख बेहेरामाचाच आहे, ” असें तिला वाटलें. “ तरी पूर्ण चौकशी केल्याशिवाय खात्री होत नाहीं; ” असें मनांत आणून ती वनफशेला म्हणाली—“ सखे, जी वस्तु नित्य आहे ती कोणती ? आणि जी स्थिति सदोदीत खिन्नतेबरोबर आहे ती कोणती ? ” वनफशा ह्या दोन्हीं प्रश्नांबद्दल पुष्कळ

विचार करूं लागली; परंतु योग्य जवाब कांहीं तिच्या ध्यानांत येईना. शेवटीं तिनें तिला सांगितलें कीं, " सखे, आज या वेळेस कांहीं या प्रश्नांचीं उत्तरें मला सुचत नाहींत; पण रात्रभर विचार करून उद्यां तुला जवाब देईन " असें सांगून ती आपल्या घरीं गेली व अतिशय चिंता करीत बसली. बेहेरामानें जेव्हां तिला चिंतेंत पाहिलें, तेव्हां तिच्याजवळ जाऊन विचारलें " सखे, आज तुझा मुखचंद्र मलीन व म्लान झालेला असून तुला कांहीं तरी चिंता पडली असावी, असें वाटतें. शिवाय तूं कसल्या तरी विचारांत आहेस असेंही दिसतें. तर काय प्रकार आहे तो मला सांग. " असें ऐकतांच लाचार होऊन बनफशेनें सर्व हकीगती बरोबर रुहआफ्जेनें केलेले प्रश्नही बेहेराम यास कळविले. तेव्हां तो ह्मणाला—" सखे, याबद्दल तुला मुळींच काळजी करायाला नको. उद्यां रुहआफ्जेकडे गेलीस ह्मणजे तिला असें सांग कीं, आषकाच्या मनांत माषुकाविषयींचा ध्यास व त्याच्या तोंडावर मारलेल्याचा डाग नित्य आहे आणि त्या आषकाला माषुकाचें ध्यान करीत राहण्याची जी स्थिति ती सदोदित खिन्नतेच्या बरोबर आहे. " याप्रमाणें उत्तरें ऐकतांच बनफशा दुसऱ्या दिवशीं आनंदानें रुहआफ्जेकडे गेली आणि बेहेरामानें शिकविलेलीं उत्तरें देऊन स्वस्थ राहिली.

रुहआफ्जेनें तीं उत्तरें ऐकतांच बेहेराम आला आहे अशी आपल्या जिवाची पूर्ण खात्री करून घेतली आणि हीं उत्तरेंही त्याच्याच तोंडचीं आहेत असें तिच्या मनाला निश्चयात्मक वाटूं लागलें. नंतर तिनें बनफशेला विचारलें—" सखे, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. हीं उत्तरें तुला कोणी शिकविलीं ? हें मला खरें सांग. " बनफशेनें पहिल्यानें हे जबाब मीच शोधून काढले असें तिला जरी सांगितलें; तरी ती कबूल करीना आणि अत्याग्रह करूं लागली. तेव्हां ती ह्मणाली—" माझी एक धर्माची बहीण माझ्या घरीं आहे, तिनें ' हीं उत्तरें दे ' असें मला सांगितलें. " असें ऐकतांच रुहआफ्जा तिजविषयीं अधिक चौकशी करूं लागली. तेव्हां तिनें सांगितलें कीं, " समनरूपरीनें आपल्या ओळखीची एक लावण्यगुणसंपन्न तरुणी आणून माझ्या हवालीं केली आणि हिच्या मनांत जंजिरेफिर्दोस शहर पाहणें आहे व ' ही माझी मानलेली बहीण आहे ' असें मला सांगितलें, त्यावरून मी तिला ठेवून घेतलें आणि तिला येथील सर्व मुख्यमुख्य ठिकाणें दाखविलीं. काल जेव्हां मी तुझ्या प्रश्नाच्या उत्तरांसाठीं विचार करीत बसलें आणि कांहीं सुचेना ह्मणून चिंता करूं लागलें; तेव्हां तिनेंच माझ्या चिंतेचें कारण विचारून हीं अशीं उत्तरें दे ह्मणून मला सांगितलें. " याप्रमाणें बेहेरामाविषयींचें वर्तमान ऐकतांच रुहआफ्जेला अत्यानंद झाला आणि ती बनफशेला ह्मणाली—" सखे, आजपर्यंत ती तुझी चतुर बहीण तूं माझ्या भेटीसाठीं कांबरें आणली नाहींस ? उद्यां जेव्हां मजकडे येशील, तेव्हां तिला बरोबर आणायाला विसरूं नको. "

दुसरे दिवशीं जेव्हां बनफशा रुहआफ्जेकडे जाण्यासाठीं निघाली, तेव्हां तिनें बेहेरामाला उत्तम वस्त्रें व अलंकार देऊन खूप नटविलें आणि रुहआफ्जेकडे नेलें. जरी तो स्त्रीवेषांत होता; तरी त्यास पाहतांच ' हाच बेहेराम वजीर-

ज्यादा आहे.' असें तिनें ओळखलें; पण त्याचा अंत पाहण्यासाठीं ती त्याच्या कडे वळली नाहीं व त्याजपाशीं एक शब्दही बोलली नाहीं. जेव्हां बनफशा रुहआफ्जेची वेणी गुंफून मोकळी झाली आणि रुहआफजा तिच्या जवळ आरसा मागूं लागली, तेव्हां वेहेरामानें चट्कन् उठून ज्या आरशाच्या पाठीवर त्यानें लिहिलें होतें; तोच आरसा फिरवून उलटा करून रुहआफ्जेच्या हातांत दिला. रुहआफ्जा तो आरसा घेऊन खद खद हंसली आणि बनफशाकडे पाहून तिला ह्मणाली—"सखे, तुझी वहीण कितीग नादान आहे ही ? जिला आरशाची पाठ आणि तोंड समजत नाहीं, तिला काय ह्मणावें ?" बनफशा हें ऐकून स्वस्थच राहिली. नंतर जेव्हां ती आपल्या घरीं परत निघाली, तेव्हां रुहआफजा तिला ह्मणाली—"सखे, आजची रात्र तुझ्या बहिणीला तूं येथें ठेव आणि एकटीच घरीं जा. ती आणि मी एकांतीं असलों ह्मणजे गोष्टी सांगूं." असें ऐकतांच बनफशा तिला ह्मणाली—"फार चांगलें आहे. हिला जर तूं मेहेरबानी करून आपल्या संगतीला ठेवशील, तर ही इकडच्या रीतिरिवाजांत लौकर हुशार होईल अशी माझ्या जिवाची खात्री आहे." असें बोलून ती बेहेरामाला रुहआफ्जेजवळ सोडून आपल्या घरीं चालती झाली. नंतर रात्र झाल्यावर रुहआफ्जा आपल्या दासींस निरोप देऊन व महालांत एकांत करून बेहेरामास विचारूं लागली—"बाई, तुमचें नांव काय आहे तें मला सांगा बरें ?" बेहेराम ह्मणाला—"माझें नांव आणि निशाणी फार दिवस झाले, जळून गेली आहे" आणि तुझ्या नांवाशिवाय मला कांहींच आठवत नाहीं, अशी माझी स्थिति आहे." परीनें विचारलें—"असें आहे तर कोणत्या इच्छेनें तुह्मीं इकडे आलां बरें ?" असें ऐकतांच बेहेराम ह्मणाला-दीपकाच्या तेजस्वी ज्योतीकडे पतंगानें येणें हा स्वाभाविक धर्म आहे; मग त्यांत त्याचा जीव जातो की राहतो, त्या गोष्टीची त्याला पर्वा नसते. याप्रमाणें त्याची पूर्ण प्रेमदर्शक भाषणें एकतांच रुहआफ्जेच्या मनाला परमानंद झाला; तरी वरकरणी राग दाखवून ती त्याला ह्मणाली—"कपट्या, अधमा, मी तुझें सर्व कपट तुला पाहतांच ओळखलें व तूं स्त्रीवेष धारण करून आला आहेस हेंही मला कळलें; परंतु ह्या वेळ पर्यंत उगीच तुझी मौज पहात होतें. मेल्या मानवा, त्या दिवशीं तशी मूर्खपणाची वर्तणूक करून आतां येथेंही माझ्या नांवाला डाग लावण्यासाठीं तूं आला आहेस काय ? ठीक आहे, तुझ्या या कपटाबद्दलची शिक्षा मी तुला चांगली भोगवीन; तूं काय समजला आहेस !" याप्रमाणें तिचीं क्रोधयुक्त भाषणें ऐकतांच वेहेराम भयानें थरथर कांपूं लागला. त्याच्या मनांत आलें कीं, "एकवेळ एकांतांतून हिनें माझ्या थोवाडींत मारून मला घालवून दिलें; पण आतां कांहीं जीव घेतल्याशिवाय सोडीत नाहीं.' कसेंही असो. हिच्या विरहांत झुरून मरण्यापेक्षां एकदम जीव गेलेला चांगला" असा विचार करून तो तिला ह्मणाला-"खरोखर, तुझ्या हातानेंच मरावें, हा हेतु धारण करून मी येथपर्यंत आलों आहे. आतां हें दुःख मला सहन होत नाहीं. यासाठीं हातांत शस्त्र घे आणि माझा शिरच्छेद कर, ह्मणजे मी हा जन्म घेऊन कृतार्थता केली

असें मानीन. " याप्रमाणें भाषण करीत असतां त्याच्या नेत्रांतून अश्रु आलेला आणि तो रुहआफ्जेच्या पायांजवळ पडला.

इतका प्रकार होत असतां क्षणोक्षणीं रुहआफ्जेच्या मनांत त्याच्या प्रीत वृद्ध वाढत होता. तिच्या मनाची पूर्ण खात्री होत असतां जेव्हां तो पूर्ण व्य झाला असें रुहआफ्जेनें पाहिलें, तेव्हां तिनें आपल्या मनांत विचार केला " आतां जर याला अधिक भय दाखविलें, तर हा प्राणत्याग केल्यावि राहणार नाहीं आणि तसें झालेंतर माझें नांव घातकी व दुष्क्रियांच्या मालि ओंवलें जाईल. " याप्रमाणें तिच्या मनाला वाटतांच तिनें पडलेल्या बे मानजवळ बसून त्याचें शिर आपल्या मांडीवर घेतलें व त्याला सावध कर साठीं प्रीतीनें त्याच्या मुखावर मुख ठेवून त्याला हाका मारूं लागली. वेळपर्यंत तिच्या सुंदर मुखाचा संजीवक सुगंध त्याला पोंचतांच तो स झाला आणि नेत्र उघडून पाहूं लागला, तों आपलें शिर आपल्या प्रियेनें प्रीतीकरून मांडीवर घेतलें आहे. त्याचा आनंद गगनोदरांतही मावेना, इ वाटला. त्याला जी कृशता आली होती ती एकाएकीं नाहींशी झाली व तो तिच्या गळ्याला मिठीमारून मौक्तिकाप्रमाणें आनंदाश्रु टपाटप टाकूं ला. रुहआफ्जेचीही तीच स्थिति होती. प्रियकराची एकांतीं गांठ पडतांच लज्जा एकीकडे सारून ती त्याच्या गळ्याला मिठी मारून अगदीं एव होऊन राहिली. तेव्हां त्या दोघांचाही ताप दूर होऊन त्यांचे [illegible] कीं आणि हृदयांचीही सुखकमळें टवटवीत दिसूं लागलीं.

नंतर दुसऱ्या दिवसापासून ती [illegible] एक पळभरही आपल्यापा दूर करीनाशी झाली. त्याला गुप्त ठेवण्यासाठीं तिनें ज्यादूच्या साह पोपटाचें रूप देऊन एका सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेविलें आणि तो प्रीत पोटीं सदोदित आपल्या बरोबर वागवूं लागली. रात्रीं एकांत होतांच त्याला पिंजऱ्याबाहेर काढून मनुष्यरूप द्यावें आणि रात्रभर यथेच्छ पाहिजे र रंग उडवावा. हा क्रम पुष्कळ दिवसपर्यंत निर्विघ्नपणें चालला होता, परंतु " एक व मुष्क ( कस्तुरी ), यांचा वास लपत नाहीं. " या वृद्धोक्तिप्रमाणें ति दासींत पहिल्यानेंही कुजबुज उठली आणि जातांजातां ती हुस्नआरेच्या का पर्यंत गेली. 'आपली कन्या पुरुषाला बाळगून गुप्त व्यवहार करीत असते असें समजतांच त्या हुस्नआरेच्यानें राहवेना. ती तशीच उठून रुहआफ्जे महालांत आली आणि तिचीं सर्व चिन्हें पाहून अत्यंत क्रोधाविष्ट होत्साती ति विचारूं लागली; पण जी पूर्ण विचारानें वागणारी, ती काय तिला अशी सां णार ? रुहआफ्जेनें अनेक प्रकारच्या शपथा वाहून मला त्याबद्दलची अ पर्यंत कांहींच माहिती नाहीं असें दाखविलें, तरी हुस्नआरेच्या जिवाची ख होईना. शेवटीं तिनें तिला सोडलें आणि तिच्या सर्व दासी एकांतीं जम त्यांना धाक व दपडशा दाखवून अनेक प्रश्न केले, पण ज्यांना कांहींच ठाउ नाहीं त्या काय सांगणार ? शेवटीं एक दासी ह्मणाली " बाईसाहेब अलीक रुहआफ्जेनें एक पोपट एका सोन्याच्या पिंजऱ्यांत घालून पाळला आहे व र